# माणूस

कोकणातील
मराठवाड्यातील
काँग्रेस उमेदवार
नेम धरून पक्षी पाडावेत
तसे टिच्चून पाडण्यात आले.
कां ? कुणी ?

## ' शंकरराव हटाव ' कट
## केव्हा शिजला ?

' माहितगार 'चे खास वार्तापत्र.

शिवाय
दिल्लीहून रत्नाकर महाजन यांनी
पाठवलेल्या काही नवीन
' मारुती ' वार्ता / गोखले वार्ता

## साप्ताहिक माणूस

वर्ष सोळा–अंक सेहेचाळीसावा

१६ एप्रिल १९७७

मूल्य पंचाहत्तर पैसे



संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४३४५९


नेतृत्वबदलासंबंधी खास वार्तापत्र

# पूर्वीच शिजलेला कट

**माहीतगार**

शंकरराव चव्हाण यांना मुख्यमंत्रिपदावरून काढून टाकण्याच्या हालचालो सुरू झाल्या याचे आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. ते अपेक्षित होते. लोकसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रामध्ये काँग्रेसचा दारुण पराभव झाल्यामुळे चव्हाण–विरोधी गटाला आणखी एक संधी मिळाली, एवढेच ! जनता लाटेने काँग्रेसचा पराभव झाला हे जसे खरे, तसेच काँग्रेसजनांच्या नाकर्तेपणामुळे जनता पक्षाच्या पदरात ५–७ जागांचे जास्तीचे दान पडले. शंकररावांना काढून टाकण्याची मोहीम अधिक तीव्र करण्यासाठी, ती निर्णायक करण्याकरता व्यूहरचना म्हणून तर काँग्रेस उमेदवारांना पाडण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न काँग्रेसजनांनी केला नाही ना ? अशी शंका घेण्यास जागा आहे. शंकररावांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ घालण्याच्या प्रयत्नापासून त्यांना मुख्यमंत्रिपदावरून हुसकावून लावण्याचा खटाटोप करण्यापर्यंत हितसंबंधित मंडळींनी गणित केले होते. या गणिताप्रमाणेच महाराष्ट्राचे राजकारण चालले आहे. शंकरराव चव्हाण यांना काढण्यासाठी सध्या जो त्यांच्याविरुद्ध गदारोळ उडवण्यात येत आहे तो अपेक्षित होता. हे घडले नसते तरच आश्चर्य होते. वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना नाईकांना घालवण्यासाठी प्रयत्न चालले होते. त्याच वेळी मी तेरा एप्रिल १९७४ च्या माणूसमध्ये लिहिले होते, त्याचा एक परिच्छेद उद्धृत करत आहे. त्यावरून शंकरराव चव्हाण यांना घालवण्याचे वेळापत्रक केव्हा ठरले होते याची कल्पना येईल.

**" उरलेल्या तीन वर्षांकरता शंकरराव चव्हाणांना पाठिंबा द्यावा व १९७७ नंतर आपले घोडे पुढे दामटावे या पवित्र्यात बाकीचे इच्छुक आहेत ! " १३ एप्रिल १९७४ च्या माणूसमध्ये मी हे म्हटले होते. तेव्हा वसंतराव नाईकच मुख्यमंत्री होते. तेव्हाच शंकरराव चव्हाण यांना केव्हा घालवून द्यावयाचे हे आधी ठरवून वसंतदादा पाटील, शरद पवार, यशवंतराव मोहिते आदी पश्चिम महाराष्ट्रांतील नेत्यांनी शंकरराव चव्हाण यांना मुख्यमंत्री करण्याचा प्रयत्न केला होता.**

शंकरराव चव्हाण यांना काढण्याचे वेळापत्रकच १९७४ मध्ये ठरले होते असे नव्हे तर, शंकरराव मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांना दूर करण्याकरता कोणते निमित्त पुढे केले जाईल, हेही मी सांगितले होते. ते अक्षरशः खरे ठरले आहे. १ मार्च १९७५ च्या ' माणूस 'मध्ये मी लिहिले होते–

**' उद्याच्या स्वप्नासाठी प्रथम मराठवाड्याला हक्क मिळाला पाहिजे, हा आग्रह धरण्याची आवश्यकता आहे. आपल्या पाठिंब्याने शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री झाले की, दोन–तीन वर्षांनी आपणच त्यांच्या विरोधात जायचे व त्यांना दूर करावयाचे प्रयत्न होतील. उद्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला अपेक्षेप्रमाणे यश प्राप्त झाले नाही तर, निवडणुकीच्या पराभवाचा आधार शंकररावांच्याविरुद्ध घेतला जाईल. '**

शंकररावांना काढण्याचे प्रयत्न होतील तेव्हा, मराठवाडा आपल्याला पूर्ण टर्म मिळाली पाहिजे असा दावा करील असे १ मार्च १९७५ च्या माणूसमध्ये म्हटले होते. शंकररावांना काढल्याच्या हालचाली

पृष्ठ २५ वर

मुक्काम दिल्ली

# 'मारुती' वार्ता । गोखले गंडांतर

रत्नाकर महाजन

मतपेटीद्वारा झालेल्या शांततामय क्रांतीनंतर सत्तेवर आलेले केंद्र-स्थानचे 'जनता सरकार' आता हळूहळू स्थिरावू लागले आहे. 'स्थिर सरकार' ही काही कॉंग्रेस पक्षाची स्पेशॅलिटी नव्हे, हा जनतेने दिलेला कौल तिचे प्रतिनिधी प्रत्यक्षात उतरवून दाखविण्याच्या निर्धाराने काम करू लागले आहेत. काही तथाकथित सुशिक्षित मध्यमवर्गीय संशयात्मे आणि स्वपक्षाच्या दारुण पराभवाने निराश झालेले, चिडलेले कॉंग्रेस खासदार वगळता नव्या सरकारच्या स्थिरते-बद्दल आता सर्वांची खात्री पटली आहे. आजपर्यंत विरोधीपक्षीय म्हणून बोलण्याची सवय असलेल्यांना सत्ताधारी म्हणून बोलण्याचा प्रसंग आल्याने थोडे अनूयुज्वल वाटते आहे. पण या साऱ्या मानसिक अडचणी लवकरच नाहीशा होतील. संसदेचे अधिवेशन चालू आहे. प्रथम ठरल्यापेक्षा काही दिवस ते लांबले आहे. नव्या लोकसभेचे हे पहिले अधिवेशन आवश्यक अशा संसदीय औपचारिक कामकाजात खर्च झाले, तसेच पराभूत सरकारच्या चुका–प्रमादांचा पाढा वाचण्यात आणि आणीबाणीच्या काळात जनतेवर झालेल्या अन्याय-अत्याचाराचे मासले प्रथमच अविकृतपणे संसदेच्या वेशीवर टांगण्यात या अधिवेशनाचा बहुतेक वेळ गेला. अती उत्साह व सत्ताविपासेपोटी आपण व आपल्या नेतृत्वाने केलेल्या पापांचे पाढे आपल्यासमोर वाचले जात असताना, कॉंग्रेसच्या खासदारांना जखमेवर मीठ चोळल्यासारखे वाटते. त्यामुळेच लोकसभेत जे बोलता येत नाही ते, ते खाजगीत बोलत असतात. 'जनता लाटे'तही आपले स्थान कायम ठेवण्यात यशस्वी झालेल्या एका स्त्री–खासदारांच्या घरी जाण्याचा परवाच योग आला. बाईंची मानसिक अवस्था फारच नाजुक आहे. जनता पक्षाबद्दल बोलताना अगदी त्राग्याने बोलतात. 'आजपर्यंत देशाची काहीच प्रगती झाली नाही का? गेल्या अकरा वर्षांत भारताची मान जगात ताठ झाली त्याचे काय? जनता पक्ष तरी काय दिवे लावणार आहे?' असे त्यांचे प्रश्न असतात. इंदिरा गांधींचा 'वैभवाचा' काळ जवळून पाहिला असल्याने आताची त्यांची दैन्यावस्था पाहून बाई फार व्याकुळ होतात आणि जनता पक्षाविषयीची आपली मळमळ बाहेर काढतात. बदललेल्या राजकीय परिस्थितीची तार्किक कारणमीमांसा आणि त्यावर आधारित आवश्यक असे आत्मपरीक्षण करण्याच्या मनःस्थितीतच त्या नाहीत. काही एक नक्की सूत्र किंवा निश्चित असे सुसंगत सार त्यांच्या बोलण्याचे काढताच येत नाही. काही सूत्र असेल तर, ते म्हणजे पराभवाचे शल्य व नव्याने सत्तेवर आलेल्या पक्षाविषयी असूया, अविश्वास व असहिष्णुता एवढेच. थोड्या फार फरकाने सर्वच कॉंग्रेस खासदारांची हीच स्थिती आज आहे. सर्वसामान्य कॉंग्रेस खासदारांच्या मनःस्थितीचा व पवित्र्याचा हा एक नमुना आहे आणि अशा खासदारांच्या जिवावर जबाबदार विरोधाचा प्रयोग 'साहेब' करणार आहेत! या सह्याद्रीच्या रक्षणासाठी आता एखाद्या हिमालयाला धाव घ्यावी लागली नाही म्हणजे मिळविले!

## बरुआंचा 'ताज' मुक्काम

कॉंग्रेसच्या आघाडीवर सध्या प्रचंड गोंधळ, तणातणी चालू आहे. एकीकडे सर्वसामान्य खासदारांच्या विचारांची ही दिशा असताना, काही निवडक गटांचे म्होरके मात्र आत्मपरीक्षण, पक्षाच्या संघटनात्मक पुनर्रचनेची आणि नेतृत्वबदलाची मागणी करीत आहेत. वरवर हे सगळे आत्मपरीक्षणाचे निरोगी लक्षण दिसत असले तरी, प्रत्यक्षात या मागणीमागे पक्षाच्या दुरवस्थेतील आपली जबाबदारी अंगाबाहेर झटकण्याचा आणि दुसऱ्यांविरुद्ध थारडाओरडा केला की, आपण सुरक्षित राहतो हा डिफेन्स मेकॅनिझम आहे. संसदीय कॉंग्रेसपक्षाच्या नेतृत्वाचा प्रश्न समाधानकारकपणे सोडविल्याचा भास होत असला तरी, ब्रह्मानंद रेड्डी अजूनही नाखूष आहेत. महाराष्ट्रात कॉंग्रेसचा एवढा धुव्वा उडूनसुद्धा, यशवंतरावांना संसदीय कॉंग्रेस पक्षाचा नेता कसे केले गेले? हा रेड्डींचा खडा सवाल आहे. दक्षिणेत मी एवढे जिवाचे रान करून कॉंग्रेसला भरघोस यश खेचून आणले, त्याचा काहीही विचार का करीत नाही? हा त्यांचा प्रश्न होता. त्यांना संसदीय पक्षाचे नेतृत्व हवे होते. पण ते मिळण्याची शक्यता मावळल्याचे लक्षात आल्याने नेता-निवडीच्या बैठकीस ते गेलेच नाहीत. आपला असंतोष अशा रीतीने व्यक्त केल्याने त्यांना अन्य काही तरी रिवॉर्ड देण्याचा विचार सुरू झाला. संसदीय पक्षाचे नेते-पद वगळता रेड्डींना खूष राखण्याचे आज उपलब्ध असलेले पद म्हणजे कॉंग्रेसचे अध्यक्षपद. म्हणून त्यांना कॉंग्रेस-अध्यक्ष करण्याचा विचार सुरू झाला. देवकांत बरुआ यांनी राजीनामा देण्याचा आपला मनोदय जाहीर केलेलाच आहे. नाही तरी ते अध्यक्ष राहावेत, असे मनापासून कुणालाच वाटत नाही. पहिल्यापासूनच बरुआ हे वरून लादलेलेच अध्यक्ष आहेत. म्हणून अध्यक्षपदी दुसरा कुणीतरी हवा, असे बहुतेकांचे मत. या बरुआंविषयी परवा एक मजेदार किस्सा समजला. लोकसभेच्या निवडणुका जाहीर होण्यापूर्वी आणीबाणी चालू असताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांच्याविरुद्ध त्यांच्या सहकाऱ्यांनी सह्यांची मोहीम काढली होती. हे प्रकरण निस्तरण्यासाठी म्हणून बरुआसाहेब मुंबईस गेले होते. मुंबईत अर्थातच त्यांचा मुक्काम ताजमहाल हॉटेलमध्ये होता. तेथे ते एकूण दीड दिवस राहिले. या दीड दिवसाच्या मुक्कामाचे ताजचे

बिल एकूण रु. ११,५००/– फक्त एवढे झाले होते! त्यातले साडे-पाच हजार रुपये तर नुसत्या दारूचे बिल होते म्हणे! ताज हॉटेलच्या चालकांनी चुकून हे बिल मुंबई प्रदेश संघटना काँग्रेसकडे पाठविले. त्यांनी हे बिल अजून आपल्याकडेच ठेवले आहे.

तर अशा बरुआसाहेबांनी राजीनामा द्यावा अशी अनेकांनी मागणी केली आहे. सबंध वर्किंग कमिटीनेच अध्यक्षांसह राजीनामा द्यायचे ठरविले असल्याचे जाहीर होते न होते तोच चंद्रजित यादव यांनी आपला राजीनामा मागे घेतल्याची घोषणा केली आणि बरुआंनीही राजीनामा देऊ नये अशी त्यांना विनंती केली आहे. यामुळे गोंधळात आणखीनच भर पडली आहे. काही नाटयमय तडजोड होऊन बरुआ आपल्या पदावर कायम राहण्याची शक्यता अजीबात नाही असे नाही. पण एकूण सूर असा आहे की, He will have to go. तसे झाले तर, ब्रह्मानंद रेड्डी हेच काँग्रेस अध्यक्ष होतील असा आतापर्यंतचा आडाखा होता. पण गेल्या आठवडयात अचानक मोहनलाल सुखाडियांचे नाव पुढे आले आहे. त्यामुळे आजची हवा तरी अशी आहे की, मोहनलाल सुखाडिया हे काँग्रेस-अध्यक्ष होतील. रेड्डीसाहेब पुन्हा एकदा देखते रह जायेंगे! इंदिरा गांधींचेही नाव संभाव्य यादीत आहेच. पण ती शक्यता कमी असल्याचे निरीक्षकांचे मत आहे. मोहनलाल सुखाडियांनी निवडणुकांचे निकाल लागल्याबरोबर तामिळनाडूच्या राज्यपालपदाचा राजीनामा दिला असल्याने सध्या ते 'मोकळे'च आहेत. शिवाय ते उत्तरेतले आहेत. गव्हर्नर असताना सक्रिय (निवडणुकांच्या संदर्भात) राजकारणात काँग्रेसच्या बाजूने काम केल्याचा आरोप त्यांच्यावर करण्यात आला होता. हा आरोप करणारेच केंद्रीय सत्तेवर आल्याने चतुराईने राजीनामा देऊन ते मोकळे झाले. गेल्या दोन-तीन दिवसांत काश्मीरचे सय्यद मीर कासीम यांचेही नाव या अध्यक्षपदासाठी पुढे आले आहे. असे असले तरी, काँग्रेस अध्यक्षपदाचा प्रश्न अजून ओपन आहे. त्यावर अजून एकमत झालेले नाही.

केंद्रस्थानी पक्षहिताची दृष्टी ठेवून योग्य निर्णय व मार्गदर्शन करणारे वैयक्तिक व सामूहिक नेतृत्वच सध्या अस्तित्वात नाही. त्यामुळे विविध राज्यांतील काँग्रेसमध्ये हा गोंधळ रिफ्लेक्ट होतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे महाराष्ट्र. तिथल्या मुख्यमंत्र्यांविरुद्ध पक्षांतर्गत असंतोष आहे. तो व्यक्त करण्यासाठी सगळे इथे आले, सल्लाही मागितला, पण सल्ला देणार कोण? सगळ्यांच्याच पाया-खालची वाळू सरकलेली, कोण कुणाला सल्ला देणार! आपले उद्या काय होणार हे माहीत नसताना यांना सल्ला देऊन परिणाम भोगायला कोण तयार होणार? त्यामुळे प्रश्न लोंबकळत ठेवण्याचे सर्व-साधारण धोरण चालू आहे.

□

महाराष्ट्रात काँग्रेसचे एवढे पानपत होणे हा जनता पक्ष व सर्व-सामान्य मतदार यांना आश्चर्याचा सुखद धक्का होता. पण निवडणुकीत गोखले–गाडगीळ जोडी मात्र पडली पाहिजे असा महाराष्ट्रभर सर्वसामान्य सूर होता. केंद्रीय गुप्तचर खात्याने बॅरिस्टरसाहेबांचे भविष्य ५–६ मार्चच्या सुमारासच वर्तविले होते. या खात्याच्या अधिकाऱ्यांनी आपल्या दिल्ली कार्यालयाला स्पष्टपणे कळविले होते की, बारामती मतदारसंघात जनता पक्षास साठ टक्के, तर काँग्रेसच्या उमेदवारास चाळीस टक्के मते मिळतील. प्रत्यक्षात काय झाले ते आपल्यासमोर आहेच. पण त्यावेळी सरकारात असलेल्या बॅरिस्टर-साहेबांना हा रिपोर्ट समजला असणार. म्हणून तर त्यांनी आपल्या विजयासाठी शक्य तो सर्व 'बंदोबस्त' केला होता. निवडणुकांच्या आधी राज्यसभेची एक बैठक झाली होती. ती आटोपून परत गेल्या-वर बारामती मतदारसंघातील प्रत्येक तालुक्याच्या गावी 'बंदोबस्त' केला गेला असे म्हणतात. अशा गोष्टी नेहमी बोलल्याच जातात. लिहिल्या जात नाहीत. या व्यवहारांच्या हिशेब–पावत्या वगैरे भान-गडी नसतात.

## 'मारुती'चे शेपूट

संजय गांधींचा मारुती लिमिटेड कारखाना पाहण्याचा परवा अचानक योग आला. मारुती गाडीचा गोव्याचा डीलर अचानक भेटला. त्यांच्याबरोबर कारखान्यात गेलो. दिल्लीपासून सुमारे तीस किलोमीटर अंतरावर हरियानाची हद्द सुरू झाल्यावर सहाव्या किलो-मीटरशेजारी विस्तीर्ण जागा. आजूबाजूला शेती वगैरे काही नाही. मुळातली ही लष्कराच्या ताब्यातली जागा. ती बन्सीलाल यांच्या कृपेने भारताच्या या उदयोन्मुख उद्योगपतीला मिळालेली. विस्तीर्ण प्रांगणात तीन वेगवेगळ्या मोठ्या इमारती. मध्ये पक्के रस्ते. एक इमारत ऑफिससाठी, एक कँटिन, एक वर्कशाप. संबंध कारखाना फिरून पाहिला. मारुती मोटर सोडून बाकी सारे तिथे दिसले. दिल्ली ट्रान्स्पोर्टच्या बसेसच्या, तसेच मालट्रक्सच्या बॉडया बांधण्याचे काम जोरात सुरू आहे. मारुती टेक्निकल या नावाने आणखी एक कंपनी काढली, तिची डायरेक्टर सोनिया गांधी. त्या कंपनीचा रोडरोलर्सचा कारखाना याच आवारात. फिरता फिरता अखेर एक मारुती गाडी दिसली. काळ्या रंगाची. जिवाला जरा बरे वाटले. ऐकले होते, अजून एकही गाडी तयार नाही. पण ती अखेर दिसली. आवारातच दिल्लीचा कंपनीचा डीलर भेटला. त्याने सांगितले, 'आजपर्यंत अवघ्या बारा गाडया बाहेर आल्या आहेत. त्यातली एक माझ्याकडे आली होती. पाच दिवस मी ती रस्त्यावर चालवली आणि सहाव्या दिवशी तो बंद पडली. दुरुस्तीसाठी तिथे कंपनीच्या हवाली केली. अजून ती दुरुस्त व्हायची आहे. ही ती तुम्ही समोर पाहत आहात ती गाडी!' तर हा गोव्याचा डीलर. मारुतीच्या एजन्सीसाठी त्याने ४ वर्षांपूर्वी अर्ज केला. स्वतः जाऊन अर्ज दिला. सुरुवातीचे डिपॉझिट किती म्हणून विचारले. तीन लाख रुपये. त्यावेळी तेवढे पैसे नव्हते, म्हणून काही मुदत मागितली. एक आठवडयाची मुदत त्याला मिळाली. मात्र सुरुवातीस त्याच दिवशी एक हजार रुपये त्याला भरावे लागले. उरलेले सात दिवसांच्या आत भरायचे. डीलर गोव्यात परत गेले. पैशांची जुळवाजुळव करून ठरलेल्या मुदतीत पैसे पाठ-विता आले नाहीत. नवव्या दिवशी कंपनीचे पत्र त्याच्या हाती पडले, 'तुम्ही ठरलेल्या मुदतीत पैसे न भरल्याने तुमचे एक हजार रुपये जप्त करण्यात आले आहेत!' शेवटी पैसे जमवून तो दिल्लीला आला आणि एकदा त्यांचा अधिकृत डीलर झाला. या घटनेला ४ वर्षे झाली तरी मारुतीचे दर्शन नाही! दर सहा महिन्यांनी हा कंपनीस पत्र लिहायचा. ठरलेले उत्तर यायचे, 'लवकरच गाडी आपल्या भेटीस येत आहे.' मध्ये आणीबाणीच्या काळात राज-

कुमारांचा देशभर दरारा होता. अनेक अन्य भानगडींप्रमाणेच त्यांच्या या भानगडीविषयीही ब्र काढण्याची सोय नव्हती. पण हा बहाद्दर जाहीर सभांमध्ये त्याविषयी बोलायचा. या त्याच्या गुन्ह्याबद्दल एक-दोनदा त्याला पोलीस चौकीवर नेण्यात आले. 'मिसा'ची भीती दाखविण्यात आली. पण तो काही ऐकेना. निवडणुकांच्या काळात तर, चक्क प्रचारसभांमध्ये हा भाषणे करीत फिरला. भाषणाचा मुख्य विषय अर्थातच मारुती हा असायचा. निवडणुका संपल्या आणि नव्या जोमाने हा आपले तीन लाख रुपये परत मिळविण्यासाठी दिल्लीस आला. कंपनीचे मालक संजय गांधी यांची प्रथम त्याने भेट घेतली. परिस्थितीला अचानक मिळालेल्या कलाटणीने शेठ जरा नरमले होते. म्हणाले, You see, the company is in serious difficulties. You should understand our difficulties. Please give us some more time. हा डीलर म्हणाला, 'मि. गांधी, आम्ही पुरेशी संधी तुम्हाला दिली आहे. आम्ही फार दिवस तुम्हाला समजून घेतले. आता आणखी थांबणे शक्य नाही' एक दोन दिवसांचा वायदा शेवटी झाला. पण अजून बिचाऱ्याला छदाम मिळालेला नाही. पण त्याने निर्धार केला आहे, पैसे हाती आल्याशिवाय (तेही रोख–कारण यांचे चेक बँकेत वठत नाहीत असा त्याचा अनुभव आहे.) दिल्ली सोडायची नाही. परिणामी अजून तो इथेच आहे. युवराजांच्या वागण्या–बोलण्यात भलताच फरक पडल्याचे सांगतो. आणीबाणीच्या काळात एकदा भेट झाली असता, युवा–नेत्याने त्याला साधे बसा सुद्धा म्हटले नाही, आणि अत्यंत तुसडेपणाची वागणूक दिली. आता गुर्मी, तुसडेपणाची जागा भय, सौम्यपणाने घेतली आहे. अमेठीच्या अडाणी, खेडूत जनतेने चांगलाच वठणीवर आणला आहे. आता देशभरच्या सर्व डीलर्सना एकत्र करून संजय गांधींवर कोर्टात दावा (क्रिमिनल कम्प्लेंट) दाखल करण्याचा विचार चालू आहे. बहुधा येत्या पंधरा दिवसांत तो दाखल होईल. दरम्यान मारुती व नगरवाला प्रकरणी चौकशी करण्याचे आश्वासन गृहमंत्र्यांनी दिले आहे, त्यामुळे या डीलरला अधिक बळ मिळाले आहे. पुण्यातले एक नामांकित व्यापारी मारुतीचे डीलर आहेत.

मारुती लिमिटेडला सहकार्याचा हात देण्यासाठी काँग्रेसी राज्य-सरकारांची परस्परांत चढाओढ लागली होती. महाराष्ट्र राज्य-सरकार तरी मागे कसे राहील? पाईपर विमानांची भारतातली एजन्सी मारुती लिमिटेडकडे आहे. महाराष्ट्र सरकारने गरज नसताना एक पाईपर विमान मारुतीकडून घेतले. या व्यवहारात मालक संजय गांधी यांना एकवीस टक्के कमिशन दिले गेले म्हणतात! या एकवीस टक्क्यांच्या मोबदल्यात या तरुण, कुशल नेतृत्वाकडून राजकारणविषयक मार्गदर्शन महाराष्ट्राला मिळाले!

मारुती, नगरवाला या प्रकरणी चौकशी करण्याच्या नव्या सरकारच्या निर्णयामुळे माय–लेक भलतेच हबकले आहेत. असे म्हणतात की, त्यांना भेटायला गेलेल्या जनता पक्षाच्या ज्येष्ठ नेत्यांकडे इंदिराजींनी या प्रकरणी चौकशी करू नका, अशी करुणा भाकली होती. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. आता तर या चौकशीचे आश्वासन संसदेत स्वतः गृहमंत्र्यांनी दिले असल्याने चौकशी अटळ आहे.

## गोखल्यांवर गंडांतर

अनुशासनपर्वातील समाजवादी घटनेचे शिल्पकार हरिभाऊ गोखले यांचे राजकीय जीवन तर संपुष्टात आलेच आहे; पण दिल्लीतल्या त्यांच्या समव्यवसायींनी त्यांचे व्यावसायिक जीवनही संपुष्टात आणण्याचा चंग बांधला आहे. सुप्रीम कोर्ट बार असोसिएशनच्या काही सदस्यांनी आपल्या अध्यक्षांकडे, गोखल्यांवर असलेल्या आपल्या आरोपांची यादी सादर करून, या आरोपांची जाहीर चौकशी व त्यावर इष्ट ती कारवाई करावी अशी मागणी केली व या मागणीचा विचार करून असोसिएशनने सर्वसाधारण सभा बोलवावी अशी विनंती केली. २८ मार्चला केल्या गेलेल्या या अर्जाप्रमाणे दि. ३१ मार्चला सुप्रीम कोर्टाच्या लायब्ररीत ही सभा झाली. आपापली कामे संपवून वकील मंडळी बैठकीस येणार म्हणून वेळ दुपारी ४ वाजून ५ मिनिटं ही ठेवण्यात आली होती. पण ३-४० लाच हॉल गच्च भरला. अध्यक्ष श्री. सी. के. दफ्तरी अजून आले नव्हते. वकील मंडळींनी 'बैठक सुरू करा, सुरू करा,' असा गलका करायला सुरुवात केली. अखेर उपाध्यक्ष मुखोती यांच्या अध्यक्षतेखाली सभा सुरू झाली. बरोबर ४ वाजून ४ मिनिटांनी एक वकील श्री. ढेबर हे बोलायला उभे राहिले. त्यांनी फक्त 'बंधू–भगिनींनो' एवढेच शब्द उच्चारले आणि प्रचंड गोंधळ सुरू झाला. उजव्या कम्युनिस्ट पक्षाचे शिवपूजनसिंह, राव वगैरे वकील उठून 'point of order' म्हणून ओरडू लागले. अध्यक्षांनी सांगितले, 'आरडाओरडा करू नका, दंडेली करू नका. कामकाज सुरळीत झाले पाहिजे.' तेवढ्यात श्रीवास्तव नावाचे एक उत्साही वकील उठले आणि तावातावाने, 'तुम्हास बैठकीत सहभागी व्हायचे नसेल तर चालते व्हा. तुम्हाला इथे जागा नाही.' असे म्हणाले. त्यावर मुखोतींनी त्यांना तसे न बोलण्याची समज दिली. काय घडते आहे हे समजायच्या आत आणखी एक वकील आपल्या खुर्चीत उभे राहून ओरडू लागले, कळवळून विनवू लागले, 'अध्यक्ष-महाराज, कृपया सभा एक दिवस पुढे ढकला. अध्यक्ष श्री. दफ्तरी यांना येऊ द्या.' काही तरी करून बैठक पुढे ढकलायचा प्रयत्न चालला होता. कोर्टात अत्यंत अदबीने वागण्याची सवय असलेली वकील मंडळी सर्व बांध तुटल्याप्रमाणे आरडाओरडा, गोंधळ करीत होती. काय चालले आहे फार थोड्या लोकांना समजत होते. पहिली पंधरा मिनिटे अशी प्रचंड गोंधळात निघून गेल्यावर बैठक सुरू झाली. जयप्रकाश गोयल हे असोसिएशनचे सेक्रेटरी ठरावाच्या बाजूने बोलायला उभे राहिले. गोखले कायदामंत्री झाल्यापासून त्यांच्या nepotism ची उदाहरणे सांगायला त्यांनी सुरुवात केली. १९७१ साली अशाच तऱ्हेचे आरोप करणारे एक निवेदन (गोखल्यांविरुद्ध) इंदिरा गांधींना ३३ वकिलांनी दिले होते; पण त्याची दखल न घेतली गेल्याचे त्यांनी सांगितले. हे निवेदन देण्यात सी. पी. आय. चे आर. के. गर्ग यांचा पुढाकार होता. या निवेदनाचा व्यावसायिक परिणाम असा झाला की, भारत सरकारच्या कायदा खात्याची कोर्टातील कामे श्री. गर्ग भागीदार असलेल्या राममूर्ती अँड कंपनीकडे वारंवार येऊ लागली! चळवळ्यांची तोंडे बंद करण्याचा काँग्रेसी सरकारांचा स्टँडर्ड मार्ग!

भांडारे हे सुप्रीम कोर्टात धो-धो प्रॅक्टिस असणारे वकील

गोखल्यांचे जावई. गोखले कायदामंत्री झाल्याबरोबर भांडारेंची भरभराट सुरू झाली. दिवसाकाठी हजारो रुपये मिळवून देणारी सरकारी कामे भांडारे व गोखल्यांचे दुसरे जावई चितळे यांच्याकडे हारीने जाऊ लागली.

तर अशी आरोपांची यादी वाचीत असताना आरडा-ओरडा पुन्हा सुरू झाला. एक महिला वकील तळमळून ओरडली, 'तुम्हाला आम्हाला प्रॅक्टिसच करू द्यायची नाही.' आरडाओरडा, गोंधळामुळे शेवटी श्री. गोयल यांना आपले भाषण संपवावे लागले. कोणी तरी ओरडले, ठराव मताला टाका. अध्यक्षांनी ठराव मतास टाकला. पहिल्यांदा ठरावाचे काय झाले ते गोंधळात न समजल्याने पुन्हा मतदान घेतले. ठराव ७० विरुद्ध ३४ मतांनी संमत झाला. यावर काही हितसंबंधी वकिलांनी खोटे मतदान झाल्याची नेहमीची तक्रार केली. या बैठकीस फक्त सुप्रीम कोर्टातल्या वकिलांनाच यायची परवानगी होती. पण प्रत्यक्षात ठराव विरोधी वकिलांनी आपली बाजू बळकट करण्यासाठी वकील नसलेल्यांनाही बरोबर आणले होते. या 'न' वकिलांनी मते दिली तरी सुद्धा ठराव इतक्या मताधिक्याने पास झाला. उलट चितळे-भांडारे या जामातद्वयीने आमची २५ मते मोजलीच गेली नाहीत अशी तक्रार केली !

अशी ही वादळी बैठक शेवटी ५ वाजता संपली — गोखल्यांविरुद्ध केलेल्या आरोपांची चौकशी करण्यासाठी एका समितीची निवड करून. ही बैठक झाल्यानंतर एक घनिष्ट संबंधातले वकील गोखल्यांना भेटायला गेले. एकीकडे राजकीय पराभव, दुसरीकडे व्यवसायातही असे संकट उभे राहिलेले. पण साहेबांनी काहीही धीर सुटल्याचे लक्षण दाखविले नाही. वर म्हणाले, 'नावीन्य काही आम्हाला नवीन नाही. आता आणखी एकदा नवीन जीवन सुरू होईल.' आहे की नाही नित्यनूतनाची हौस ? या नवेपणाच्या हौसेपायी तर गोखले-साहेबांनी नवी राज्यघटना देशासाठी तयार केली. पण मुंबईचे लोकच फार पुराणवादी. त्यांना नव्याचा दुस्वास म्हणून तर, या नित्यनूतनाच्या उपासकांची किंमत त्यांना कळली नाही.

¤

दिल्लीत राहणाऱ्या महाराष्ट्रीयांनी स्थापन केलेल्या एकूण बावीस संस्था इथे आहेत. या बावीस संस्थांनी मिळून परवा महाराष्ट्रातील नवनिर्वाचित संसद सदस्यांचा सत्कार केला. काँग्रेस व जनता दोन्ही पक्षांचे खासदार आले होते. यशवंतराव, वसंतराव हे मात्र नव्हते. कार्यक्रम पूर्णतः सांस्कृतिक असल्याचे, राजकीय नसल्याचे सर्वांचे एक अंडरस्टॅंडिंग झाले होते. तसे ते होणे योग्यही होते. पण चोवीस तास राजकारणात असलेली माणसे राजकारण एकदम कशी विसरणार ! काही रोखठोक सवाल-जबाब झालेच. उद्धवराव पाटील आपल्या भाषणात म्हणाले, परंपरेने काँग्रेसचा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मतदारसंघातून आम्ही निवडून आलो आहोत. त्यानंतर, कराडमधून निवडून आलेल्या प्रेमलाबाई चव्हाण बोलायला उठल्या. जशास तसेच्या टोनमध्ये त्या म्हणाल्या, ट्रेडिशनली काँग्रेसच्या असणाऱ्या मतदारसंघाची परंपरा चालू ठेवण्याचे भाग्य मिळाल्याचा मला अभिमान वाटतो. काँग्रेसचा किल्ला मी राखला आहे. त्यानंतर बोलले एरंडोल मतदारसंघातून निवडून आलेले जनता पक्षाचे सोनूसिंग पाटील. प्रेमलाबाईंना टोमणा मारण्यासाठी म्हणून ते म्हणाले, बाईंनी काँग्रेसचा किल्ला राखला; पण काँग्रेसची 'साताराची गादी' त्यांनी गमावली आहे. अध्यक्षस्थानी असलेल्या मोहन धारियांनी असे राजकीय न बोलण्यास सोनूसिंगना सांगितले म्हणून स्टेजवरची ही टोमण्यांची मालिका थांबली. सत्कारास उत्तर देणाऱ्या भाषणांत मृणाल गोरे, बापू काळदाते, मोहन धारिया, मधू दंडवते यांच्या भाषणावर श्रोते विशेष खूष झाले. महाराष्ट्र विधानसभा गाजविणारे व आता लोकसभेवर आलेले एक खासदार सभेनंतर भेटले. म्हणाले, 'काय बुवा, दिल्लीत मन रमत नाही. आपलं, आपल्या मुलखातून कुठं लांब येऊन पडल्यासारखं वाटतंय. मी चांगलं म्हणत होतो दुसऱ्या कुणाला तरी उभं करा. ऐकलं नाही. माझ्याच गळ्यात टाकलं.' मी म्हणालो 'पण कुणीही उभं राहिलं असतं तर निवडून कसं आलं असतं ?' 'काय झालं न यायला ? नाही तरी जनता पक्षाची हवा होतीच. या हवेत आला असता निवडून कोणीही. पण मी मात्र पस्तावलो बाबा या भानगडीत पडून. बरी होती आपली विधानसभाच.'

¤

जगजीवनराम यांचा ७० वा वाढदिवस ५ एप्रिल रोजी विठ्ठलभाई पटेल हाऊसच्या हिरवळीवर धूमधडाक्याने साजरा झाला. कार्यवाहक राष्ट्रपती, संजीव रेड्डी, मधू लिमये, नानाजी देशमुख वगैरे बड्यांची बाबूजींच्या गुणगौरवपर भाषणे झाली. बाबूजींच्या वाढदिवसाबरोबरच त्यांच्या राजकीय शक्तीचेही प्रदर्शन यावेळी झाले. सहारणपूर, मेरठ व दिल्लीजवळ असलेल्या अन्य काही गावांहून काँग्रेस फॉर डेमॉक्रसीचे फलक लावलेल्या ४।५ बसेस भरून या कार्यक्रमासाठी लोक आले होते. सभेत भाषणे सुरू होण्याआधी काही कवींनी बाबूजींवर केलेल्या आपल्या कविता वाचल्या. एका कवीने आपल्या कवितेत बाबूजींच्या लहानपणापासून ते आत्ताच्या निवडणुकांपर्यंतच्या कर्तबगारीचे वर्णन केले होते. त्यात एक ओळ 'येत्या विधानसभा निवडणुकांत कोण किती ताकदवान आहे ते सिद्ध होईल' अशी होती ! सभा सुरू असताना दर पाच मिनिटांनी 'जगजीवनराम झिंदाबाद' बरोबरच 'सी. एफ. डी. झिंदाबाद' च्या घोषणाही निनादत होत्या. बाबूजी सभास्थानी येण्यापूर्वी उत्तर प्रदेशातले नवनिर्वाचित तरुण खासदार रामधारीलाल सुमन यांना बोलण्यास सांगितले. त्याने भाषण सुरू करण्यापूर्वी संयोजकांना खाली बसायला सांगितले. स्टेजवरची गडबड — बडबड बंद झाल्यावर ते बोलायला लागले. एक दोन वाक्ये संपल्यावर ते म्हणाले, 'देशाचा नेता होण्यासाठी पंतप्रधान होण्याची गरज नसते' झाले. पब्लिक खवळले. गोंधळ सुरू. बिचाऱ्या वक्त्याला स्टेजवरच घेराव. 'आप पोलिटिक्स बाते क्यों करते है ?' म्हणून सी. एफ. डी. ची नेतेमंडळी त्याला झापायला लागली. जमावातून 'खाली बसा' व 'बाबू जगजीवनराम झिंदाबाद' च्या घोषणा. स्टेजवर बाचाबाची चालूच. अशी गोंधळाची पाच मिनिटे गेली आणि बाबूजी आले. त्यामुळे बिचारा वक्ता बचावला. हे सारे चालू असताना हेमवतीनंदन बहुगुणा स्टेजवरच होते.

□

'आर. डॉक्युमेंट' ही अशोक जैन अनुवादित कादंबरी आणीबाणीच्या ऐन कहरात–१९७६ च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली. ती या आठवडयात पुस्तकरूपाने प्रकाशित होत आहे. त्यानिमित्त हा त्रोटक आढावा. आणीबाणीकाळात 'माणूस लेखक परिवाराने' केलेल्या कामगिरीचा–

# चित्त हवे भयशून्य !

श्री. ग. माजगावकर

श्री. ग. माजगावकर यांसी

स. न. वि. वि.

काल वर्षप्रतिपदा शके १८९९ च्या शुभदिनी महामहिम राष्ट्रपती महोदयांनी 'आणीबाणी' संपूर्णतः उठविल्याचे ऐकून माझ्या मनात प्रामुख्याने जो विचार आला तो आपले मनःपूर्वक अभिनंदन करण्याचा. गेल्या वर्षप्रतिपदा शके १८९८ पासून आपण तत्कालीन 'आणीबाणीला' आव्हान देऊन माझी लेखमाला प्रसिद्ध करावयाला सुरवात केलीत. त्यानंतर कहाणीचे पुस्तक छापलेत–त्यातील प्रास्ताविकासकट छापलेत, हे आपले धाडस सार्थकी लागले. आणीबाणीला आव्हान देण्याचा ध्वज आपण गेल्या वर्षी उभा केलात आणि या वर्षी गुढ्या तोरणे बांधून कालचा पाडवा साजरा केलात असेच मला वाटत आहे. आपल्या प्रकाशनाचे वैशिष्टय असे की, आपले हितकर विचार लिहावयासाठी विदूषकी साज न चढवता आपले विचार लिहिता येतात, लेखन ऋजु आणि मऊ असून त्यात विलक्षण दाहकता आणता येते हे 'माणूस' च्या पानोपानी जाणवते. आपले हे वैशिष्टय आणि धाडस नेहमी वर्धिष्णु राहो हीच देवाजवळ प्रार्थना !

वळावे लोभ असावा ही वि.

२१–३–७७ आपला

पु. ल. इनामदार, मुंबई

☐

खरी गोष्ट अशी आहे की, 'माणूस'ने इनामदारांसारख्या लेखकांचे आणीबाणीतील कामगिरीबद्दल प्रथम आभार मानायला हवेत. अशा लेखकांची साथ नसती तर, १८।१९ महिने चाललेल्या आणीबाणीत स्वतंत्र विचारांचा पाठपुरावा करणारे लिखाण सातत्याने 'माणूस'मधून देत राहणे, निर्भयता प्रकट करणे एरव्ही कठीण गेले असते.

आणीबाणीच्या काळात 'माणूस'मधून आलेले स्वतंत्र बाण्याचे लिखाण एकत्रित करायचे ठरवले तर, सहज ७।८ पुस्तके निघू शकतील. दोन तर निघालीही आहेत. (इनामदारांचे 'लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी' व सौ. सुमती देवस्थळे यांचे 'गॉर्की.') तिसरे (आर् डॉक्युमेंट) निघण्याच्या वाटेवर आहे.

देवस्थळे यांच्या 'गॉर्की' प्रस्तावनेतील हे हेतुकथन पाहण्यासारखे आहे. सुमतीबाई लिहितात–'गॉर्कीच्या जीवनकथेला फार झगझगीत असा राजकीय आशय आहे. एका प्रचंड राज्ययंत्रणेने त्याची अक्षरशः शिकार केली. विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना गॉर्कीची, जीवनकथा विचार करायला लावील. राज्ययंत्रणा लेखनस्वातंत्र्याच्या आड येते म्हणजे नेमके काय घडते, याचे प्रत्यंतर गॉर्कीच्या जीवनकथेत स्पष्ट होते.'

आणीबाणी घोषित झाल्यानंतर निघालेल्या पहिल्याच दिवाळी अंकात सुमतीबाईंचे हे लिखाण प्रसिद्ध झाले आहे हे ध्यानात घेतले म्हणजे, त्या काळातील या लिखाणाचे मोल विशेषत्वाने जाणवल्याशिवाय राहत नाही. कऱ्हाड साहित्य संमेलन लेखनस्वातंत्र्याच्या जयजयकाराने ज्यांनी गाजवून सोडले त्या इंदुमती केळकर परवा सहज बोलता बोलता म्हणून गेल्या– 'गॉर्की'ने चांगली कामगिरी केली. यावेळी गॉर्की पुढे येण्याला विशेष महत्त्व होते. 'माणूस'ची आणीबाणीच्या काळातील Contribution मोठी आहे.

याच दिवाळी अंकात 'चार्ली चॅप्लीन' कशासाठी दिला होता ? दिवाळी अंकाच्या अगोदरच्या अंकातील प्रकटनच त्यावर लख्ख प्रकाश टाकू शकेल. प्रकटनात चॅप्लीनचे आवाहन दिले होते. चॅप्लीनने म्हटले होते –

'Soldiers,
in the name of democracy
let us unite......

Brutes have risen to power.

एका विदूषकाचे हे भाषण.
'डिक्टेटर' या चित्रपटामधील हिटलरच्या भूमिकेतील चॅप्लीनचे.'

ही चॅप्लीनची योजना त्यावेळी किती अचूक होती हे आणीबाणी उठून निवडणुका जाहीर झाल्यावर पु. ल. देशपांडे यांनी जी कामगिरी केली त्यावरून आता तरी ध्यानात यायला हरकत नाही. यशवंतराव चव्हाण यांना प्रतिटोला मारताना पु. लं. ना चॅप्लीनचे

उदाहरणच आठवावे हा काही केवळ योगायोग नाही. जगभर माहीत असलेले, लोकांना चटकन भिडणारे हे साम्य आहे. 'माणूस'ने हे साम्य ओळखून त्यावेळी विस्ताराने चॅप्लीनची कथा सादर केली. या कथेचे लेखक होते अनिल किणीकर.

याच दिवाळी अंकातील डॉ. श्रीराम लागू यांचा 'अँटिगनी' हा नाट्यानुवाद कशासाठी होता? नाझीव्याप्त फ्रान्सला हुकुमशाही-विरुद्ध लढण्याची प्रेरणा 'अँटिगनी'ने दिलेली होती. त्यावेळच्या अंधःकारमय कालखंडात ही प्रेरणा आपल्याकडेही जागती ठेवणे आवश्यक होते. पुढे 'अँटिगनी'संबंधी उलटसुलट चर्चा वृत्तपत्रांतून आली, तरी या प्रेरणेचे महत्त्व कोणालाच अमान्य झाले नाही. आता सांगायला हरकत नाही, हा डॉ. लागूकृत अँटिगनी–अनुवाद भूमिगत असताना मृणाल गोरे यांच्या वाचनात आला. माझी व त्यांची अशा स्थितीत एके ठिकाणी भेट झाली तेव्हा हा अनुवाद लगेच प्रसिद्ध व्हावा ही इच्छा त्यांनी बोलून दाखवली. दिवाळी १५।२० दिवसांवर येऊन ठेपलेली होती. पुष्पाबाई भावे यांनी मग धावपळ सुरू करून वेळेवर हे सर्व साहित्य 'माणूस'ला उपलब्ध करून दिले आणि अगोदर ठरलेले बरेचसे कथासाहित्य रद्द करून हा संपूर्ण अनुवाद एकाच अंकात 'माणूस'नेही प्रसिद्ध करून टाकला.

पुढे हा सर्व अंकच 'आक्षेपार्ह' ठरला. मुखपृष्ठासकट. कारण मुखपृष्ठावर, मानवाच्या स्वातंत्र्यप्रेरणेचे प्रतीक असणाऱ्या, जिव्हारी जखम झाली तरी, आकाशात उंच उंच झेपावणाऱ्या गॉर्कीच्या 'फाल्कन' ससाण्याचे चित्र होते आणि शिवाय या कवितेतील ओळीही–

A proud call to freedom...to light....
the madness of the brave we sing.

अंकातील 'संपादकीय' तर फारच 'स्फोटक' ठरले. कारण त्यात रा. स्व. संघ आणि दसरा-विजयदिन यांचा संबंध जोडला होता.

¤

आणीबाणी २६ जून (७५) ला जारी झाली. २८ जून अंकावरील इंदिरा गांधी न्यायदेवतेला वाकवत आहेत अशा अर्थाचे चित्रकार फडणीस यांचे चित्र व आतील 'इंदिरा गांधींनी अलाहाबाद कोर्टाच्या निर्णयानंतर राजीनामा द्यायला हरकत नाही' हे संपादकीय, प्रीसेन्सॉरशिपचा हुकूम हाती पडण्यापूर्वी छापून झाले होते या कारणास्तव सुटले. पण नंतरचा ५ जुलैचा अंक मात्र सापडला. मजकुरावर प्रसिद्धीपूर्व नियंत्रण आले होते. पण रंगाबाबत लेखी सूचना नव्हत्या. म्हणून मुखपृष्ठावर सगळा काळा रंग घेतला आणि आत पहिल्या पानावर तीन सूचक अवतरणे देऊन या काळ्या रंगाचा अर्थ स्पष्ट केला. ही अवतरणे बाजारात उपलब्ध असलेल्या पुस्तकातून निवडलेली होती. या पुस्तकांवर बंदी नव्हती. प्रीसेन्सॉरशिपचा हुकूम नवीन मजकूराबाबत आहे. हे तर जुनेच साहित्य आहे–असा युक्तिवाद करता येण्यासारखा होता. पण या युक्तिवादाचा काही उपयोग झाला नाही. पुढच्या अंकाचे काम चालू असतानाच 'माणूस' कचेरीत पोलीस अधिकारी थडकले. त्यांनी मशिनवर चालू असलेली पुढच्या अंकाची छपाई थांबवली आणि दुसऱ्या दिवशी कँपातल्या मुख्य आयुक्तांच्या कचेरीत हजर राहण्याचा हुकूम बजावून ते निघून गेले.

दुसरे दिवशी ११ वाजता कँपातल्या आयुक्तांच्या कचेरीत आम्ही तिघे हजर झालो. मी स्वतः, मुद्रक व सहसंपादक म्हणून दिलीप माजगावकर आणि स्नेही म्हणून बिंदुमाधव जोशी. डेप्युटी कमिशनरांच्या खोलीत आमचे पाऊल पडते न पडते तोच फोन वाजला. एका हाताने आम्हाला 'बसा' असे खुणवीत डेप्युटी कमिशनरांनी फोन कानाला लावला. 'Yes. Yes. He is just here' असे डे. कमिशनर फोनवरून कोणाशी तरी बोलत होते. थोड्या वेळाने फोन संपला आणि त्यांनी म्हटले : वेळेवर आलात. तुमच्यासंबंधीचाच दिल्लीचा फोन होता. तुमच्या मागील अंकावर अॅक्शन घेतली की नाही म्हणून चीफ सेन्सॉरने फोनवरून विचारणा केली.

दिल्लीचे दडपण तेव्हा एकदम जाणवले.

मी सगळा वर दिलेला युक्तिवाद केला, पण काही एक उपयोग झाला नाही. कडक ताकीद देणारे एक पत्र माझ्यासमोर ठेवण्यात आले. अंक तर जप्त झालाच होता. पण प्रेस वाचला.

'Noted' असे पत्रावर लिहून मी सही केली. 'तुम्ही ताकीद दिलीत. तुमच्या हातात अधिकार आहे. ताकीद मला मिळाली. मी नोंद घेतली–' एवढेच मला कबूल करावयाचे होते. पत्रातील विधाने, बाकीचा मजकूर मी मान्य केला नाही–करणे शक्यही नव्हते.

प्रसिद्ध कायदेपंडित चंद्रकांत दरू यांचा प्रिसेन्सॉरशिप व मिसा कायद्याचे स्पष्टीकरण करणारा लेख 'भूमिपुत्र' या गुजराथी नियतकालिकातून भाषांतर करून 'माणूस'साठी घेतला होता. पोलीस 'माणूस' कचेरीत आले तेव्हा या लेखाची छपाई सुरू होती. दुसऱ्या दिवशी डे. कमिशनरांच्या कचेरीत या लेखावरूनसुद्धा वाद झाला. त्यांनी लेख प्रसिद्ध करायला मनाई केली. ऐनवेळी दुसरा मजकूर कुठून आणायचा? त्यामुळे १२ जुलैचा अंक निघूच शकला नाही.

नंतरचा १९ जुलैचा अंक. आणीबाणी जाहीर होऊन पंधरा-वीस दिवसच जेमतेम उलटलेले आहेत. वातावरणात भीती दाटून राहिली आहे. पोलिसांकडे तेव्हा सेन्सॉरचे काम असल्याने त्यांची 'माणूस' कचेरीवर पाळत आहे. आणि तरीही या अंकातील 'सोलकढी' सदरात अनंतरावांनी एक काडी शिलगावून दिली. त्यांचा 'नन्नाचा जाहीरनामा' पोलिसांच्या हातावर सफाईने तुरी देऊन पसार झाला. जाहीरनामा प्रसिद्ध करण्यापूर्वी अनंतरावांनी आणीबाणीला चक्क 'पुटकुळीवर नवे गळू' म्हटले आणि लिहिले...

'शाळा नव्याने उघडल्या...नवा अभ्यासक्रम. तो मुलांना यथासांग शिकवायचा तर, मुलांनी जबाबदारीने वागायला हवे. बाकी सगळे कळले तरी तेवढे नेमके त्यांना कळत नाही. हवी तशी वागतात. आपापसांत त्यांनी काहीही केले तरी हरकत नाही हो. पण ती शिंची शिकवणाऱ्या बाईंना सतावतात. बाई तरी काय करणार? त्यांनी वर्गातर्गत सुरक्षेसाठी आणि शांततेसाठी नन्नाचा जाहीरनामा काढून त्याची मातेच्या कठोरपणे अंमलबजावणी केली. हसतखेळत शिकवायच्या नव्या पद्धतीनुसार मुलांना जे सांगायचे ते त्यांनी गाण्यात सांगितले. ते गाणे असे :

मुलांनो मुलांनो
बोलू नका बोलू नका
मुलांनो मुलांनो
हालू नका हालू नका १

मुलांनो मुलांनो
तापू नका तापू नका
मुलांनो मुलांनो
लपू नका लपू नका २
खोकू नका...शिकू नका
रडू नका...ओरडू नका
पाहू नका...खाऊ नका
नका...नका...नका
नं ना नित्री नुनू नेनै नोनौ नंनः॥

यावेळी अनंतराव सहीसलामत सुटले. पण नंतर मात्र 'सोलकढी'वर सेन्सॉरचा फार बारीक डोळा राहिला. २ ऑगस्ट अंकातील 'लंकेच्या नकाशात भारत' या मजकुरावर 'जाहीरनाम्या'चा सूड उगवला गेला आणि वरचेवर काटछाट होऊ लागली. एकदा तर काटछाट झालेला मजकूरही अंकात छापला गेला. पण तंबीवर भागले.

२६ जुलै अंकामुळे सेन्सॉरच अडकले. 'राजमुकुटाची चोरी' ही एक सत्यकथा या अंकात छापली आहे. सेन्सॉरने पास केलेली. या कथेचा शेवट असा आहे–

'इंग्लंडच्या राजमुकुटाच्या चोरीची ही काहीशी जगावेगळी हकीकत वाचून अनेक वाचकांच्या डोक्यात काहीतरी यासारख्याच ओळखीच्या घटनेची याद येऊ लागली असेल. २४ मे १९७१ रोजीची दिल्लीच्या स्टेट बँकेची ६० लक्ष रु. ची कहाणी वाचक अजून विसरले नसतील; पण वाचकहो, भलत्या शंकाकुशंका न काढणेच बरे नव्हे कां? कारण त्यातील मुख्य आरोपी श्री. नगरवाला हॉस्पिटलमध्ये 'हृदयविकाराने' मृत्यू पावला. या प्रकारणाची चौकशी करणारे कश्यप, ग्रँड ट्रंक रोडवरील अपघातात ठार झाले. पोलीस तपासात पुरेसा पुरावा पुढे न आल्यामुळे स्टेट बँकेचे चीफ कॅशियर श्री. मल्होत्रा यांच्यावरील खटला काढून टाकला गेला आणि या प्रकरणावर पडदा पडला. त्यामुळे आता अजूनही राजमुकुटाच्या चोरीसारखीच ही राजपेढीतील (स्टेट बँक) ६० लाखांची चोरी 'करण्यात' आली असे तर्कवितर्क करण्यात काय स्वारस्य? श्री. मल्होत्रांना बँकेतून काढून टाकण्यात आले. ही शिक्षा त्यांना पुरेशी आहे. नव्हे कां?'

२६ जूनला आणीबाणी जाहीर झाली बरोबर एक महिन्यानंतरच्या २६ जुलै माणूस अंकात कथेचा हा शेवट सेन्सॉरच्या परवानगीने छापून येऊ कसा शकतो? आयुक्तांच्या कचेरीत संपादकांना पुन्हा बोलावले गेले. का बोलावले ते फोनवरून अगोदर सांगितलेले असल्याने संपादकही सेन्सॉरची सही शिक्क्याची प्रत घेऊन हजर झाले. ताकीद देण्याचा कार्यक्रम झाला. यावेळी फक्त तोंडी. संपादकांनी हळूच सेन्सॉरची मान्यता प्रत दाखवली. अधिकाऱ्यांचा चेहरा अगदी पाहण्यासारखा झाला!

'सेन्सॉरवाल्यालाच आता टप्पू घातला पाहिजे' असे म्हणत अधिकारी संपादकांबरोबरच खोली बाहेर पडले.

पुढचे १।२ अंक पड खाल्ली. वाईचे डॉ. शरद अभ्यंकर यांनी लिहिलेल्या सूचक नीतीकथाही सेन्सॉर संमत करीना. १५ ऑगस्ट अंक बंदच ठेवला आणि नंतरच्या अंकात खूप काटछाट होऊन आलेला भावा करमरकरांचा विधायक कार्यावरील लेख काटलेला भाग पांढराच ठेवून छापून टाकला. अंगावर कोड दिसावा तसा लेख दिसत होता. पांढऱ्या मोकळ्या जागेतील मजकूर सेन्सॉर झालेला आहे न सांगताच समजत होते. सेन्सॉरला हा अप्रत्यक्ष निषेध कसा मानवणार? त्यांनी हरकत घेतली. हरकत फार जोरदार वाटली नाही म्हणून ही कोड फुटलेली पाने 'माणूस' मधून जरूर वाटली तेव्हा पुढे येतच राहिली.

चौकटी वेगवेगळ्या वेळी, सुट्या सुट्या सेन्सॉरकडून मंजूर करून घ्यायच्या. त्यांची मांडणी एकत्रित करून हवा तो अर्थ वाचकांपर्यंत पोचवायचा–हीही एक चोरवाट या कठीण काळात 'माणूस'ला उपयुक्त ठरली.

ग्राहक चळवळीचा वर्धापन दिन आला. सप्टेंबर महिना. गणपती उत्सवही सुरूच होता. चित्रे टाकून टिळकांचा काळ आणि सद्य:स्थिती यातील साम्य सूचित करता येत होते. टिळकांच्या काळात गणेशोत्सवाने जी कामगिरी बजावली ती ग्राहक संघांनी आता बजवावी, इतपत उघडपणे लिहिलेले चालू शकले. भयंकर दडपशाही आणि भीतीच्या वातावरणातून टिळकांना वाट काढायची होती. निदान आरत्या म्हणायला तरी लोक एकत्र जमू देत. त्यातून हवा तो विचार, हवी ती धिटाई हळूहळू प्रगट होईल असा गणेशोत्सवामागील टिळकांचा हेतू होता. तेलातुपाचे वाटप करताकरता देखील असा काही अंतरीचा हेतू ठेवून कार्य करणे ग्राहक चळवळीला अशक्य नव्हते.

अनिल बर्वे यांची 'थँक्यू मि. ग्लाड' ही कादंबरी 'माणूस' मधून याच सुमारास आली. वाचक अक्षरशः थरारून गेले. कादंबरीचा नायक नक्षलवादी आहे की, नंतर झालेल्या कादंबरीच्या नाट्यानुवादाप्रमाणे क्रांतिसिंह आहे, हा सवाल नव्हता. एका जुलमी सत्तेशी झुंज घेणारा हा एक बेडर आणि ध्येयवादी तरुण आहे, याने वाचक विलक्षण प्रभावित झाले होते. वीरभूषण पटनाईकांच्या हौतात्म्याची ही एक ज्वलंत दाहक कहाणी होती. काळ्याकुट्ट अंधारात वीज चमकावी, क्षणकाल आसमंत उजळून निघावे तशी आणीबाणीत ही कथा चमकली–गाजली. खाडिलकरांच्या 'कीचकवधा'सारखा परिणाम तिने साधला.

पाठोपाठ कऱ्हाडचे साहित्य संमेलन आले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे छापील भाषण छापायचे नाही, अशा सेन्सॉरच्या आज्ञा भाषण झाल्यावर ताबडतोब सुटल्या. त्या फोनवरून दैनिकांना दिल्या गेल्या. त्यामुळे दुसऱ्या दिवशीच्या एकाही वृत्तपत्रात तर्कतीर्थांचे भाषण आले नाही. तुरळक ठिकाणी आले ते महत्त्वाचा शेवटचा लेखनस्वातंत्र्याचा उल्लेख गाळून. माणूस साप्ताहिक असल्याने अशी फोनवरून सेन्सॉरची आज्ञा काही त्यावर बजावली गेला नाही. या फटीतून सुटका होऊ शकली होती. सगळे भाषणच 'माणूस'ने छापून टाकले. साहित्य संमेलनावर व विशेषतः दुर्गाबाईंनी केलेल्या पराक्रमावर तर एक सोडून दोन लेख 'माणूस'ने दिले. अगदी संमेलनाच्या सुरुवातीला दिल्या गेलेल्या घोषणांच्या उल्लेखासहित.

□

'तर जपानमधल्या प्रस्थापितेच्या विरुद्धच्या लढ्याची ही आणखी

एक चित्रपट कथा. तिचं नाव तितकंच यथार्थ–' रिबेलियन.' एका पिसाट धर्मसत्तेविरुद्ध किंवा राजसत्तेविरुद्ध काही नगण्य पण सच्च्या माणसांनी दिलेली एक लढत '......ही सुरुवात आहे एका चित्रपट समीक्षणाची. समीक्षक आहेत अशोक प्रभाकर डांगे. असे कितीतरी परदेशी चित्रपट हुडकून हुडकून त्यांच्या कथा डांगे यांनी या काळात आवर्जून सादर केल्या.

' रिबेलियन 'चा प्रकाशनकाळ आहे २७ डिसेंबर १९७५.

आणीबाणीला फक्त सहा महिने झाले होते.

¤

याच सुमाराम सायक्लोस्टाइल्ड पत्रके, लेख वगैरे ' भूमिगत ' मजकूर बराच येत होता. एका पत्रकात ना. ग. गोरे यांचे आणीबाणी विरोधाचे लोकसभेतील भाषण सविस्तर दिलेले होते. त्यातील एक वाक्य छापण्याचा मोह अगदी अनावर झाला. ना. ग. गोरे यांनी या भाषणात सत्ताधारी पक्षाला टोमणा मारला होता –

' लोकशाही ही बुरखाधारी स्त्रीसारखी असावी काय, की तिला इतर कोणी पाहू नये, स्पर्श करू नये, केवळ सत्ताधारी पक्षालाच तिच्याबरोबर बोलता यावे ? '

लोकसभेतील भाषणे, भाषणातील काही भागसुद्धा छापण्यास तेव्हा बंदी होती. पण ' ना. ग. गोरे यांच्या नवी दिल्ली येथील एका अप्रकाशित भाषणातून...' असा मोघम संदर्भ देऊन वरील वाक्य ' माणूस 'ने मुखपृष्ठावरच छापून टाकले. हा अंक होता २७ डिसेंबर १९७५ चा. आणीबाणीची पहिली सहामाही जेमतेम पूर्ण झाली होती. वातावरण किती तंग होते, हवेत किती घबराट होता, हे सांगायला नकोच. तरीही वाटले होते, ही वाक्यप्रसिद्धी दुर्लक्षिली जाईल. पण अंदाज चुकला सेन्सॉरने कान पकडला. कळविले –
' आपल्या दिनांक २७ डिसेंबर ७५ च्या अंकातील मुखपृष्ठावर आपण खासदार श्री. ना. ग. गोरे यांच्या भाषणातील एक उतारा संदर्भविरहित व भडकपणे उद्धृत केला आहे.

' सदर बाब ही गाईडलाईन्समधील सूचनांशी विसंगत असून आक्षेपार्ह आहे. याची आपण नोंद घ्यावी व इतःपर याबाबतीत खबरदारी घ्यावी. '

¤

' माणसातील अपूर्वाई बुद्ध्याच वा बेपर्वाईने चिरडून टाकणारा समाज पुरता मुर्दाड आणि पूर्वपरंपरावादी, गतानुगतिक बनतो. त्या समाजाची प्रगती खुंटते, किंबहुना अशा समाजाच्या स्वतंत्र अस्तित्वाचे प्रयोजनच नाहीसे होते '......नवीन वर्षाची ( ७६ ) ही सुरुवात. थोर व्यक्तिस्वातंत्र्यवादी विचारवंत बर्ट्रांड रसेल यांचे लिखाण माणूसमधून प्रसिद्ध होऊ लागले. वरील अवतरण तर मुखपृष्ठावर दिले होते !

याच ३ जानेवारी अंकात देवीदास बागुल यांचे ' झेड ' या चित्रपटाचे परीक्षण आहे. ' एकला चलो रे 'चे निखळ धैर्य दाखवणारा एक न्यायाधीश, पोलीस–राजकीय गुंड यांच्या दडपणाला बळी न पडता निर्भयपणे खरी साक्ष देणारा एक सामान्य कामगार. सर्व समाज मुर्दाड बनला तरी माणसातील चैतन्य जागे आहे, ही श्रद्धा जागवणारी ही चित्रपटकथा.....

' मनु 'शासन पर्वाकडे ' हे संपादकीय.

हा सगळा अंकच स्फोटक होता.

¤

रसेलनंतर कुरुंदकरादिकांचे स्वातंत्र्यविषयक लेख –

स्वामी रामानंदतीर्थांच्या विस्तृत कार्याची ओळख –

श्री. मा. भावे यांनी महाभारतातील कथांतून सांगितलेले आधुनिक भारत –

प्रा. बिवलकर यांनी केलेले वीस कलमी कार्यक्रमाचे परखड विवेचन –

' कोणीतरी रानडुकराच्या विरोधात उभे राहण्याची हिंमत करायला हवी ' , ' राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली माझ्या राष्ट्राच्या रंगभूमीचा गळा दाबण्यात आला आहे ' असे भेदक मथळे–

धारियांची तुरुंगात घेतलेली मुलाखत–

' आचार्यांचे निवेदन स्वीकारून आणीबाणी उठवा, ' अशी संपादकीयातून केलेली स्पष्ट मागणी–

रत्नाकर महाजनांनी दिल्लीमधील विचारवंत–कार्यकर्ते यांच्या घेतलेल्या लोकशाही संघटक मुलाखती–

' बकऱ्याची गोष्ट ' सारखी एखादी उपरोध कथा–

संजय गांधींचा भस्मासूर याच सुमारास उदयास येत होता. वृत्तपत्रांतील त्यांची मोठमोठी छायाचित्रे आणि भाषणांचे अहवाल वाचून आतल्या आत माणसे चरफडत होती. सार्वत्रिक लाचारीची किळस वाटू लागली होती. या परिस्थितीत ' माणूस ' मधील ' संजयोवाच ' या उपरोधिक स्फुटाचे वाचकांकडून प्रचंड स्वागत व्हावे, यात नवल नाही. तोवर मराठीत तरी संजयस्तोमाची अशी टर उडवणारे, त्यांची खरी लायकी त्यांना दाखवणारे एक अक्षरही कुठे प्रसिद्ध झालेले नव्हते. नंतरही नाही. त्यावेळी जो भेटेल तो कळवत होता–' माणूस 'ने सर्वांच्या मनात जे डाचत होते, ते व्यक्त केले. लेखक कोण म्हणून चौकशी सुरू झाली. ' बकऱ्याची गोष्ट ' आणि ' संजयोवाच ' या दोन स्फुटांवर शासनाची विशेष नजर होती. त्यावर लेखकाचे नाव दिलेले नव्हते. आता ते जाहीर करायला हरकत नाही. वि. ग. कानिटकरांनी ही दोन्ही स्फुटे लिहिलेली होती. खूप दडपणे आली. ' माणूस ' कचेरीत काम करणाऱ्यांकडून लेखकाचे नाव काढून घेण्याचेही विश्रामबाग पोलिसांकडून ( L. I. B. ) प्रयत्न झाले. पण पोलिसांची डाळ मुळीच शिजली नाही.

¤

पापाचा (!) घडा मात्र भरून आला होता.

मध्यंतरी नसलेली ' प्री–सेन्सॉरशिप ' माणूसवर लादली गेली.

काही अंक शासनाने ' आक्षेपार्ह ' ठरवले. एकूण दहा.

' माणूस 'कडून एक हजाराचा जामीन मागितला गेला.

वृत्तपत्रनियंत्रण कायद्याच्या चौकटीत राहून हे सर्व लिखाण ' माणूस 'ने प्रसिद्ध केले होते. त्यामुळे ते आक्षेपार्ह ठरू शकत नाही, अशी ' माणूस 'ची भूमिका होती. पण अधिकाऱ्यांना सांगून–पटवून काही फायदा नव्हता. अधिकारी वर बोट दाखवीत. गृहखात्याला विचारा असे सांगत. सचिवालयात तर तेव्हा पाऊल ठेवावेसे वाटत नव्हते स्वाभिमानाचे इंद्रिय बाहेर ठेवूनच अशा ठिकाणी त्या काळात जावे लागत होते. हाराकिरी करून ' माणूस ' बंद पडू द्यावा, या विचाराने सर्वात जास्ती उचल घेतली असेल ती या काळात. प्रत्येक अंक म्हणजे एक नवे संकट होते. नवे आव्हान होते. एक तरी स्वतंत्रतेची, अस्मितेची, जीवंतपणाची खूण प्रत्येक अंकात उमटली पाहिजे, असा हट्ट होता आणि शासन तर नाकेबंदी करायला, अस्तित्व कागदोपत्री शिल्लक ठेवून प्रत्यक्षात अशक्यप्राय करून टाकायला टपलेलेच दिसत होते.

एखादे पत्र येई आणि काही काळ दिलासा देऊन जाई. सध्या चाळीसगावला असलेले, मराठवाड्यातील घटनांवर माणूसमधून पूर्वी अधूनमधून लिहिणारे श्री. देवदत्त तुंगार यांनी लिहिले होते :
' माणूस 'मधील काही लेखन स्वातंत्र्यपूर्वकाळातील शिवरामपंतांच्या

अन्योक्तीपूर्ण लिखाणाची आठवण करून देते. 'साधनाचे' काम सरळसोट व 'मुले कुठार' 'स्वरूपाचे वाटते...' वगैरे...वगैरे...

मित्रमंडळी अंक बंद करण्याच्या विचारापासून परावृत्त करीत. आर्थिक ओढाताण तर असह्य होऊ लागली होती. थोड्याफार जाहिराती पूर्वी मिळत, त्याही सरकारने 'काळी यादी' ठिकठिकाणी पाठवून बंद करून टाकल्या.

जामीनाविरुद्ध एकीकडे हायकोर्टात जायचे ठरवले. कारण १० अंक कारणे न दाखवता 'आक्षेपार्ह' ठरवणे हा धडधडीत अन्याय आणि अवमान होता आणि जामीनामुळे पुढे कळत न कळत बंधने आणि दडपणे वाढत जाणार होती, हे उघड दिसत होते.

एक निरोपाचा अग्रलेखही या मन:स्थितीत लिहून ठेवला. कारण 'पकडले जाणार' अशी अफवा होती आणि बाहेर राहूनही अशा स्थितीत फार काळ 'माणूस' चालू राहील, अशी शक्यता नव्हती. ◻

या निरोपाच्या अग्रलेखात मी नेहमीचा 'माणूस' बंद झाला तरी दोन विशेषांक वाचकांच्या हाती देण्याची योजना मांडली होती. एक मानवेन्द्रनाथ रॉय अंक. दुसरा पं. दीनदयाल उपाध्याय अंक. दोन थोर मानवतावादी विचारवंत. एक साम्यवादाकडून मानवतावादाकडे आलेला. दुसरा राष्ट्रवादातून मानवतावादात उत्क्रांत झालेला. 'माणूस' वर या दोघा विचारवंतांचे काही ऋण होते. या ऋणांतून मुक्त होण्याची कल्पना या अंकामागे होती.

पण कोणाचा तरी मदतीचा, सहानुभूतीचा स्पर्श लाभे आणि 'शेवटचा अंक' पुढे पुढे ढकलला जाई. 'निरोपाचा अग्रलेख' २-४ आठवडे तसाच टेबलावर लोळत पडला होता. एकदा तर 'छापून टाका' असे सांगून मी सहसंपादक दिलीप माजगावकरांच्या तो हवाली करून मुंबईला रॉय अंकाच्या तयारीसाठी निघूनही गेलो होतो.

परत येऊन पाहतो तो सहसंपादकांनी तो टेबलाच्या खणात ठेवून दिलेला दिसला !

स्वतंत्र विचारांची चारी दिशांनी कोंडी झालेल्या वातावरणात रॉय अंक निघाला म्हणून त्याचे खूप स्वागत झाले. प्रसिद्ध विधायक कार्यकर्ते आबा करमरकर एक दिवस सकाळी घरी आले आणि 'Manoos has done a yeoman service' असा या अंकावरचा अभिप्राय त्यांनी दिला. त्यांना या अंकावर, त्यातील विचारांवर एक स्वतंत्र लेख लिहायचा होता. मुंबईहून 'टॉलस्टॉय' लेखिका सौ. सुमती देवस्थळे यांनी फोन करून अंकाचे स्वागत केले. एवढ्या गंभीर प्रकृतीचा अंक पण प्रती कमी पडल्या. सर्वसामान्य वाचकांनाही यातील स्वतंत्र विचारांची एवढी ओढ त्या बंदिस्त काळात जाणवत होती, हा याचा अर्थ. तुरुंगात अंकावर चर्चासत्रे झाली–महाराष्ट्रातील अग्रेसर विचारवंतांनी रॉय यांच्या माध्यमातून स्वातंत्र्य, लोकशाही या कल्पनांचा केलेला पुरस्कार अंकाच्या पानापानांतून उमटलेला होता. अगदी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा या अंकातील लेखही याला अपवाद नव्हता.

रॉय अंकाव्यतिरिक्त 'सोल्झेनित्सिन'च्या 'फर्स्ट सर्कल' कादंबरीतून निवडून अनुवादित केलेले ५ लेख आणि श्री. पु. ल. इनामदारांची लेखमाला ही या प्रीसेन्सॉरशिप कालखंडातील विशेष उल्लेखनीय प्रसिद्धी होती. सोल्झेनित्सिनने वर्णन केलेला स्टॅलिन-काळातील भयग्रस्त रशिया, लाचारीने भरलेले रशियन समाजजीवन यांची अचूक आणि भेदक वर्णने येथील परिस्थितीशी तंतोतंत जुळणारी होती. 'त्याने (स्टॅलिनने) कोणावरही कधीही विश्वास ठेवला नाही,' असा एखादा मथळाही परिस्थितीचे साम्य चटकन जुळवून टाकी. मजकूर तपासून आणून असे मथळे नंतर टाकण्याचे स्वातंत्र्य अधूनमधून घेऊ दिले जात होते. आणीबाणीतील वृत्तपत्र-बंधनांमुळे वाचकही हळूहळू सूचितार्थ शोधायला तत्पर आणि तयार होऊ लागल्याचा एक वेगळाच सुखद अनुभव या काळात खूपदा येऊन गेला. वाचकांची जाण वाढली होती किंवा असलेल्या जाणिवेला अधिक धार व सूक्ष्मता आली होती, असेही म्हणता येईल. भयाण शांततेत एखादी टाचणी पडल्याचा आवाजही ऐकू यावा तसा एखादा शब्द, एखादी कवितेची ओळही वाचकांच्या अंत:करणाला थेटपर्यंत जाऊन भिडत होती.

एकदा 'साधना' साप्ताहिकाची विनामूल्य प्रसिद्धीसाठी आलेली जाहिरात छापून पाहिली. 'तीन दिवसांत खुलासा करा,' असा प्रीसेन्सॉरचा खलिता धडकलाच. 'मजकूर दाखवायला हवा, असा हुकुमाचा अर्थ केला. जाहिरातीही छापण्यापूर्वी सेन्सॉरला दाखवायला हव्यात, असे हुकुमात स्पष्टपणे म्हटलेले नव्हते,' असा खुलासा पाठवून वेळ निभावून नेली. ही जाहिरात साधनेने सर्व वृत्तपत्रांकडे पाठवली होती. कुणीही छापल्याचे दिसले नाही.

पु. ल. इनामदारांची 'लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी' ही लेखमाला प्रीसेन्सॉरच्या पहाऱ्यातून त्यामानाने सहीसलामत बाहेर पडली. शेवटी शेवटी मात्र सेन्सॉर जागे झालेले दिसू लागले. बहुधा वरून काही तरी लिहून आलेले असावे. विरोधी मतांचे वाचकही रागाच्या आणि उत्साहाच्या भरात सेन्सॉरला, पोलिसांना टेलिफोन करून सावध करीत असत, त्याचाही हा परिणाम नसेलच असे नाही. पण १-२ वेळा कात्री लागली हे पाहिल्यावर ताबडतोब पुस्तकप्रसिद्धीचा निर्णय घेतला, कारण पुस्तक सेन्सॉरसाठी पाठवायचा हुकूम काही तोवर बजावला गेलेला नव्हता. पुस्तकरूप दिल्यामुळे प्रास्ताविक विनाखटक छापता आले, जे छापले जाणे त्या वेळी तरी फार महत्त्वाचे होते, आवश्यक आणि अर्थपूर्ण होते. ही सर्व लेखमालाच फार संयमित, काटेकोर आणि अतीव जबाबदारीच्या जाणीवेने लिहिली गेलेली आहे. तरीही विचार स्पष्ट व ठाम आहेत. प्रास्ताविकात इनामदारांनी लिहिले होते :

'धूर आहे तेथे वन्ही, लपवालपवी आहे तेथे पाप, तसेच जेथे भीतीचे वातावरण असते तेथे दादागिरी करणारे हुकूमशहा असतातच. नागरिक अनुशासनाने राष्ट्राची आर्थिक परिस्थिती सुधारणे अत्यावश्यक आहेच. पण त्याबरोबरच काही प्रश्न स्वत:लाच विचारीत राहणे आवश्यक आहे, असे मला वाटते. हितकर विचार–उच्चार–स्वातंत्र्य सर्वांना आहे का ? निष्पक्ष व निर्भीक न्यायपीठे आहेत का ? न्याय मागण्याचे सर्व दरवाजे खुले आहेत का ? शासकीय यंत्रणा पक्षविरहित आहे का ? एकच एक सत्ताधिष्ठित राजकीय पक्ष–प्रचारावर पोसणारी पद्धती संसदीय पद्धती होईल का ? अनुशासनाच्या उन्मादात सुक्याबरोबर ओलेही जळत आहे का ? इत्यादी व असे अनेक प्रश्न भारतातल्या प्रत्येक नागरिकाने स्वत:लाच विचारून त्याची उत्तरे शोधायची आहेत. एरवी भारतीय नागरिकाचे वयस्क मतस्वातंत्र्य (adult franchise) 'हाकलेली मेंढरे' अथवा 'विकत घेतलेले पाठबळ' या स्वरूपाचे राहील.'

इनामदारांचे पुस्तक तडकाफडकी काढून अभिप्रायार्थ सर्वत्र पाठविले खरे, पण एकाही वृत्तपत्रात अभिप्राय छापून आला नाही. पहिला अभिप्राय झळकला तो नागपूर 'तरुण भारत'मध्ये. अर्थात आणीबाणी उठल्यानंतर, अगदी अलीकडे. आता आणखी ठिकाणी येऊ लागले आहेत. इनामदारांना पुण्याच्या साहित्य परिषदेने व्याख्यानाचे

निमंत्रणही पाठविले आहे असे कळते. आनंद आहे. त्यावेळी असे प्रोत्साहन मिळत गेले असते तर थोडी होरपळ कमी झाली असती इतकेच !

जॉर्ज फर्नांडिस यांच्या बडोदा डायनामाईट केसमध्ये सरकार आणि सरकारचे पोलीस खाते यांच्याकडून गुन्हा हुडकण्यासाठी, यामागे मोठा कट होता हे सिद्ध करण्यासाठी जो आटापीटा सुरू होता, त्यावर या लेखमालेमुळे अप्रत्यक्ष असा खूपच प्रकाश पडत होता. त्यावेळचे (१९४८–४९) आणि आजचे, राजकीय विरोधकांना खतम् करण्याचे तंत्र काही बदलले नव्हते, याची जाणीवही तिचे मोल वाढण्याचे आणखीही एक कारण ठरत होती.

¤

या कठीण काळात अॅडव्होकेट दळवींचा आम्हा सर्वांनाच फार आधार होता. 'माणूस', 'साधना,' रत्नागिरीचे 'समानता' आणखी खानदेशकडील एक नियतकालिक (नाव आता आठवत नाही) या सर्वांची हायकोर्टांची बाजू दळवींनी सांभाळली आणि तीही जवळ जवळ विनामूल्यरीत्या. सुरुवातीला 'माणूस'चे व त्यांचे संबंध औपचारिक स्वरूपाचे होते. पण माणूस 'रॉय'वर अंक काढतो आहे, हे पाहिल्यावर संबंधातला औपचारिकपणा संपला आणि हा अंक यशस्वी करण्यासाठी दळवीच सर्व ठिकाणी पुढाकार घेऊ लागले. रॉय आणि सावरकर ही तरुणपणीची त्यांची दैवतं होती. या दैवतांनी त्यांना आणीबाणीच्या कठीण काळात नागरिक–स्वातंत्र्यासाठी झगडण्याची स्फूर्ती दिली म्हणायची ! पण ते आणि हायकोर्टातील त्यांचे काही सहकारी, दिल्लीचे बॅ. तारकुंडे वगैरे लोक यांचा या काळात आधार मिळाला नसता तर, निदान 'माणूस'ची तरी धडगत नव्हती. कारण 'माणूस' मागे एखादी संस्था उभी नव्हती. पक्षाचे किंवा नामवंत व्यक्तींचे पाठबळही नव्हते. सगळ्या आघाड्यांवर एकट्यालाच तोंड द्यावे लागत होते. दळवींसारख्या निरपेक्षतेने काम करणाऱ्या व्यक्ती त्यामुळे खूपच आधार देऊन गेल्या.

¤

असाच दळवींकडे एकदा डोकावलो होतो. इतर बोलणे झाल्यावर त्यांनी बाजूला पडलेल्या एका पुस्तकाचा उल्लेख केला. पुस्तकाचे नाव होते R Document 'ताबडतोब पुस्तक विकत घेऊन जमेल त्या स्वरूपात माणूसमधून छापून टाका. पुस्तकावर बंदी येण्याची शक्यता आहे. अगदी आपल्याकडील सध्याच्या परिस्थितीवरच जणू काही लिहिले आहे.' दळवी म्हणाले.

आदल्याच दिवशी महाराष्ट्र टाईम्सचा वार्ताहर अशोक जैन भेटला होता. त्याने एक 'भयंकर' पुस्तक हाती आले आहे आणि 'माणूस'साठी आपण ते अनुवादित करत आहोत, असे उडत उडत सांगितले होते.

पुस्तक विकत घेतले. जैन आणि दळवी यांची निवड एकच निघाली. आणखीही ७/८ जणांनी तरी 'हे पुस्तक आम्ही अनुवादित करतो' असे कळवले, इतकी या पुस्तकाची तेव्हा हवा होती. मुख्य प्रश्न अर्थात 'पुस्तकावरील संभाव्य बंदी' किंवा 'सेन्सॉरची कात्री' हा नसून जैनकडून हा अनुवाद वेळेवर कसा मिळवायचा हा आहे, हे लवकरच मुंबईकर मित्रांनी ध्यानात आणून दिले आणि माणूसवरील लोभाखातर त्यांनीच 'जैन पाठलाग मंडळ' स्थापन करून कामाची वाटणी करून घेतली. पुष्पा भावे, अनंतराव भावे, रामदास भटकळ, अरूण साधु, दिनकर गांगल वगैरे मंडळ सदस्यांनाही जैन पुरून उरतो आहे हे लक्षात येताच दि. वि. गोखले यांचीही मदत घेणे शेवटी भाग पडले. अखेरीस जैन नामोहरम झाला. आपली पुरती कोंडीच झाली आहे, हे ध्यानात आल्यावर मात्र गडी भलताच तडफदारवान आणि दमदार निघाला. अक्षरशः चार दिवसांत त्याने कामाचा फडशा पाडला. मुळातले काही कमी न होऊ देता, कमीत कमी जागेत, सरस अनुवाद वेळेवर पाठवून, त्याने गेल्या वर्षीची दिवाळी गाजवून सोडली. दीड–दोनशे दिवाळी अंक निघाले. फक्त दोन दिवाळी अंकात राजकीय परिस्थितीवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रकाश टाकणारी काही चर्चा, काही लेख, साहित्य आले होते. एक निळू दामले याने संपादित केलेला 'मराठवाडा' दैनिकाचा दिवाळी अंक. आणि 'माणूस.' बाकी अंक काव्यशास्त्र-विनोदात–ललित साहित्यात आकंठ बुडालेले. देश प्रचंड काळोखात आहे, लाखावर निरपराधी लोक गजाआड बंदिस्त आहेत, घटनेची मोडतोड सुरू आहे याची गंधवार्ता जणू या दिवाळी अंक काढणाऱ्यांना नसावी ! आणीबाणी सगळेच जण विसरले होते. गेल्या वर्षीचा लेखकांचा, कुठल्याही दिवाळी अंकात निषेध म्हणून न लिहिण्याचा क्षीण असा संकल्पही बारगाळला होता. ही पार्श्वभूमी होती 'आर. डॉक्युमेंट'च्या प्रसिद्धीची. त्यामुळे अंक निघाल्याबरोबर संपादक-सहसंपादकांना अटक झाल्याची अफवा जोरात फैलावली, यात नवल नव्हते. एक-दोन ठिकाणी पोलिसांनी अंक जप्तही करून नेला होता. कोणीतरी खोडसाळपणा केल्यामुळे अंक पोस्टातही थोडा रखडला. अफवा पसरायला एवढी कारणे पुरेशी होती. सेन्सॉरच्या कात्रीतून अशी 'भयंकर' खळबळ उडवून देणारा मजकूर सुटला कसा हे मात्र 'गुपित'च राहिलेले बरे. सगळ्या चोरवाटा उघड करणे शहाणपणाचे नाही. मजकूर सुटला नसता तर मात्र कर्जाचा डोंगर उरावर घेऊन माणूस दिवाळीतच गाडला गेला असता, यात काही शंका नाही. इतका मोठा धोका त्यावेळी पत्करलेला होता.

जैनचीही कमाल होती. एका साखळी वृत्तपत्रात काम करून त्याने माणूसबरोबर हा धोका पत्करण्याची तयारी ठेवावी, हे त्यावेळी तरी विशेष धाडसच होते.

या धाडसाचे शेवटी चीज झाले. अनेकांनी जैनची पाठ थोपटली, त्याला मनापासून शाबासकी दिली. तुरुंगातून बापू काळदाते यांचे पत्र यावे, हा तर या सर्व स्वागताचा कळस होता.

तुरुंगात या अनुवादावर व्याख्यानमाला गुंफल्या गेल्याचेही नंतर कळले.

आणखी काय हवे होते ? ज्यांच्या डोळ्यासमोर दिवाळी असूनही अंधार होता, त्यांना प्रकाशाचे, उत्साहाचे चार क्षण जर या अंकाने दिले असतील तर, आणखी कुठली सफलता हवी होती ?

आणीबाणीविरुद्ध गजाआडून ते लढत होतेच.

गजाबाहेरूनही त्यांना साथ देणे हे आपले कर्तव्यच नव्हते का ?

इनामदार-जैन अशांसारख्या नव्या किंवा अनंतराव-कानिटकर-भावे या जुन्या लेखकांच्या व इतर अनेक लेखक-मित्रांच्या साहाय्याने हे कर्तव्यपालन 'माणूस'ने केले, इतकेच.

गाजावाजा न करता, वावदूकपणा टाळून, सातत्याने,

यात असलेच श्रेय तर सर्वांचे.

किंवा या कठीण काळात 'माणूस' बंद न पडू देणाऱ्या कुठल्या तरी अज्ञात शक्तीचे.

या विराट अज्ञातासमोर 'माणूस' नम्र आहे.

म्हणूनच कदाचित तो या विलक्षण भयपर्वातही ताठ मानेने जगू शकला, निर्भय राहू शकला. ☐

# चक्रम्‌चक्री (९)

दीर्घस्मृती विश्वनाथ

## त्यांना क्षमा नाही

गेल्या निवडणुकीत स्वतःची जागाही गमावल्यानंतर बाईंची प्रतिष्ठा गर्तेत बुडाली होती. पण आता मात्र झालेल्या विध्वंसाची बाईंवरील जबाबदारी कमी करण्याचे आणि बाईंच्या राजकारणातील पुनःप्रवेशासाठी झाला उकीरडा स्वच्छ करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

आणीबाणीच्या घोषणेनंतर बाई चांडाळ-चौकडीच्या कचाटयात सापडल्या, असे कम्युनिस्ट आणि त्यांचे सहप्रवासी म्हणतात.

आणीबाणी आता विसरा; जुना कोळसा उगाळू नका, असे यशवंतराव आणि कमलापती त्रिपाठी म्हणतात.

बाईंच्या पराभवाबद्दल सार्वत्रिक हळहळ वाटली, असे राम बापटांसारखे ढावखुरे घोळून घोळून सांगतात.

पराभवाला काही एक वास्तव कारण नसून आक्रस्ताळ्या प्रचाराला कॉंग्रेस बळी पडली, असे खुद्द माजी पंतप्रधान म्हणतात.

बाई परत राजकारणात येतील न येतील; पुनः पंतप्रधान होतील न होतील; या गोष्टी बाजूला ठेवल्या तरी, ज्या प्रकारचे राजकारण या देशात चालेल अशी अपेक्षा आहे, त्या राजकारणात बाईंचे काही स्थान असू शकेल की नाही ?

### राजकारणाची धाटणी

परवाच्या निवडणुकीत एक गोष्ट स्पष्ट झाली आहे. ती ही की, डाव्या-उजव्या आर्थिक विचारसरणींच्या पलीकडे असलेले लोकशाही राजकारण जनतेच्या दृष्टीने अधिक मूलभूत महत्त्वाचे आहे. याचा अर्थ विशिष्ट आर्थिक विचारसरणीला राजकारणात स्थान नाही असे नाही; पण लोकशाही राजकारणाच्या प्रक्रिया आमचे आर्थिक विचार प्रत्यक्षात आणण्याच्या आड येतात म्हणून राजकीय प्रक्रियांवर दडपणे कोणी आणू पाहिल तर, तो प्रयत्न सहन केला जाणार नाही. आज बाईंच्या पराभवाविषयी हळहळणाऱ्या मंडळींनी हे लक्षात घेतले पाहिजे की, आणीबाणीपूर्वी देखील राजकारणाच्या धाटणीत आम्ही आमचा समाजवाद बसवू शकत नाही, हे कॉंग्रेस पक्षाने—बाईंच्या नेतृत्वाखालील कॉंग्रेस पक्षाने अनेकदा स्पष्ट म्हटले होते. निरनिराळ्या घटनादुरुस्त्या त्याचेच द्योतक होत्या.

अशा या राजकीय प्रक्रिया कोणत्या ?

लोकशाही राजकारणाची मूलभूत किंवा प्रधान प्रक्रिया म्हणजे कोणत्याही प्रश्नाविषयी निर्णयक्षम बहुमत सार्वजनिक चर्चेतून निर्माण करणे ही होय. ही प्रक्रिया व्यवस्थित चालू राहण्यासाठी राजकीय पक्ष, संसद, स्वतंत्र वृत्तपत्रे इत्यादी सार्वजनिक संस्था निर्माण केल्या जातात. अशा संस्थांत कामे करणाऱ्या कार्यकर्त्यांतून राजकीय नेते बनतात. अखेर निर्णयक्षम बहुमत अशा राजकीय नेत्यांचा परस्पर संबंधांतून किंवा सोयरिकीतून तयार होत असते. आपण सामान्य माणसांनी निवडणुकीत दिलेली मते, त्यामुळे निवडून आलेले प्रतिनिधी आणि त्यांच्या चर्चेतून लोकसभेत मंजूर झालेली विधेयके यांना केवळ तात्त्विक किंवा प्रसंगतः येणारे महत्त्व आहे. प्रत्यक्ष राजकीय व्यवहार हा मी सांगितले त्याप्रमाणे राजकीय सोयरिकीतूनच घडत जात असतो.

पण या सोयरिकी हाच राजकारणाचा सगळ्यात डागीळ भागही आहे बाईंचे एकमुखी नेतृत्व सिद्ध होण्यापूर्वी म्हणजे जानेवारी ६६ पासून तो ऑगस्ट ६९ पर्यंत अशा राजकीय सोयरिकींना नुसता ऊत आला होता. आयाराम—गयाराम हा प्रकार तरी राजकीय सोयरिकीचाच भाग आहे की नाही !

राजकीय मैत्री किंवा सोयरिकी यांना बरेचदा हे ओंगळ अंग असते यात शंका नाही. माणसांच्या संबंधाला भ्रष्टाचाराचे थोडेफार वंगण लागले नाही असे क्वचितच घडते. पण याचा अर्थ असा नाही की, राजकीय नेत्यांनी केलेली गटबंधने नेहमीच भ्रष्टाचाराच्या धाग्यांनी बांधलेली असतात. उदाहरणार्थ, नेहरूंच्या मृत्यूनंतर शास्त्रींना पंतप्रधान करण्यासाठी कामराज, स. का. पाटील, अतुल्य घोष या नेत्यांनी सिंडिकेट तयार केली, त्यावेळी ते केवळ सत्ताकांक्षेने आणि सत्तेपासून मिळणाऱ्या आर्थिक लाभांसाठी एकत्र आले होते असे म्हणता येणार नाही.

या सिंडिकेटचा बाईंनी चुटकीसरसा पराभव केलाच की नाही ?

सिंडिकेटचा बाईंच्या हातून पराभव झाला तो सिंडिकेटमधील नेते भ्रष्टाचारी होते म्हणून नव्हे, तर जनतेत त्या नेत्यांना स्थान नव्हते असे ६७ सालच्या निवडणुकीत सिद्ध झाले म्हणून. जनतेच्या मतांना प्रसंगतः महत्त्व येते असे मी म्हणालो ते या अर्थाने. दुसरे असे की, राजकीय सोयरिकीची जी नीती असते तीही बाईंनी पाळली नाही. बाईंचे नेतृत्व राजकीय प्रक्रियांच्या साच्यात बसणारे नाही असे मी म्हणतो, त्याचे कारण हे आहे.

उदाहरणांनी बोला, नुसती शेरेबाजी नको.

पाहा कसे ते. ६७ साली मोरारजीभाईंनी बाईंच्या मंत्रिमंडळात उपमहामंत्रिपद स्वीकारले तेव्हा बाईंनी मोरारजींशी एक राजकीय नातेगोते घडवले. या राजकीय नात्यातून त्या कशा बाहेर पडल्या ? खुद्द मोरारजींनीच त्याचे वर्णन केले आहे की, ' एखाद्या प्यूनला कामावरून काढावे असे मला घालवून देण्यात आले !' त्याच वेळेस संजीव रेड्डींच्या राष्ट्रपतिपदासाठीच्या उमेदवारीस त्यांनी लेखी अनुमोदन दिले; म्हणजेच कॉंग्रेस श्रेष्ठींशी त्यांनी एक गटबधन सिद्ध केले. त्याचा शेवट काय झाला, तर एका मध्यरात्री त्यांनी निजलिंगप्पांना कळवून टाकले की, 'ज्या पायावर रेड्डींना पाठिंबा देण्याचे मी कबूल केले होते तो पाया आता उरला नाही !' थोडक्यात म्हणजे वचने मोडणे, दिलेला शब्द न पाळणे, होत्याचे नव्हते आणि नव्हत्याचे होते करणे. अशा खोटेपणावर आणि राजकीय मैत्रीचे पावित्र्य धुळीत मिळवून बाईंनी वर्चस्व मिळविले.

पण त्यावेळेस तर बाईंच्या राजकीय चातुर्याचे केवळ कौतुक होत होते ? अ. भि. शहांसारखे लोक बाईंच्या ' कंट्रोल्ड क्रायसिस ' हाताळण्याच्या कौशल्याने गोडवे गात होते.

शहाच कशाला, आपल्या ' माणूस ' चे तेव्हाचे प्रतिनिधी चंद्रशेखर यांचे लेखही पाहा !

याचे कारण असे की, राजकीय सोयरिकी आणि त्यांचे ओंगळवाणे रूप यांच्यात आपण गल्लत करत होतो. त्यातून बाईंनी बँकांचे राष्ट्रीयीकरण करून तथाकथित डाव्यांना खूष केले. त्यामुळे समाजवादाचे काय भले झाले असेल ते असो, पण बाईंचा खोटेपणा लपला एवढे खरे.

बाईंना जर राजकीय करार-मदार पाळणे अशक्य वाटत असेल तर, त्यांनी काय करावे?

राजकीय मैत्री कायमची असते अगर असावी, असे कोणीच म्हणणार नाही. किंबहुना, नवीन राजकीय गट तयार होणे आणि जुने मोडणे हेच तर राजकारण आहे. तथापि या राजकीय सोयरिकी मोडतानाही काही शिष्टाचार पाळले पाहिजेत. इंग्लंडमधलेच उदाहरण घ्या. १९१६ पासून २२ सालापर्यंत लॉईड जॉर्जचा लिबरल पार्टीचा गट आणि कॉन्झर्व्हेटिव्ह पक्ष यांचे संयुक्त मंत्रिमंडळ होते. २२ साली कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाला ही सोयरिक जड वाटू लागली. बाई जर, कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाच्या नेत्या असत्या तर त्यांनी एका रात्री कॉन्झर्व्हेटिव्ह खासदारांची सभा घेऊन दुसऱ्या दिवशी अचानक अविश्वासाच्या ठरावावर मंत्रिमंडळाला पराभूत करावे असे ठरविले असते. पण कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाचा नेता बोनार लॉ याने तसे केले नाही. कॉन्झर्व्हेटिव्ह खासदारांच्या एका जाहीर सभेत मतदानाने, स्थूलमानाने असे ठरविण्यात आले की, निवडणुकीपर्यंत संयुक्त मंत्रिमंडळ राहावे की नाही याचा विचार व्हावा. यावरून सूचना मिळून लॉईड जॉर्जने राजीनामा दिला. बोनार लॉ पंतप्रधान झाला आणि त्याने दोन महिन्यांत नव्या निवडणुका घेतल्या. महत्त्वाची गोष्ट अशी की, यात आपला बळी दिला गेला अशी भावना लॉईड जॉर्जची अगर त्याच्या अनुयायांची झाली नाही. याउलट जगजीवनरामांनी बाईंना स्पष्टच सुनावले होते की, 'तुमच्या राजकीय बळींची यादी एकदा करा बघू.' बाईंच्या राजकारणात – आणीबाणीपूर्वीही हा विखार होता. आणीबाणीच्या अंमलात तर काय, जगजीवनरामांना जीविताची सुद्धा शाश्वती वाटत नव्हती.

## लोकशाही संस्था

बाईंचा हा खोटेपणा जनतेच्या पाठिंब्याविषयींच्या विश्वासावर आधारलेला होता की नाही ? ६९ सालच्या या खोटेपणानंतर देखील लोकांनी बाईंना आणि त्यांच्या पक्षाला प्रचंड बहुमताने निवडून दिलेच ना?

याचे कारण इतकेच की, मोरारजी, निजलिंगप्पा वगैरे मंडळींना लोकात अप्रिय करण्यात बाईंनी यश मिळविले होते. समाजवादाच्या गुलाबी गप्पांनी निर्णय घेण्याची विवेकशून्य तडफ दाखवून बाईंनी जनतेला गुंगी आणली होती. आपण काही करण्याची जरूरी नाही, जादूची कांडी फिरवून बाई संपत्तीचा पूर येथून वाहून दाखवतील, अशी तर्कशून्य समजूत जनतेची झाली. गिरींच्या निवडणुकीच्या प्रकरणात बाई काँग्रेस नेत्यांना वारंवार सांगत होत्या की, तुम्ही काँग्रेस संघटनेचे नेते आणि काँग्रेस पक्ष यांच्या मध्यस्थीला बाजूला सारून मी जनतेपर्यंत पोचू शकते. त्याचे प्रत्यंतर त्यांनी सर्व वैध–अवैध मार्गांचा अवलंब करून घडविले.

म्हणजे बाईंना एक्काहत्तर साली मिळालेले बहुमत खोटे होते, असे तुम्हाला म्हणायचे आहे ?

बाईंना मिळालेले बहुमत खोटे नव्हते. पण पक्ष, पक्षीय नेते यांच्या डोक्यावरून मी जनतेपर्यंत पोचते हा त्यांचा विश्वास घातक होता. त्यांनी पुढे धारण केलेल्या हुकूमशहाच्या अवताराचे बीज येथे होते. लोकशाहीत जनता सरकार घडवते हे खरे आहे, पण काही मर्यादेपर्यंतच. सरकार घडवणारी जनता केवळ जमाव नसते तर, ती संघटित जनता असते, आणि हे जनसंघटन पक्षांमार्फत होते. हा पक्ष बाजूला ठेवून एखादी व्यक्ती आपण म्हणजेच जनता, असे सूचित करू लागते तेव्हा 'इंदिरा म्हणजेच भारत' अशा घोषवाक्यांचे भ्रांत सूर ऐकू येऊ लागतात. ७१ च्या निवडणुकांच्या काळात परदेशी वार्ताहरांना बाईंनी सांगितले होते, 'निवडणुकांतील मध्यवर्ती प्रश्न 'मी' आहे'; काँग्रेस पक्ष किंवा त्यांची धोरणे हा नव्हे. थोडक्यात, निवडणुकांत जनता खासदारांची निवड करीत नव्हती, तर बाई राहाव्यात की नाही, याविषयींचे सार्वमत घेतले जात होते.

बाईंनी पक्षाला बाजूस सारले याचे काय परिणाम झाले ?

बाईंनी पक्षाला बाजूस सारल्याने ज्यांना पक्षात काहीच स्थान नाही, अशा लोकांचा मंत्रिमंडळात समावेश झाला. कुमार मंगलम्, गोखले, टी. ए. पै यांना पक्षात किंवा जनतेत काय स्थान होते ? त्यांनी संगोपिलेला असा निश्चित मतदार संघ होता का ? त्यांच्याविषयी आपुलकी ज्यांना वाटते असे पक्ष – कार्यकर्ते होते का ? बाईंची लोकप्रियता उसनी घेऊन निवडून आलेली ही माणसे बाईंची मिंधी असणार हे उघड आहे. अशी माणसे असल्यामुळेच मंत्रिमंडळाला न विचारता वाटेल ते निर्णय त्या घेऊ लागल्या. पक्षाच्या अवहेलनेतून मंत्रिमंडळाच्या अवहेलनेचा जन्म झाला. मंत्रिमंडळ कःपदार्थ ठरल्यावर संसदेची तीव्र वासलात लागणार हे स्पष्ट होते. संसदेच्या उपेक्षेला ७१ च्या निवडणुकांपूर्वीच सुरुवात झाली होती.

ती कशी काय ?

त्याचे एक बारीकसे उदाहरण आता लोकांच्या लक्षात नाही. जहानआरा जयपालसिंग म्हणून एक बाई उपमंत्री होत्या. त्या राज्यसभेच्या खासदार असून त्यांची मुदत संपली होती. राज्यसभेच्या निवडणुकीचे तिकीटही काँग्रेसने त्यांना दिले नव्हते. म्हणजे त्या संसदेच्या सदस्य राहणार नाहीत, हे स्पष्ट होते. तरी जयपालसिंग या बाई सहा महिनेपर्यंत कोणत्याही गृहाच्या सभासद नसताना मंत्री राहिल्या. कायद्याने एखादी व्यक्ती अशा तऱ्हेने मंत्री राहू शकते; पण ते केव्हा, तर ती व्यक्ती निवडून येण्यापूर्वी मंत्री झाली तर. म्हणजे सध्या शांतिभूषण जसे मंत्री आहेत तशी. पण गंमत अशी की, या गैरप्रकाराला कोणीही आक्षेप घेतला नाही.

थोडक्यात म्हणजे बाईंनी पक्षाचा मान ठेवला नाही, मंत्रिमंडळाचा आब राखला नाही, संसदेला कस्पटासमान मानले. हे सगळे आणीबाणीचा प्रसंग येण्यापूर्वी! म्हणूनच मी म्हणतो की, आणीबाणी आणि त्यातून उद्भवलेली हुकूमशाही हा अपवादभूत प्रकार नव्हता. लोकशाहीच्या चौकटीत बसणारे राजकारणच बाईंच्या कर्कश, हट्टी आणि लहरी स्वभावाला मानवणारे नव्हते.

## अपकृत्यांची चौकशी

बाईंच्या कारकीर्दीत त्यांच्या हातून किंवा त्यांच्या टोळक्याच्या हातून जी तथाकथित अपकृत्ये झाली त्यांची सरकार चौकशी

पृष्ठ २४ वर

# पक्षांतरे

## प्रामाणिक आणि संधिसाधू

वा. दा. रानडे

सहाव्या लोकसभा निवडणुकीनंतर राज्यपातळीवर सत्तांतराला सुरुवात झाली आहे. काश्मीरमध्ये शेख अब्दुल्लांना दिलेला पाठिंबा काढून घेऊन केवळ काँग्रेसचेच मंत्रिमंडळ आणण्याचा काँग्रेसचा प्रयत्न होता, पण तेथे विधानसभाच विसर्जित करण्यात आल्याने तो साध्य झाला नाही. सध्या तेथे राज्यपालांची राजवट आहे. त्रिपुरामध्ये लोकशाहीवादी काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट यांच्या आघाडीचे नवे मंत्रिमंडळ सत्तारूढ झाले आणि आता गुजरातेत काँग्रेस मंत्रिमंडळाने राजीनामा दिला व जनता आघाडीच्या हाती सत्ता गेली आहे.

केंद्रात जनता पक्षाचे सरकार स्थापन झाल्यानंतर गुजरातेत काँग्रेस मंत्रिमंडळ फार काळ टिकणार नाही हे उघड दिसू लागले होते. लोकसभा निवडणुकीत आपणास विजय मिळविणे सोपे जावे म्हणून निवडणूकघोषणेच्या काही आठवडे आधी इंदिरा गांधींनी गुजरातेत काँग्रेसचे सरकार अधिकारावर आणले होते, पण त्यांचा आडाखा चुकला. जनता लाटेपुढे काँग्रेसचा धुव्वा उडाला. इंदिरा गांधींना स्वतःचीसुद्धा जागा टिकविता आली नाही, तेथे गुजरात त्यांच्या हाती कसा राहणार? आणीबाणीत काँग्रेस पक्षाला मिळालेले जनता आघाडी व किमलोपचे आमदार यांचा ओघ पुन्हा जनता आघाडीकडे वळला. विधानसभेत काँग्रेस पक्षाचे बळ एकेकाळी १०२ पर्यंत वाढले होते. त्याला गळती लागून ते ७८ पर्यंत खाली आले. बहुमत गमावल्यावर विधानसभेत पराभवाची नामुष्की पत्करण्यापेक्षा मुख्यमंत्री माधवसिंह सोळंकी यांनी मंत्रिमंडळाचा राजीनामा सादर केला. जून, १९७५ मधील विधानसभा निवडणुकांत जनता आघाडीला निर्णायक बहुमत मिळाले नाही तरी, सर्वांत मोठा पक्ष म्हणून तो निवडून आला. किमलोपच्या पाठिंब्याने त्याने सरकार बनविले, पण हे सरकार स्थापन झाल्यापासूनच ते पाडण्याच्या हालचाली काँग्रेसने सुरू केल्या. किमलोपचे व जनता आघाडीचे काही आमदार त्यांनी फोडले. जनता आघाडीचे बहुमत गेल्यावर बाबूभाई पटेल यांच्या मंत्रिमंडळाने राजीनामा दिला. गुजरातेत राष्ट्रपतींची राजवट आली. काँग्रेसचे बहुमत झाले असूनही काँग्रेस मंत्रिमंडळ बनवू शकली नाही, याचे कारण मुख्यमंत्री कोणी व्हावयाचे याबद्दल पक्षात भांडणे होती. हितेंद्र देसाई आणि माधवसिंह सोळंकी या दोघांनाही हे पद हवे होते. हे मतभेद मिटविण्यासाठी नऊ महिने प्रयत्न करूनही यश आले नाही. निवडणुकीचा विचार इंदिरा गांधींच्या मनात घोळू लागला, तेव्हा निवडणुकीपूर्वी आपल्या बाजूची सरकारे राज्यात अधिकारावर आणावी, या त्यांच्या नेहमीच्या तंत्रानुसार त्यांनी पावले टाकली. हितेंद्र देसाईंना केंद्र मंत्रिमंडळात घेऊन त्यांनी गुजरातच्या मुख्यमंत्रिपदाचा पेच सोडविला. सोळंकी मंत्रिमंडळ १०६ दिवस म्हणजे साडेतीन महिने अधिकारावर होते.

आयाराम-गयाराम खेळातून आमदारांच्या तकलुपी निष्ठेचे दर्शन पुन्हा एकदा घडले. या संधिसाधू आमदारांची निष्ठा कोणत्याही एका पक्षाशी नसते, कार्यक्रमाशी नसते. त्यांची निष्ठा असते फक्त सत्तेशी. त्यांना मंत्रिपदे, अधिकारपदे हवी असतात. जिकडे सत्ता असेल तिकडे हे आमदार वळतात. सत्तारूढ पक्ष बदलला की, तेही आपला पक्ष बदलतात. अपक्ष आमदार तर पक्ष बदलतातच, पण छोटया पक्षांप्रमाणेच मोठया पक्षांचे आमदारही या मोहाला बळी पडतात. याचा अर्थ तत्त्वनिष्ठ पक्षउभारणी आमच्याकडे अजून झालेली नाही. लोकशाहीच्या यशासाठी अशा पक्षउभारणीची आवश्यकता आहे. तत्त्वनिष्ठेचा विचार करताना डोळस तत्त्वनिष्ठा आणि आंधळी तत्त्वनिष्ठा यांतला फरक ओळखायला हवा. आंधळी तत्त्वनिष्ठा म्हणजे आपण उराशी बाळगलेली तत्त्वे चूक असू शकतील अशी शंकाही मनात येऊ न देणारी तत्त्वनिष्ठा. यातून आपलेच फक्त बरोबर असा दुराग्रह निर्माण होतो. धोरण, कार्यक्रम, कार्यपद्धती यांत एकांगीपणा येतो. चुकीचे निर्णय घेतले जातात. तो पक्ष आणि त्याचे कार्यकर्ते जनतेपासून अलग पडतात. याउलट डोळस तत्त्वनिष्ठा असलेला पक्ष व त्याचे कार्यकर्ते जनतेशी सतत संपर्क ठेवतात. दैनंदिन कार्याच्या अनुभवात आपली तत्त्वे सतत पारखून पाहतात. आपली तत्त्वे कालबाह्य झाली आहेत, अनुभवाच्या प्रकाशात ती चुकीची ठरली आहेत, असे आढळले तर, प्रामाणिकपणे ते मान्य करून परिस्थितीची आव्हाने पेलण्यास उपयुक्त अशी नवी तत्त्वे, नवे धोरण, नवा कार्यक्रम स्वीकारण्याची त्यांची तयारी असते. लोकशाही यशस्वी होण्यासाठी असे डोळस, तत्त्वनिष्ठ पक्ष आणि कार्यकर्ते हवेत.

पक्षांतर सरसकट त्याज्य मानावयाचे की, त्याचाही याच दृष्टिकोनातून विचार करायला हवा? संधिसाधू पक्षांतराला आळा घालायला हवा. पण संधिसाधू पक्षांतर आणि तत्त्वनिष्ठ पक्षांतर यांना एकाच मापाने मोजणे योग्य होणार नाही हे खरे, पण पक्षांतरामागील आपला संधिसाधूपणा उघड कोण कबूल करील? या संधिसाधूपणाने अनेकदा तत्त्वनिष्ठेचा बुरखा घेतलेला असतो. डोळसपणाने हा बुरखा फाडून खरे स्वरूप ओळखायला हवे. लोकसभा निवडणुकीत जनता पक्ष व लोकशाहीवादी काँग्रेस यांची आघाडी विजयी झाल्यानंतर काँग्रेसमधील अनेक कार्यकर्ते लोकशाहीवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करीत आहेत. त्यांचे पक्षांतर प्रामाणिक मानावयाचे की, संधिसाधू मानावयाचे? दोन्ही पक्षांतरांबाबत एकच भूमिका घ्यावयाची, की निरनिराळे निकष लावावयाचे? काँग्रेस कार्यकर्त्यांचा लोकशाहीवादी काँग्रेसमध्ये प्रवेश हे पक्षांतर नसून देशातील राजकीय शक्तींची फेरमांडणी आहे. ही फेरमांडणी पूर्ण होण्यास वाव दिला पाहिजे असे मत श्री. जयप्रकाश नारायण यांनी मुंबईतील एका मुलाखतीत व्यक्त केले आहे. १९७१ च्या निवडणुकीतील काँग्रेस विजयानंतर संघटना काँग्रेसमधून सत्तारूढ काँग्रेसमध्ये प्रवेशाची साथ सुरू झाली. त्यावेळी याला पक्षांतर म्हणता येणार नाही असे मत काँग्रेस नेत्यांनी व्यक्त केले होते.

पृष्ठ १९ वर

# सोलकढी

## साहित्यिकांना ते सोसावे लागले

कोणत्याही बाजारू चिवड्यात काजू आणि कुरमुरे यांचे जे प्रमाण असते, तेच कोणत्याही विकसनशील समाजात साहित्यिक आणि सामान्यजन यांचे असते. साहित्यिक, समाजातले असूनही, काही वेगळेच असतात. तुमच्याकडे असते तशीच शिधापत्रिका त्यांच्याकडेही असते; पण तिच्यावर म्हणे प्रसंगी त्यांना मोत्यांचा चारा मिळतो. तुमची क्षुद्र फर्फट चाललेली असते; पण साहित्यिक अद्भुतात मजेने गिरक्या घेत असतात. तुमच्या आठवड्याला कंटाळ्याचे सात दिवस असतात; साहित्यिक बेटे अक्षय आनंदाचे वरदान घेऊन आलेले असतात. तुम्ही देहाचा चिखल चिवडता; मनाचे आभाळ मोजता मोजता साहित्यिक स्वत:ला हरवून बसतात. आपण इतरांसारखे आहोत याचा तुम्हाला दिलासा वाटतो; आपण इतरांसारखे मुळीच नाही, हे साहित्यिकांचे सर्वांत मोठे समाधान असते.

साहित्यिकांचे हे थोर्थोरपण महाराष्ट्र सरकारच्या मंत्र्यांना मान्य झालेले होते. आपण राज्य चालवत असलो तरी, राजे साहित्यिकच आहेत, अशीच त्यांची धारणा होती. साहित्यिकांचे उदार हृदय, त्यांची मानवतेबद्दलची कळकळ, त्यांचा अभ्यास, त्यांचे स्वयंप्रकाशी व्यक्तिमत्त्व, यांचे मंत्रिमंडळींना मोठे आकर्षण वाटायचे. पण आकर्षण वाटले तरी उपाय नव्हता. कारण साहित्यिकांचा स्वाभिमान भलताच प्रखर. ते आपला देव्हारा सोडून मंत्र्यांच्या दरबारात हजेरी लावणे शक्यच नव्हते. आता काय करावे? मंत्र्यांना तर, राजकारण करकरून वठल्याविटलेल्या आपल्या मनांना साहित्यिकांच्या चैतन्यदायी सहवासात वेळोवेळी तरतरीटवटवी प्राप्त करून घ्यायची इच्छा होती. त्यामुळे त्यांनी आपण होऊन साहित्यिकांशी सलगीसुलगी केली. साहित्यिक संकोचले. पुन्हा पुन्हा संकोचले. पण अखेर त्यांचा नाईलाज झाला.

इकडे मंत्र्यांनी साहित्यिकांवर अवांछित प्रेमाचा वर्षाव केला. साहित्यिकांना काय देऊ आणि किती देऊ असे त्यांना झाले होते. साहित्यिक समारंभांना मंत्री, आपली राजवस्त्रे घरी ठेऊन, आवर्जून उपस्थित राहू लागले. राज्य-पुरस्काराची योजना मार्गी लावली. आपापल्या पाल्य जिल्ह्यात किंवा मतदारसंघात साहित्यसंमेलने भरवून साहित्यिकांच्या कलागुणांचे पैसे मोजून चीज केले. साहित्यक संस्थांना, नियतकालिकांना, विशेष पुस्तकांना, मानाने जगण्यासाठी भरघोस अनुदाने दिली. साहित्यिकांचे वाढदिवस, कधी त्यांच्याच घरी, तर कधी आपल्या घरी मोठ्या थाटाने साजरे केले. त्यानिमित्ताने त्यांना उंची भेटवस्तू आग्रहाने घ्यायला लावल्या. भोजन समारंभ तर नित्याचेच झाले. गरजू साहित्यिकांना जागा मिळवून दिल्या. काही साहित्यिकांना जागेसाठी, तर काहींना घरच्या लग्नासाठी हातोहात मोठाल्या रकमा अशाच दिल्या. साहित्यिकांच्या मुलांच्या उच्च शिक्षणाच्या मार्गात आलेल्या तांत्रिक अडचणींचा, आपले वजन खर्च करून, परिहार करून टाकला. हे महाराष्ट्र राज्य, साहित्यकांसाठी आनंदवनभुवन व्हावे, असे दरोबस्त प्रयत्न मंत्र्यांनी केले.

आणि मराठी साहित्यिकांना ते सगळे सोसावे लागले. त्यांनी कधीच काही मागितले नव्हते. त्यांना मुळी काही नकोच होते. आपण, आपले साहित्य, आणि खरे रसिक एवढेच साहित्यिकांचे जग होते. या जगात मंत्र्यांना स्थानच नव्हते. पण अधिकाराच्या जोरावर त्यांनी या जगात स्थान प्राप्त करून घेतल्यानंतर सुद्धा साहित्यकांनी आपले स्वत्व सोडले नाही. आपण होऊन कश्शा कश्शासाठीही हात पसरला नाही. (सतत लिहिणारा हात पसरणार केव्हा, म्हणा?) असे स्वयंपूर्ण साहित्यिक ज्या भाषेत निपजतात त्या भाषेची धन्य होय.

परवाच्या लोकसभेच्या निवडणुकीपर्यंत, सतरा वर्षे, हे जसे असायला हवे होते तसेच होते. पण निवडणुकीत जनता पक्षाच्या बाजूने आणि सत्ताधारी काँग्रेस पक्षाच्या विरोधात काही लोकशाही-कैपक्षी साहित्यक उतरले, आणि महाराष्ट्र-राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण आधी चकित झाले; आणि मग संतापले. साहित्यिक आपल्याशी असे वागतील याची त्यांना कल्पना नसल्यामुळे ते चकित झाले; आणि साहित्यकांनी तसे वागू नये अशी त्यांची इच्छा असल्यामुळे ते संतापले. चकित संतापापोटी ते म्हणाले: 'आम्ही साहित्यकांना एवढे मानसन्मान देतो, पारितोषिके आणि अनुदान देतो, तरी त्यांच्यापैकी बरेच राजकारण करतात आणि आमच्यावर टीका करतात.

हा म्हणजे साहित्यिकांच्या अस्मितेवरच मर्मघाव होता. मंत्र्यांनी साहित्यिकांना काही द्यावे इतके साहित्यिक छोटे नाहीत आणि मंत्री मोठे नाहीत. मंत्र्यांना हे खडसावून सांगायची वेळ आली होती. मग 'साहित्य सहवासस्थ' अष्ट लेखकांनी मुख्यमंत्र्यांचा तीव्र निषेध केला; पुण्याच्या पाच लेखकांनी, राज्य-पुरस्कारासाठी पुस्तकेच पाठवणार नाही अशी बाणेदार घोषणा केली; आमचे पु. ल. देशपांडे आणि दुर्गाबाई भागवत यांनीं तर, श्रीराम लागूंच्या सदिच्छांना न जुमानता, एकत्र येऊन (यावेळी सुप्रसिद्ध साहित्यिक जयवंत दळवीसुद्धा होते), एका पर्यायी पुरस्कार-योजनेची चर्चासुद्धा केली. साहित्यिकांनी, साहित्यिकांसाठी, साहित्यिकांची संकल्पिलेली ही योजना जनताप्रियही झाली आहे. या योजनेला देण्यासाठी म्हणून अनेकजण पैसे हातात घेऊन उभे आहेत. शंकरराव चव्हाणांचे उर्मट शब्द साहित्यिकांच्या स्वाभिमानी काळजांना इतके झोंबले आहेत की, आजपर्यंत राज्य-पुरस्कारांच्या निमित्ताने मिळालेले कलंकित पैसे, प्रत्येक साहित्यिक, या नव्या स्वतंत्र, स्वावलंबी, आणि स्वयंशासित योजनेला मदत म्हणून नुसते देऊन टाकणार आहे. काय हा मनाचा मोठेपणा; काय ही हृदयाची श्रीमंती; काय हे अंत:करणाचे औदार्य.

हे सगळे ठीक झाले.

जसे व्हायला हवे होते तसेच झाले.

यावेळी मनात जे येते आहे ते असे की, साहित्यिकांनी दूर सारल्यानंतर, मंत्रिमंडळी सामान्य माणसाला जवळ करणार आहेत की काय? □

# □ विद्यापीठ–वाली चिदंबरन

आठ दिवसांपूर्वी माझा प्रिय मित्र गोपाळ गोखले ( शाळा-महाविद्यालयात आम्ही त्याला 'गोगो' म्हणायचो. आत्ता इथेदेखील त्याला 'गोगो' म्हटले तर वाचक हरकत घेणार नाहीत, अशी आशा आहे. त्यांनी हरकत घेतली तरी आम्ही 'गोगो' म्हणणारच होतो.) माझ्याकडे सहज म्हणून आला. सहज म्हणून आलेला गोगो कधीच सहज म्हणून आलेला नसतो, हे आता आम्हाला ठाऊक झाले आहे. पण आम्ही तसे दाखवत नाही. मित्राचे हृदय, करता काय ?

'काय म्हणतो भुत्तो ?' मी विचारले.

'भुत्तो ? कोण भुत्तो ?' गोगो (चिडायचा तितका चिडून).

'अरे आपला झुल्फिकार अली भुत्तो रे. पिलू मोदीचा दोस्त झुल्फी. पाकिस्तानचे पंतप्रधान'

'ते ठाऊक आहे. त्यांचं काय झालं ?'

'तेच तर मी तुला विचारतो'

'हा काय चावटपणा आहे ? अरे भुत्तोशी काय करायचंच आपल्याला ?'

'असं म्हणू नकोस. जनता पार्टीला विजय हवा होता. तो मिळवून दिला. मग त्यांचं मंत्रिमंडळ जमवून दिलं. बजेटं करून दिली. आता राज्याराज्यांतली काँग्रेसची मंत्रिमंडळं पाडायचा लोकशाहीखोर कार्यक्रम तेवढा बाकी आहे. पण त्याला थोडा वेळ लागेल. तोपर्यंत म्हटलं आपल्या शेजाऱ्याची हालहवाल पाहू या.'

'शहाणा आहेस : म्हणे, 'शेजाऱ्याची हालहवाल पाहतो. काय म्हणतो भुत्तो ?' भुत्तो जाऊ दे उडत्या गालिच्यावरून. इथं या मुंबईत–मुंबई विद्यापीठात काय चाललंय पाहा जरा.'

'मुंबई विद्यापीठाबद्दल बोलायचं, गोग्या, तुला काम नाही. मुंबई विद्यापीठ हे जगातलं एक श्रेष्ठ विद्यापीठ आहे, असं प्राचार्य राम जोशींनीच म्हटलं आहे. मुंबई विद्यापीठाकडे पाहायला सांगू नकोस मला. तिथं नेहमीच, सगळं, असायला हवं असतं, तसं असतं.

'तू चेष्टा तर करत नाहीस माझी ? चिदंबरनबद्दल तुझं इतकं चांगलं मत असेल याची कल्पना नव्हती.'

'स्पष्ट बोलू थोडा ? टी. व्ही. चिदंबरन तुम्हाला कधीच कळले नाहीत. त्यांच्या इतका उरक विद्याचरण शुक्लांजवळसुद्धा नाही, यात काय ते समज. मुंबई विद्यापीठ चालवायचं म्हणजे काय खायचं काम आहे ?'

'चिदंबरनना तरी ते खायचंच काम वाटत होतं. त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे पुष्कळ आरोप आहेत, ठाऊक आहे ?'

'ठाऊक आहे. पण मला हेदेखील ठाऊक आहे की, ते आरोप सिद्ध झालेले नाहीत. एक आधी गोष्ट तू लक्षात घे. चिदंबरन भ्रष्टाचारी असते समजा, तर माजी रेक्टर कै. गोवर्धनदास पारीख, माजी कुलगुरू प्रल्हादाचार्य बाळाचार्य गजेंद्रगडकर, आजी कुलगुरू त्र्यंबक कृष्णाजी टोपे यांच्यासारख्या सचोटीच्या वरिष्ठांना ते कळले नसते ? आणि कळल्यावर अर्धा दिवस तरी चिदंबरन विद्यापीठात राहू शकले असते काय ? टोप्यांनी तर परवाच्या सिनेटच्या सभेत चिदंबरनना निरोप देताना त्यांच्या (म्हणजे चिदंबरनच्या) पस्तीस वर्षांच्या सेवेचा आणि सहकार्यांचा तोंड भरून गौरव केला होता. हे तू कसं विसरतोस?'

'ते खरं रे. पण टोपेसाहेबांच्या बोलण्यातला औपचारिकपणा वजा करून–'

'डोकं फिरलंय तुझं ! टोपे नेहमी खरं बोलतात. मनापासून बोलतात. आणीबाणीनंतर कुलगुरू टोप्यांनी उत्स्फूर्तपणे एक निवेदन काढलं होतं. त्यांत पंतप्रधान इंदिरा गांधींचं नेतृत्व देशाला अखंड लाभावं, अशी परमेश्वराची प्रार्थना केली होती. अशा तऱ्हेचं निवेदन काढणारा हा भारतातला एकमेव कुलगुरू ! त्यांच्या निवेदनाच्या चालीवर मला म्हणावंसं वाटतं की, कुलगुरू टोप्यांचं नेतृत्व मुंबई विद्यापीठाला अखंड लाभावं. असो. चिदंबरनच्या अभ्रष्टच कर्तृत्वाबाबत टोप्यांची साक्ष सुद्धा मी बाजूला ठेवतो–'

'आणि ?'

'आणि 'जसलोक इस्पितळा'च्या संचालकांची साक्ष काढतो. अरे बाळा गोपाळा, मुंबई विद्यापीठातून निवृत्त झालेल्या चिदंबरनची जसलोक इस्पितळाचे अॅडमिनिस्ट्रेटर–व्यवस्थापक–म्हणून नेमणूक झाली आहे, आता बोल.'

'आता काय बोल ? आवाज बंद केलात तुम्ही आमचा. मला वाटलं, आधी आपण एकटे चिदंबरनना शिव्या देऊ; मग तू त्यांना शिव्या देशील; मग आपण दोघे मिळून त्यांना शिव्या देऊ. पण झालं भलतंच ! तुझ्या सांगण्यावरून तर हा शंभर पैशांचा सज्जन माणूस दिसतो यार. आणि अशा माणसाला हे मुंबई विद्यापीठ कोरडा निरोप देतं ? लुच्चे लोक आहेत सगळे ! खरं म्हणजे आजी–माजी विद्यार्थ्यांनी, प्राध्यापकांनी आणि एकूणच मुंबईकरांनी चिदंबरनना, त्यांच्या पस्तीस वर्षांच्या समर्पित आणि सचोटीच्या सेवेची अल्पस्वल्प पावती म्हणून पस्तीस लाख रुपयांची एक छोटीशी थैली अर्पण करायला हवी–शुभ गोष्टीला विलंब नको. स्वतःपासूनच सुरुवात करतो मी. या योजनेसाठी माझे एकशे एक रुपये दिले. तुझे किती बोल ?

'आधी मला दुर्गाबाईंच्या 'वंदे मातरम' पारितोषिक निधीसाठी पैसे द्यायचे आहेत. किती पैसे देणार ते 'महाराष्ट्र टाईम्स'मध्ये पत्र लिहून सर्वांना कळवायचं आहे. ते झाल्यावर या विद्यापीठ–वाली, कुलगुरुप्रिय, शिक्षणशत्रुघ्न टी. व्ही. चिदंबरनकडे पाहतो.'

–अनंतराव



# दलितांच्या समस्या नुसत्याच सामाजिक आहेत काय ?

डॉ. सुरेश बेरी

महाडच्या चवदार तळ्यावर हरिजनांनी डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली पाणी भरण्याच्या केलेल्या सत्याग्रहाला पन्नास वर्षे झाली. या ऐतिहासिक प्रसंगाच्या स्मृतिनिमित्त सुवर्णमहोत्सव समिती कार्यान्वित झाली आहे. आता निधी गोळा होतील. वक्ते भाषणे ठोकतील. कार्यकर्ते आपले दलितप्रेम व्यक्त करण्यासाठी एकमेकांत स्पर्धा लावतील. राज्यकर्ते ( काँग्रेस व जनता पार्टी ) यानिमित्ताने हरिजनांसाठी काय करीत आहोत याचे गाणे गातील. एकूण काय वर्षभर एका उत्सवाच्या वातावरणात ही स्मृती पुन्हा पुन्हा चघळली जाईल आणि दलितांचा प्रश्न मात्र जेथल्या तेथेच राहील. त्यांच्यावरील अत्याचार सालाबादप्रमाणे चालूच राहतील, आणि त्यावरच्या सरकारी उपाययोजना संथ गतीने वाटचाल करत राहतील. लाचार नेते आपल्या लाचारीचे शक्य तितके अधिक प्रदर्शन न करता, या अत्याचारांचा निषेध करीत राहतील. म्हणजे तात्पर्य काय तर, दलितांचा प्रश्न आहे तेथेच राहील, आणि महोत्सव मात्र धुमधडाक्यात साजरे होतील. या निमित्ताने दलितांच्या प्रश्नांची सांगोपांग चर्चा आणि त्या अनुरोधाने प्रत्यक्ष प्रयत्नांना थोडीफार सुरुवात झाली तरी, खूपसे साधले असे म्हणावे लागेल.

गेल्या ५०-६० वर्षातल्या दलित-चळवळीच्या इतिहासाकडे नजर टाकली तर असे दिसून येईल की, प्रामुख्याने या चळवळी सामाजिक सुधारणांसाठी होत्या. दलितांचा सामाजिक दर्जा सुधारण्याकडे त्यांनी आपले लक्ष केंद्रित केलेले होते. मंदिर-प्रवेश, सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्याचा हक्क, राखीव जागांची मागणी, शिष्यवृत्त्यांची मागणी एवढ्यापुरत्याच या चळवळी मर्यादित राहिल्या. परंतु सामाजिक मानहानीबरोबरच सर्व दलितांचा आर्थिक प्रश्न हा तेवढाच बिकट आहे; याकडे दुर्लक्ष झालेले दिसते. देशातील आदिवासी जमाती सोडल्या तर, सर्व दलितसमाज हा अत्यंत आर्थिक विपन्नावस्थेत जगत आहे. त्यांतील बहुसंख्य तर, दारिद्र्यरेषेच्या खालीच आहेत.

खेड्यामध्ये दलित हे प्रामुख्याने भूमिहीन शेतमजूर व गरीब शेतकरी आहेत, तर शहरामध्ये अकुशल कामगार, बिगारी कामगार किंवा बेकार या वर्गांमध्ये मोडणारे आहेत. फारच थोड्यांचा समावेश मध्यम वा त्याहून उच्च वर्गात होतो. ( या ठिकाणी वर्ग हा शब्द आर्थिकदृष्ट्या वापरला आहे. ) ग्रामीण भागात शेतमजुरांचे प्रमाण फार मोठे आहे. बहुसंख्य दलित अजून खेड्यातच राहतात. खेडेगावात अजूनही सरंजामशाहीची पाळेमुळे घट्ट असल्यामुळे तेथील जातिव्यवस्थाही बरीच बळकट आहे. त्यामुळे तेथील दलितांच्या समस्यांनी फारच गंभीर स्वरूप धारण केले आहे. शहरात प्रामुख्याने औद्योगिकरण आणि काही प्रमाणात शिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळे; जातिव्यवस्थेचा प्रश्न काहीसा कमी उग्र भासतो. त्यामुळे खेडेगावातील दलितांच्या समस्या सोडवण्याला आपण अग्रक्रम दिला पाहिजे.

आपल्याकड सामाजिक सुधारणा अगोदर, की राजकीय ( अगर आर्थिक ) सुधारणा अगोदर यावर टिळक-आगकरांच्या काळापासून वाद चालू आहेत. अजूनही त्याचे अस्तित्व जाणवतच आहे, कारण दलितांच्या फक्त सामाजिक सुधारणांवर भर देणारे पक्ष आणि संघटना अस्तित्वात आहेत. 'एक गाव एक पाणवठा' ही चळवळ त्याच स्वरूपाची आहे. या संघटनांनी दलितांच्या जमिनीचे अगर इतर आर्थिक प्रश्न सोडवण्याचा कोणताही कार्यक्रम दिलेला नाही अगर राजकीय कार्यक्रमही त्यात दिसत नाही. त्याचप्रमाणे प्रामुख्याने मार्क्सवादी मंडळी देशाच्या काही ग्रामीण भागात शेतमजुरांच्या बाबतीत ( ज्यात हरिजन मोठ्या संख्येने आहेत. ) मजुरीचा प्रश्न, जमिनीचा प्रश्न, सावकारी यांसारख्या आर्थिक लढ्यामध्ये गुंतलेले दिसत आहेत. पण सामाजिक प्रश्नांच्या बाबतीत त्यांनी काहीही केलेले नाही. आर्थिक व सामाजिक या दोन्ही आघाड्यांवर लढणाऱ्या आणि त्यातून जातिभेदांना पूर्णपणे मूठमाती देण्याचा प्रयत्न करणाऱ्या संघटना फारच अभावाने आढळतात हे दलितचळवळीचे आणि या देशाचे फार मोठे दुर्दैव आहे.

कोणत्याही विभागाच्या आर्थिक, राजकीय आणि सामाजिक परिवर्तनासाठी चाललेल्या चळवळी या एकमेकांच्या हातात हात घालून चालल्या पाहिजेत. असे झाले तरच त्या समग्र क्रांतीच्या टप्प्यापर्यंत जाऊ शकतात. नाहीतर त्यात विकृती निर्माण होण्याचा संभव असतो. दलित चळवळीला हाच नियम लागू केला पाहिजे. चळवळीच्या एकाच अंगाला जोपासणारे या विकृती निर्माण करण्यास मदतच करतात असे म्हटले पाहिजे.

आता, विशेषतः दलितांच्या बाबतीत आर्थिक, राजकीय आणि सामाजिक चळवळी एकाच वेळी चालवल्या तर त्याचा काय फायदा होईल ते आपण बघू. आर्थिक मागण्यांसाठी चालवलेली चळवळ ही फक्त दलितांचीच असू शकेल असे नाही. उदा, खेडेगावातील बहुसंख्य हरिजन हे भूमिहीन शेतमजूर आहेत. इतर जातींमध्येही शेतमजूर आहेत. शेतमजुरांच्या मागण्यांसाठी ( किमान वेतन, अतिरिक्त जमीनीचे वाटप, स्वस्त धान्य वगैरे ) जेव्हा त्यांच्या संघटना उभारून चळवळ केली जाते, त्यावेळी सर्व जातीचे शेतमजूर त्यामध्ये

एकत्र येतात. कधी त्यांना जमीनदारांविरुद्ध, तर कधी सरकार विरुद्ध एकजूट बांधावी लागते. जमीनदार कदाचित् त्यांच्याच जातीचा असू शकेल. परंतु अशा लढ्यामधून वर्गीय एकजूट आणि जाणीव तयार होऊ शकते. ( शेतमजूर हा वर्ग ) आपल्या वर्गीय हितासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन समान शत्रूविरुद्ध लढले पाहिजे ही शिकवण त्यांना मिळते. जातीच्या भिंती आपल्या वर्गीय एकजुटीच्या विरुद्ध उभ्या राहू शकतात. त्यामुळे त्या आपण सोडल्या पाहिजेत हा बहुमोल अनुभव त्यातून मिळतो. जेथे ही वर्गीय एकजूट पक्की झालेली आहे त्या ठिकाणी दलितांच्या बाबतीत आपल्याला अभिप्रेत असलेल्या सुधारणा करणे सोपे जाईल. म्हणजे त्याठिकाणी कोणताही संघर्ष न करता या सुधारणा आपोआप होतील असे मला म्हणायचे नाही. पण संघर्ष दिल्यानंतर कोणत्या ठिकाणी यश येण्याची जास्त शक्यता आहे असे विचारले तर मी म्हणेन की, ज्या ठिकाणी वर्गीय एकजुटीचे लढे मोठ्या प्रमाणात लढवले गेले आहेत त्या ठिकाणी सामाजिक चळवळीला यश येण्याची अधिक शक्यता आहे. हेच सूत्र स्त्री-मुक्ती चळवळीच्या बाबतीतही लागू करता येईल.

विशेषतः धुळे जिल्ह्यातल्या शहादा विभागातील चळवळीत हाच अनुभव आला. त्या ठिकाणी भिल्ल आदिवासींच्या जमिनी सोडवणे, किमान वेतन आणि रोजगार हमीसाठी लढे यातून जी वर्गीय एकजूट बांधली गेली, ती तेथे काही ठिकाणी एक गाव एक पाणवठा यशस्वी करण्यामध्ये उपयोगी ठरली आणि स्त्रीची दबलेली शक्ती जागृत करण्यासाठीही उपयुक्त ठरली.

या चर्चेतून निष्कर्ष हाच निघतो की, दलितांच्या सामाजिक समस्या आणि आर्थिक समस्या यांचा एकत्र विचार केला पाहिजे. सामाजिक समस्यांना हात घालण्याआधी आर्थिक समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी जरूर तर संघर्ष केला पाहिजे. आणि हे करीत असताना सर्व श्रमिकांची एकजूट केली पाहिजे. या सर्व श्रमिकांसमोर दलितांच्या स्त्रियांच्या समस्या ठेवल्या पाहिजेत.

दलितांच्या आर्थिक समस्या कोणत्या ? ग्रामीण दलित हे भूमिहीन शेतमजूर आणि गरीब शेतकरी आहेत. गरीब शेतकरी कोणाला म्हणायचे ? ज्या शेतकऱ्याला त्याच्या जमिनीतून वर्षभर पुरेल इतके धान्य मिळू शकत नाही आणि त्यामुळे पोट भरण्यासाठी त्याला दुसऱ्याच्या जमिनीवरही मोलमजुरी करायला जावे लागते तो गरीब शेतकरी. या शेतकऱ्यांच्या मजुरीच्या दराचा प्रश्न महत्त्वाचा आहे. सरकारने किमान मजुरीचे दर निर्धारित केलेले आहेत, पण फारच थोड्या ठिकाणी या दराप्रमाणे मजुरी दिली जाते. ज्या ठिकाणी दिली जाते त्या ठिकाणीही, शेतमजुरांनी आपल्या बळकट संघटना उभारून आणि तीव्र संघर्ष देऊनच ती मजुरी मिळवली आहे. स्वतःच केलेल्या कायद्याची अंमलबजावणी न करणारे सरकार अशा प्रसंगी मात्र या शेतमजुरांच्या संघटना मोडून काढण्याकरता आपल्या सर्व फौजफाट्यानिशी या संघर्षामध्ये जमीनदारांच्या बाजूने उतरते. या शेतमजुरांना तथाकथित नक्षलवादी ठरवून मनमानेल तसे अत्याचार करते. अशा घटना, बिहार, बंगाल, उत्तर प्रदेश, तामीळनाडू, आंध्र, या ठिकाणी दरवर्षी अगदी शेकड्याने घडतात आणि त्याबाबत आमच्या येथील दलित कार्यकर्ते मात्र तोंड आवळून गप्प बसतात व सत्ताधाऱ्यांनी टाकलेल्या भाकरीचे तुकडे चघळत बसतात.

देशात शेतकऱ्यांच्या एकूण लोकसंख्येपैकी ३० टक्के लोक हे भूमिहीन शेतमजूर आहेत. त्यांपैकी बहुसंख्य हरिजन आहेत. त्यांचा प्रश्न अतिशय तीव्र आणि स्फोटक बनला आहे. या सर्व शेतमजुरांना संघटित करून सरकारी कायद्यांचा लाभ करून दिला पाहिजे. जमीनदारांच्या अमानुष प्रभावापासून त्यांना पूर्णपणे मुक्त केले पाहिजे. हे काम जर समाधानकारक झाले तर बाकीचे प्रश्न सुटायला ताबडतोब चालना मिळेल.

दुसरा प्रश्न सावकारी आणि त्यातून निर्माण होणारी वेठबिगारी (Bonded Labour). याविषयी २० कलमी कार्यक्रमाचे ढोल बरेच बडविण्यात आले. पण प्रत्यक्षात पदरात फारसे काहीच पडले नाही. हेही प्रश्न कायदा अस्तित्वात असून नोकरशाहीच्या मदतीने सुटू शकले नाहीत. त्यासाठी किसान-संघटनेचीच जरूरी आहे. सावकार-जमीनदारविरोधी संघर्ष त्यासाठी उभारले पाहिजेत. हाही प्रश्न ग्रामीण भागातील बहुसंख्य दलितांचा आहे. आतापर्यंत प्रयत्न फारच थोडे झाले, तेही बहुतांशी कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली.

तिसरा आणि महत्त्वाचा प्रश्न जमिनीचा. कुळांची नोंद करणे, कुळांना जमिनीवरून हुसकावून लावणे, खोट्या नोंदी करून जबरदस्तीने कागदपत्रांवर अंगठे उठवून दलितांच्या आणि इतर गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावणे आणि त्या शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्याचे लाखो प्रकार या देशातील जमीनदार करीत आहेत. सरकारने केलेले सर्व कायदे धाब्यावर बसवून ही मंडळी ग्रामीण भागात मनमानेल तसा धुडगूस घालीत आहेत. सरकार त्यांना काही करू शकत नाही. कारण सत्ताधारी पक्षामध्ये त्यांचे प्रतिनिधी आहेत. याच जमीनदारांनी जनता पार्टीलाही बऱ्याच ठिकाणी पाठिंबा दिला आहे. त्यामुळे हे प्रश्न सोडवताना जनता पार्टी काय धोरण घेते हे पाहणे अगत्याचे ठरेल.

ग्रामीण भागातील दलितांचे हे प्रमुख आर्थिक प्रश्न आहेत. त्याचबरोबर बेकारी, अज्ञान, रोगराई हे तदनुषंगाने निर्माण होणारे दुय्यम स्वरूपाचे प्रश्न आहेत. हे सर्व प्रश्न प्रामुख्याने जमिनीशी संबंधीत आहेत. जमीनदारी आणि सावकारी हे दलितांबरोबरच इतर सर्व ग्रामीण गरीबांच्या वर्गातील प्रमुख अडथळे आहेत. ग्रामीण दलितांवर होणारे अत्याचार मुख्यतः याच प्रश्नावरून होतात. जमीनदारांची मजुरी हीच या प्रकाराला कारणीभूत असते.

जमीनदारांकडून व सधन शेतकऱ्यांकडून दलितांवर होणारे हल्ले दरवर्षी वाढतच आहेत. आणीबाणीच्या काळात हल्ले जास्तच वाढले.

१९७१ मध्ये २१२७ दलितांवर अत्याचार झाले.
१९७२ मध्ये २३८४ दलितांवर अत्याचार झाले.
१९७३ मध्ये १८४८ दलितांवर ( पहिल्या सहा महिन्यांत ) अत्याचार झाले.
१९७४ मध्ये २७५९ दलितांवर ( पहिल्या सहा महिन्यांत ) अत्याचार झाले.

आणीबाणीच्या काळातच रिपब्लिकन पक्षाचे ( गवई गटाचे ) नागपूरचे अध्यक्ष श्री. वासुदेव जागार यांनी महाराष्ट्र टाईम्सला मुलाखत देऊन सरकारी प्रचाराचा फुगा फोडला आहे. त्यांनी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांकडे आणीबाणीच्या एक वर्षांच्या काळात दलितां-

वर अत्याचार झालेली नागपूर परिसरात घडलेली ३५४ प्रकरणे मुख्यमंत्र्यांकडे पाठवली. परंतु याबाबत एकाही प्रकारची दाद घेतली गेली नाही, मग न्याय देणे तर दूरच राहिले. आणीबाणीत ज्या गवई गटानें सरकारला पाठिंबा दिला त्यांची ही बोलकी मुलाखत पाहता इतरत्र दलितांवर किती भयायक प्रकारचे अत्याचार केले गेले असतील याची कल्पनाच करवत नाही. सरकारच्या दलितोद्धाराचा फोलपणा यातून सिद्ध होतो. दलितांची चळवळ सरकारच्या आश्रयाने मुळीच वाढू शकणार नाही, तर त्यात अधिक लाचारीच येईल हे यावरून दिसून येते.

खेड्यातील जमीनदार व सावकार यांचे वर्चस्व नष्ट करून त्याजागी ग्रामीण गरीबांचे प्रभुत्व प्रस्थापित करणे हे उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून दलित चळवळी उभारल्या, तरच पुढील समस्या सोडवण्याचा मार्ग मोकळा होईल. दुर्दैवाने हाच भाग बरेचजण टाळतात. कारण हा भाग तीव्र संघर्षाचा आणि फार मोठी किंमत देऊन करण्याचा आहे.

खेडेगावामध्ये जमीनदारीविरोधी चळवळ हाच दलित–चळवळीचा प्रमुख पाया ठरेल. जमीनदार कोणाला म्हणायचे ? जो जमिनीचा मालक असूनही स्वतः जमीन कसत नाही. दुसऱ्या शेतकऱ्याला खंडाने अगर हिश्श्याने जमीन कसायला देतो त्याला जमीनदार म्हणतात. आपल्या देशात अजूनही फार मोठमोठे जमीनदार अस्तित्वात आहेत. बिहार, ओरिसा, यांसारख्या राज्यांत २५००० एकर जमीन एकट्याच्या मालकीची असलेले बडे जमीनदार आहेत. वाचकांनी डॉ. अनिल अवचट यांनी लिहिलेले 'पूर्णिया' हे पुस्तक वाचावे. जमीनदारी ही काय चीज आहे हे त्यावरून त्यांना चांगलेच समजेल. जेथे जमीनदारी अधिक तेथेच दलितांवर जास्त अत्याचार होतात हेही लक्षात घेण्यासारखे आहे. जेथे जमीनदारी अधिक तेथे जातिव्यवस्थाही अधिक घट्ट स्वरूपात पहायला सापडते. आपल्या देशातील ८० टक्के जमीन ३० टक्के लोकांच्या हातात आहे. यावरून जमीनदारीच्या प्रमाणाची कल्पना येईल.

या जमीनदारीला धक्का देण्याचे काम आतापर्यंत दलितांचे कार्यकर्ते म्हणवणाऱ्या किती लोकांनी केले आहे, याचे मूल्यमापन या महोत्सवी वर्षात केले पाहिजे.

या प्रश्नाची थोडीफार जाणीव दलित पँथरच्या जाहीरनाम्यात दिसते. त्यामध्ये स्पष्टपणे इतर जातीतल्या ग्रामीण श्रमिकांबरोबर एकजूट करण्याच्या प्रश्नाला महत्त्व दिले आहे. दलित या शब्दाची व्याख्या फक्त हरिजन जातीत जन्माला आलेला अशी न करता, ज्यांचे शोषण जमीनदार व भांडवलदार यांच्याकडून होते ते सर्व दलित अशी करण्यात आली. त्या सर्वांना संघटित करण्यावर भर दिलेला होता. त्याचबरोबर आम्हाला फक्त ब्राह्मणांच्या गल्लीत जागा नको तर आम्हाला संपूर्ण देशाचे राज्य हवे अशी स्पष्ट घोषणा त्यात केलेली आहे. दलित पँथरच्या आंदोलनाने दलित चळवळीचे पाऊल पुढे पडण्यात आणि तिने क्रांतिकारी वळण घेण्यात बराच वाटा उचलला हे सत्य आहे; पण दुर्दैवाने पुढे नेतेच भ्रष्ट झाले. सरकारने टाकलेले तुकडे चघळण्यात स्वतःला धन्य मानून सरकारी कमिटीवरचे लोणी खायला धावले. दलित–चळवळ मात्र पुन्हा पोरकी झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःच्या हक्कांसाठी दलित जनतेला पहिल्याप्रथम संघर्षाचा मार्ग शिकवला. तोपर्यंत दलित-चळवळ ही फक्त सवर्णांनी केलेले दानधर्म या स्वरूपात होती. त्या संघर्षामुळे दलितांचा आत्मविश्वास वाढला. त्यांना संघटनेचे महत्त्व समजले. स्वतःच्या हक्कांची जाणीव झाली आणि दलितांचा प्रश्न हा किती तीव्र आहे याची सर्वप्रथम जाणीव हिंदुस्थानातील आम जनतेला आणि राजकीय पक्षांना झाली. या काळात प्रामुख्याने मंदिर प्रवेश, पाणी भरण्याचा हक्क, राखीव मतदार संघ या प्रश्नांवर प्रचंड सत्याग्रह झाले. हा काळ प्रामुख्याने दलितांची अस्मिता जागृत करण्याचा काळ ठरला. परंतु या काळात दलितांच्या इतर प्रश्नांवर चळवळी उभारण्याचा प्रयत्न या संघटनांनी केला नाही. जमीनदारी, सावकारी, वेठबिगारी, कुळांचे हक्क यांसारखे मूलभूत प्रश्न दलितांच्या मानेला विळखा घालून बसलेले असताना त्यावर चळवळी उभारण्याचा प्रयत्न झाला नाही. त्यामुळे ही चळवळ अपुरी व दुबळी राहिली. परिणामी बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर तिने संघर्षाचा मार्ग सोडून दिला. संधिसाधू नेतृत्वाने तिच्यावर आपला कब्जा बसवला आणि मग सवलतीचे व सीटांचे राजकारण सुरू झाले.

दलितांची चळवळ ही फक्त दलितांपुरती मर्यादित न राहता आम जनतेने त्यात सामील व्हावे त्या इच्छेने बाबासाहेबांनी रिपब्लिकन पक्ष स्थापन केला. पण त्यांच्या अकाली मृत्यूने त्यांना आपले हे स्वप्न पुरे करण्याची संधी मिळाली नाही. त्यांच्या स्वार्थी अनुयायांनी मात्र त्यांचे हे स्वप्न पूर्णपणे धुळीस मिळवले. व्यापक पायावर उभा असणारा लोकशाही व समाजवादी पक्ष स्थापन करणे हे आंबेडकरांचे ध्येय होते. पण बौद्धांव्यतिरिक्त इतर दलित गटांना एकत्र आणण्यासाठी रिपब्लिकन पक्षाचे नेते कधी झटले नाहीत.

केवळ जातीय पायावर पक्षाची बांधणी करण्याचा मोह यापुढे


पॅपिलॉन
पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

टाळला पाहिजे. जातीय चळवळीत शहरातील मध्यमवर्गच आघाडीवर राहतात. दलितांतील सुशिक्षित मध्यमवर्ग शासनाच्या मदतीने नोकरीधंद्यामध्ये अधिकाधिक सवलती मिळविण्यात सध्या मग्न झालेला आहे. सामाजिक क्रांतीच्या लढ्यात गरीब शेतकरी व शेतमजूर यांच्या साहाय्यास तो धावून येईल अशी खात्री देता येत नाही. म्हणून गरीब शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या संघटना बांधण्यावर दलित नेत्यांनी लक्ष केंद्रित केल्याशिवाय दलितांच्या चळवळीला आकार येणार नाही. १९५९ व १९६४ साली भूमिहीन शेतकऱ्यांच्या प्रश्नांना रिपब्लिकन पक्षाने आपल्या कार्यक्रमात अग्रस्थान दिले होते. लहान शेतकरी, भूमिहीन शेतमजूर व शहरातील कामगार यांना एकत्र आणण्याची मनीषा त्यांनी व्यक्त केली होती. पण प्रत्यक्षात अशा संघटना बांधण्यास त्यांचे कार्यकर्ते पुढे आलेच नाहीत. सत्याग्रहाच्या माध्यमातून शासनावर दडपण आणण्यातच सारी शक्ती खर्ची झाली. श्रमिकांच्या संघटित शक्तीचा दट्टा असल्यावाचून शासनाच्या आश्वासनांची पूर्तता होत नाही हा धडा यातून न शिकता आल्यामुळे ही चळवळ वायाच गेली असे म्हणावे लागेल.

दलित जाती संख्येने फार लहान आहेत. पैशाचेही पाठबळ त्यांना नाही. म्हणून दलितेतर समाजातील काही मोठ्या गटांचा पाठिंबा मिळाल्याशिवाय त्यांचे सामर्थ्य वाढणार नाही. दलितेतरांमध्येही सामाजिक व आर्थिक क्रांतीची मनोमन इच्छा बाळगणारे लोक आहेत. उलट दलित जातींमध्ये जन्माला आलेला मनुष्य वैयक्तिक स्वार्थासाठी गटाच्या हितसंबंधांवर पाणी सोडण्यास तयार झाल्याची उदाहरणेही पुष्कळ आहेत. म्हणून ध्येय व कार्यक्रम या दोन्ही बाबतीत आपल्या जवळ असणारे साथीदार शोधण्यात दलित चळवळीचे हित आहे.

दलित पँथरने हा मार्ग चोखाळायला सुरुवात केली होती. १९७३ मध्ये गिरणी कामगारांच्या संपाला पाठिंबा देऊन दलित चळवळीने कामगार चळवळीशी आपले भक्कम नाते जोडले होते. त्याचवेळेस मध्य मुंबईतील लोकसभेच्या पोटनिवडणुकीवर बहिष्कार घालून संसदीय मार्गांवरील आपला अविश्वास आणि जनसंघर्षाच्या मार्गावरील आपला दृढविश्वास त्यांनी व्यक्त केला होता. त्यामुळे दलित-चळवळीला त्या काळात अगदी उधाण आले होते. दलित चळवळीला एक नवे क्रांतिकारक वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली होती. पण पुन्हा संधिसाधू नेतृत्वाने घात केला आणि दलित पँथरच्या ठिकऱ्या उडाल्या. अजूनही लढाऊ नेतृत्व मिळाले तर, दलित चळवळ पुन्हा बाळसे धरू शकेल.

एक गाव एक पाणवठा करण्यासाठी धडपडणाऱ्या लोकांनी दलितांच्या आर्थिक प्रश्नाकडे दुर्लक्ष केले तर त्यांना यश लाभणे कठीण आहे. समाजात वरून क्रांती करण्याचा हा प्रयत्न यशस्वी होणे अशक्य आहे. तळागाळातून वर आलेली क्रांती समाजाच्या सर्व प्रश्नांना स्पर्श करून यावी लागते. आपल्याला आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्व आघाड्यांवर संपूर्ण समाज-परिवर्तनासाठी झगडायचे आहे. पण झगडताना त्या आघाड्यांचे क्रमसुद्धा आपल्याला ठरविले पाहिजेत. हे क्रम यांत्रिक पद्धतीचे असता कामा नयेत. परिस्थितीनुसार त्यात सरमिसळ होऊ शकेल. पण संपूर्ण परिवर्तनाचे अवधान सुटू देता कामा नये.

दलितांची मुक्ती ही सर्व जनतेची मुक्ती आहे. आम जनतेच्या मुक्तिलढ्यातच दलितांच्या मुक्तीचा प्रश्न सुटणार आहे. त्यासाठी निव्वळ जातीय भावना जोपासणारी, शहरी मध्यमवर्गीयांच्या हातचे बाहुले बनून राहणारी, नुसत्याच सवलतींचे राजकारण खेळणारी चळवळ काही उपयोगाची नाही. हा एवढा विचार जरी महाड-क्रांती सुवर्णमहोत्सवाच्या वर्षात महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात प्रामाणिकपणे काम करणाऱ्या दलित कार्यकर्त्यांपर्यंत पोचला तरी, त्या क्रांतीचे उद्दिष्ट सफल झाले असे म्हणता येईल. □

---

## पक्षांतरे : पृष्ठ १३ वरून

पण विरोधी पक्षांनी मात्र त्याला संधिसाधू पक्षांतरच म्हटले होते. पक्षांतर प्रामाणिक, की संधिसाधू हे कोण कसे ठरविणार ? तेव्हा पक्षांतराबाबत वेगवेगळे निकष न लावता एकच निकर्ष लावायला हवा. पक्षांतर करणारांना मुक्त प्रवेश देण्याने आपल्या हाती सत्ता येईल हा तात्कालिक फायद्याचा विचार त्यामागे नसावा. पक्षांतरित सभासदाने विधानसभेचा किंवा लोकसभेचा राजीनामा देऊन नव्या पक्षाच्या तिकिटावर निवडून आल्यावरच त्याला नव्या पक्षात प्रवेश मिळावा हे तत्त्व ठामपणाने पाळले जावे. मग त्यामुळे सत्ता हाती येण्यास विलंब लागला तरी चालेल. पण राजकीय वातावरण अधिक शुद्ध होण्यास त्यामुळे मदत होईल. निवडणुकीनंतर काँग्रेसमधून जनता पक्षात येणारांना प्रवेश द्यावयाचा नाही, हे जनता पक्षाने स्वीकारलेले धोरण स्वागतार्ह आहे. लोकशाहीवादी काँग्रेसनेही असेच धोरण स्वीकारावयास हवे. आणि केवळ लोकसभेपुरतीच नव्हे तर, राज्यविधानसभांतील पक्षांतराबाबत हीच भूमिका हवी. पण राज्यपातळीवर ती सर्वत्र स्वीकारण्याची जनता पक्ष आणि लोकशाहीवादी काँग्रेस यांची तयारी नाही हे गुजरात व त्रिपुरामधील घटनांवरून स्पष्ट झाले आहे. □

## पुस्तके

# Limits to Medicine

Previous title 'Medical Nemesis'
The Expropriation of Health
By–Ivan Illich, Rupa & Co.
Pages 294, Rs. 12/–.

या पुस्तकाचा उल्लेख मी 'माणूस'मध्ये "Age of Cataclysm" चा परिचय करून देताना केला होता. हे पुस्तक मला परत मिळाले खरे; पण त्याचे नावच वरील-प्रमाणे बदलून टाकले आहे. नवीन पुस्तकाची पृष्ठसंख्याही बरीच वाढली आहे. कारण जवळजवळ प्रत्येक पानाच्या खाली "फूट नोटस् आहेत.

अलीकडे Rupa & Co., India Book House वगैरे प्रकाशकांनी नावाजलेल्या इंग्रजी पुस्तकांच्या अधिकृत भारतीय आवृत्त्या छापायला सुरुवात केली आहे. एकतर त्यामुळे ही पुस्तके थोडीशी स्वस्त मिळतात. दुसरे म्हणजे या पद्धतीमुळे book pirating ज्याला म्हणतात त्याला बराच आळा बसला. book pirating मध्ये परत दोन प्रकार असतात. एक म्हणजे बराच खप असलेल्या एखाद्या इंग्रजी पुस्त-काची आवृत्ती एअर मेलने भारतात मागवा-यची व copy rights बद्दल कोणतीच पर्वा न करता, त्या पुस्तकाच्या हजारो आवृत्त्या भारतात छापून त्यावर किंमत मात्र डॉलर्स किंवा पौंडात छापून ते पुस्तक जणू नामांकित प्रकाशकांनी इंग्लंड किंवा अमेरिकेतच छापले आहे असे पहिल्या पानावर छापून त्या पुस्तकाची प्रचंड विक्री करायची, निदान या "पुस्तकी–चाचेगिरीमध्ये भरपूर चुका असलेले "ओरिजीनल" पुस्तक तरी वाचायास मिळते. परंतु दुसरा (super Book pirating चा प्रकार बघा. यात मात्र ज्या लोकप्रिय लेखकांच्या नावाखाली जे पुस्तक छापले जाते, ते त्या लेखकाने लिहिलेलेच नसते. उदाहरणार्थ सध्या बाजा-रात विक्रीला आलेले Hence" हे पुस्तक हेरॉल्ड रॉबिन्सने लिहिलेलेच नाही. "Campus" हे पुस्तक सुद्धा Arthur Hailey ने लिहिलेलेच नाही. परंतु तरी पण या दोन्ही पुस्तकांच्या अनधिकृत भारतीय आवृत्त्या" विक्रीकरिता आल्या होत्या. सध्याच्या व्यवस्थेमुळे "चाच्यांच्या" हातात एखादे लोकप्रिय पुस्तक पडण्यापूर्वी अधिकृत भारतीय आवृत्ती विक्रीला तयार असते !

इव्हान इलीच हा एक genius समजला जातो. त्याची इतर पुस्तकेही (Celebration of Awareness, Deschooling Society, Tools of Conviviality, Energy & Equity) फार वादग्रस्त आहेत.

या पुस्तकात त्यांनी प्रस्थापित वैद्यकीय व्यवस्थेची व औषध कंपन्यांची लक्तरे काढली आहेत. पण त्या दोषांचा समाचार घेताना त्यांनी जो पुरावा सादर केला आहे तो अचाट व अफाटच आहे. किर्लोस्करमध्ये लेख लिहिलेल्या श्री. अवचट यांनी हे पुस्तक जरूर वाचावे ! पुस्तक वाचताना ते रागाच्या भरात लिहिले आहे असे वाटत नाही. पुस्तकात एकसूत्रता व सुसंगती आहे. त्याशिवाय नवीन वाक्यप्रयोग व शब्द कर-ण्यात त्यांचा हातखंडा आहे.

श्री. टी. के. महादेवन यांनी टाईम्स ऑफ इंडियाच्या जून २२, १९७५ च्या अंकात या पुस्तकाबद्दल फार उत्कटतेने परिचय दिला होता. त्यात ते म्हणतात की, iatrogenesis हा शब्द इलीचने शोधला आहे कारण तो शब्द त्यांच्या (महादेवम् याच्या) वेबस्टर इंटरनॅशनल "मध्ये नाही ! माझ्या चेंबर्स ट्वेंटीएथ सेंचरी डिक्शनरीमध्य मात्र तो शब्द Iatric, Iatrical या नांवाखाली आहे. Iatros म्हणजे ग्रीक मध्ये physician, Iatrognesis म्हणजे डॉक्टरांकडून पेशंटची झालेली हानी. या शब्दाचे विवेचन करण्याचे कारण असे की, या पुस्तकात तो सतत आढळतो.

पुस्तकाची सुरुवातच (Introduction मध्ये) अशी होते, The medical establishment has become a major threat to health ! " आणखीन इव्हान इलीचच्या लिखाणाचा एक मासलेवाईक नमुना बघा – Until proved healthy, the citizen is now presumed to be sick. The result is a morbid society that demands universal medicalization and a medical establishment that certifies universal morbidity.

इव्हान इलीच असे म्हणतात की, आधुनिक जगात आपण जसे वाहन व्यवहार (transport) व इतर आधुनिक सोयीचे गुलाम बनलो आहोत तसेच औषधपाण्याचे सुद्धा गुलाम झालो आहोत. यालाच इलीच 'Medicalization of Life' असे म्हणतात. एकीकडून डॉक्टरांची Prescriptions व दुसरीकडून बड्या औषध कंपन्यांचा जाहि-रातीचा मारा वर्तमानपत्र, टी. व्ही., रेडिओ वगैरे अनेक माध्यमांतून होत असतो. अर्थात या सर्वांची परिणती जास्त औषध वापर-ण्यात होते.

एकट्या अमेरिकेत अॅस्पीरिन्चा प्रतिवर्षी खप हजारो टनांचा आहे. आता अॅस्पीरिन् म्हणजे तथाकथित 'Safe Drugs' पैकी. परंतु त्याच्या अती वापराने gastric haemo-rrage व इतर पोटातील विकार संभवतात. तसेच Paracetomal च्या अती वापराने लीव्हर बिघडते.

पॅरॅसॅटोमलमुळे ताप खाली येतो व दुखणे थांबते. ते 'क्रोसीन' वगैरे गोळ्यात असते. इलीचचे म्हणणे असे आहे की, वर नमूद केलेल्या सर्व विपरित प्रचारामुळे आपली सहनशक्ती अगदी कमी होते व अगदी साध्या दुखण्यासाठी आपण डॉक्टरकडे तरी धाव घेतो, किंवा गोळ्या तोंडात टाकायला सुरुवात

करतो (self-medication) व औषधाचा वाजवीपेक्षा जास्त वापर किंवा गैरवापर करतो. परंतु इलीचने असे नमूद केलेले नाही की, प्रत्येक व्यक्तीचा सहनशीलतेचा उंबरठा (threshold of endurance) वेगळा असू शकतो. अर्थात हा प्रश्न पाश्चात्य देशात जितका जटील झाला आहे तितका इथे झालेला नाही. परंतु आपल्याकडील शहरातील लोक भरपूर प्रमाणात औषधाचा वापर करतात.

मला वाटते इव्हान इलीचने वरील जो मुद्दा उपस्थित केला आहे, त्यामागे मानवी जीवनात जी पोकळी निर्माण झाली आहे, तीच पोकळी कारणीभूत असावी. कृत्रिम जीवन, जीवघेणी स्पर्धा, ढासळलेली नीतिमूल्ये वगैरे अनेक कारणांमुळे मानवी जीवनात असह्य पोकळी निर्माण झाली आहे हे निर्विवाद आहे. अर्थात ज्यांना ही पोकळी दिसत नाही, ज्यांना सर्व काही ठीक आहे, सर्व काही ठीक होईल असे वाटते त्यांना ही पोकळी जाणवतच नाही. पण मग माणसे हिप्पी का बनतात? रोज एक हजार माणसे जगात आत्महत्या का करतात? तरुण मुलेमुली LSD व narcotics मागे का धावतात? या पोकळीमुळेच कुणी कपडे व छानछोकीच्या फर्निचरच्या मागे पळत असतात.

जास्त औषधांचा वापर करण्यामागे आणखीन एक कारण असेही असू शकेल की, असाध्य आजाराने तुम्हाला पछाडले तर, तुम्ही या औषधाने बरे व्हाल किंवा त्या डॉक्टरांमुळे तुम्हाला गुण येईल असे तुम्हाला सारखे वाटत राहते.

क्लॉरॅमफॅनिकॉल या औषधाचा गैरवापर किती मोठ्या प्रमाणात होतो याचे उदाहरण इलीचने दिले आहे. क्लॉरॅमफॅनीकॉचा वापर typhoid fever साठी असतो. परंतु अमेरिकेत हे औषध ४० लक्ष लोकांना दिले गेले. त्यात सर्दी, पडसे, घसा खवखवणे व तारुण्य पिटिकांवरही ते दिले गेले! खरे म्हणजे ४०० मधील एका पेशंटलाच त्याची गरज होती, व इतर ३९९ लोकांच्या बाबतीत त्याचा गैरवापर झाला असे इलीच म्हणतात. क्लॉरॅमफॅनिकॉलमुळे काही लोकांचा असाध्य असा पंडुरोग (Aplastic Anemia) होतो, व रोगी मरतो. भारतात दक्षिणेकडे क्लॉरॅमफॅनीकॉलला दाद न देणारा टायफॉईड अलिकडे आला होता. ते सुद्धा या औषधाचा गैरवापर केल्यामुळेच असेल. इलीचने हिप्पॉक्रॅटीसला quote केला आहे, 'For the sick, the least is the best.'

ह्या Iatrogenesis ला (डॉक्टरांनी केलेले पेशंटचे नुकसान) कधी आळा बसेल! इलीच म्हणतात की, जेव्हा औद्योगीकरणाचा समाजावरचा वरचष्मा थांबेल तेव्हाच या नुकसानीला आळा बसेल. किंबहुना Iatrogenesis हा औद्योगीकरणाचाच एक घटक आहे. आधुनिक जगात उद्योगाची चक्रे अव्याहत फिरत असतात. उत्पादन शिगेला पोहोचते. तो उत्पादन केलेला माल खपवण्यासाठी मग जाहिरातींचा मारा करावा लागतो. आधुनिक जगाने गांधी तत्त्वानेच चालावे असे नाही, परंतु त्या विरुद्ध दुसरे टोकच गाठायला पाहिजे असेही नाही. काही तरी मधला मार्ग सापडला तर त्याचाच उपयोग जास्त होईल.

शेवटी हे सांगावेसे वाटते की, इव्हान इलिचचा दृष्टिकोन थोडासा negative वाटतो. एक गोष्ट निर्विवाद आहे की, वैद्यकीय शास्त्रांनी गेल्या थोड्या वर्षात खूपच प्रगती केली आहे. Iatrogenesis हा कमी जास्त प्रमाणात समाजात राहणारच. कारण शेवटी डॉक्टर हा एक आपल्यासारखाच माणूस आहे. सत्तेची हाव माणसाच्या स्वभावाचा अंगभूत घटक व एक मोठा motivating force असतो व डॉक्टरांना आपल्या शिक्षणामुळे दुसऱ्यावर वर्चस्व ठेवता येते. त्या सत्तेचा व पेशंटच्या अज्ञानाचा फायदा घेऊन श्रीमंत होता येते.

Iatrogenesis ला थोडासा आळा घालायचा असेल तर, शाळा व कॉलेजातून वैद्यकीय शास्त्रांचा अभ्यास करण्याखेरीज इतरांना कमीजास्त प्रमाणात ते शिक्षण द्यावे. त्यामुळे पेशंटला डॉक्टरांची तेवढी भीती वाटणार नाही व डॉक्टर पेशंटकडे तेवढा वरचष्मा करून बघणार नाही.

—जे. एन्. पोंडा
फिनिक्स लायब्ररी


## नवीन दाखल झालेली काही पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १. | बिंदू एके बिंदू – (प्रथम पारितोषिक विजेती कादंबरी) – विनायक डंके | रु. १६/– |
| २. | जातो मी दूरदेशी – (कादंबरी) – सौ. कुसुम अभ्यंकर | रु. १२/– |
| ३. | कशी मोहिनी घातली – (कादंबरी) – सौ. कुसुम अभ्यंकर | रु. १२/– |
| ४ | गुडबाय – (कादंबरी) – सौ. शैलजा राजे | |
| ५. | कनक आणि कामिनी – (कादंबरी) – जयंत ग. देवकुळे | रु. १४/– |
| 1. | **Joey kills** — Joey | Rs. 12/– |
| 2. | **Life After Life**– – (Bestseller – actual case histories that reveal there is Life after Death) – Raymond A. Moodi | Rs. 18·95 |
| 3. | **The Greek Treasure** – (Bestseller – Biographical novel of unflinching courage of the man who discovered the site of Troy) Irving Stone | Rs. 20/– |
| 4. | **The Most Wanded Man** – (Bestseller – Story of Ronald Biggs who committed the crime of the century.) – Mackenzie Colin. | Rs. 15/– |
| 5. | **I Am Not An Island** – (Autobiography) – K. A. Abbas | Rs. 45/– |

**दि फिनिक्स लायब्ररी**
७२७ सदाशिव पेठ, पोस्टासमोर, पुणे ३०.

# टेक इट लाइटली

संजीव मंगरूळकर

## असेही विनोदमूर्ती !

मला हे अगदी मान्य आहे की, कुणी मेल्यावर अजीबात हसू नये. माणसाचा विनोद हा त्याच्या मृत्यूबरोबर संपतो; आणि माणसं आयुष्यभर कितीही विनोदी वागली तरी मरताना अगदी एकजात सारखीच गंभीर असतात. मृत्यू हा प्रसंगच मुळी तितका गंभीर आहे. दुःखद आहे. या गांभीर्याला आपण अगदी मनापासून जपलं पाहिजे अशी माझी प्रामाणिक भावना आहे. विनोद करायला खरं तर, आपलं सगळं आयुष्य एरवी आपल्याला रिकामं आहेच की ! आणि त्याचा वापरही आपण अगदी पुरेपुर करतोच. त्यामुळे कुणीही मेलं की, मी अगदी व्रतस्थपणे, निष्ठेनं गंभीर राहतो. समोरून कुणाचीही प्रेतयात्रा जायला लागली तरीही अगदी गंभीरपणे उभा राहून, मनोमन त्या मृतव्यक्तीच्या आत्म्याला देवाघरी-अल्लाघरी किंवा इतरत्र कुठेही शांती लाभावी अशी प्रार्थना करतो आणि क्षणभर त्या मृत व्यक्तीच्या दुःखात सहभागी होऊन मगच पुढे चालू लागतो. आजवर हे सर्व अगदी न चुकता मनापासून मी करत आलो आहे. ( हे अर्थातच माझ्या सहृदयतेचे लक्षण आहे, हे सूज्ञ वाचकांच्या ध्यानात येईलच ! ) पण काही वेळा प्रसंगच मोठा बाका आणि आणीबाणीचा उद्‌भवतो. माझं नैष्ठिक गांभीर्य काही वेळा अगदी पुरतं ढासळून पडायची वेळ येते ...

परवाचीच गोष्ट. सकाळची धाईगडबडीची वेळ. बाहेर जाण्याच्या गडबडीत मी घरातच आवराआवरी करत होतो. तोच दारावरून मृदंगाचा ठेका ऐकू येऊ लागला. त्या पाठोपाठच काही माणसांचे भावुक आणि संमिश्र स्वरातील गायनही ऐकू येऊ लागले. कसलीशी मिरवणूक चालली असेल; अशा समजुतीने मी प्रथम तिकडे दुर्लक्ष केले. पण या गायनातले गांभीर्य काहीतरी वेगळेच वाटले म्हणून बाहेर डोकावून पाहिले तर प्रेतयात्रा चालली होती. पांढरे स्वच्छ कपडे, स्वच्छ गांधी टोपी, गळ्यात तुळशीच्या माळा अशा गणवेशातली आठ दहा मंडळी प्रेतयात्रेच्या पुढे धार्मिक गायन करीत झांजा वाजवत चाललेली आणि मागून यात्रेतला प्रचंड समुदाय येत होता. खरं तर, अशा प्रेतयात्रांना माणसे गायला आणणे म्हणजे भाडोत्री रडणाऱ्या मंडळींइतकाच विनोदी प्रकार ! पण नातेवाईक मंडळींचा आवाज चांगला नसल्यानं कदाचित अशी भाडोत्री मंडळी लागत असावीत असा विधायक विचार करून मी गंभीर राहिलो. पण हा विनोद एवढ्यावरच थांबला नाही. सतत वाजवल्यामुळे म्हणा किंवा उन्हामुळेही असेल कदाचित पण अचानक मृदंगाचा आवाज उतरला ! अर्थात मृदंग उतरल्याचे माझ्या लक्षात आले याचे कारण माझी गानरसिकता नसून, मृदंगवादकाचा उतरलेला चेहरा हे होते. मृदंग उतरल्याने त्याचा वाजविण्याचा मूड उतरला असावा. त्याच्या कपाळावर आठ्या पडल्या वाजविणे बेताल होऊ लागले. आणि शेवटी मृदुंग हाताबाहेर उतरत चालल्याचे लक्षात आल्यावर वादक चक्क जागीच थांबला. त्याने आपली चोपडी धुंडाळणे सुरू केले आणि एक हातोडी शोधून काढली. मृदंग उतरला असल्याचे एव्हाना आसपासच्या सगळ्याच मंडळींच्या ध्यानात आले असावे. आणि आता त्यावर काहीतरी इलाज होणे त्यांनाही अगत्याचे वाटले असावे. सगळी प्रेतयात्रा त्यामुळे अचानक थांबली आणि मृदंग लावण्याचे काम सुरू झाले ! दोन तीन मिनिटे हे काम निष्ठेने चालू होते. हातोडीने चहू अंगांनी तो मृदंग ठोकून काढला गेला. आणि अगदी कणभर बेसुरी नाही याची खात्री झाल्यावरच मग त्या वादकाने समाधानाने आपली पसंतिदर्शक मान हलवली, आणि आसपासच्यांना त्यांचे गायन सुरू करण्याचा इशारा दिला. पुन्हा एकदा गायन सुरू झाले. आता मृदंगही अगदी स्वरात जमून आला होता. ( कारण एवढी ठोकाठोकी केल्यावर तो स्वरात आला असेच म्हणणे क्रमप्राप्त आहे. खरं तर, इतक्या मंडळींच्या आवाजाच्या गर्दीतून कुठलाच सांगीतिक स्वर शोधणे आपल्या कानाबाहेरचे काम आहे ! ) त्यामुळे गायन अगदी जमून आले, साथही अगदी मनापासून झाली —

धा गि न ति न क धिं ...... चा नाद उठू लागला. एवढा वेळ प्रेतयात्रा मध्येच थांबल्याने उत्कंठेने पुढे बघणारी मागची मंडळीही अखेर पुढे चालू लागली.

संगीताविषयी एवढे असीम प्रेम बाळगून राहिलेल्या या मंडळींचे मला मोठे कौतुक वाटते. मेलेल्या माणसाचे सुरेल अनुरंजन करण्यासाठी भाडोत्री गायकाची व्यवस्था करण्यामागची रसिकता आणि अशा गंभीर प्रसंगीदेखील आपल्यापरीने अगदी सुरेल कार्यक्रम सादर करून आपल्याला दिलेल्या पैशांचा पुरेपूर मोबदला देण्यामागची कार्यनिष्ठा...हा सगळाच प्रकार विलक्षण विनोदी आहे. कदाचित मृत व्यक्ती संगीताची शौकिन असावी आणि असे बेसूर गायन ऐकून त्याच्या मृतात्म्याला शांती न लाभण्याची शक्यता असल्याने कदाचित हा सारा खटाटोप करण्यात आला असावा ! काहीही तरी अशा प्रसंगी गांभीर्य टिकविणे आपल्याला तरी मोठे जिकिरीचे काम वाटते !

असाच एक विनोदी मासला काही वर्षांपूर्वीचा. कुठल्याश्या व्यापाऱ्याची प्रेतयात्रा निघालेली होती. वातावरण अर्थातच अगदी मनापासून गंभीर होते. मृत व्यापाऱ्याचा कोणीसा नातलग हातात मडके धरून मान खाली घालून चालला होता. व्यापारी चांगल्यापैकी पैसेवाला असावा, कारण प्रेतावर फुलाऐवजी नाण्यांचा वर्षाव चालू होता. प्रेतयात्रा माझ्या समोरून जाताना क्षण दोन क्षणच गंभीर होती. तोच आसपासच्या बघ्या पोरांपैकी कुणाच्या तरी हे लक्षात आलं आणि नाण्यांचा हा मुक्तहस्तानं होणारा वर्षाव पाहून बिचारं पोरं हरखून गेलं. क्षणाचंही भान न राहून त्यानं चक्क लोकांमधे उडी घेतली आणि पडूचा नाणी वेचा-

चला लागला. आसपासच्या त्याच्या मित्रांच्याही आता हे लक्षात आले. आता दिरंगाई करण्यात अर्थ नव्हता. अन्यथा ही सुवर्णसंधी हुकणार अशी जाणीव होताच सर्व वानरसेना प्रेतयात्रेवर अक्षरशः तुटून पडली. एकमेकांचे गळे पकडून पैसा गोळा करणे सुरू झाले. या अनपेक्षित प्रकाराने सर्वच शोकविव्हल मंडळी बिचकली. झाला प्रकार कुणाच्याही लक्षात यावयाच्या आतच पोरांनी एक दोघांना उलथून पाडून पैसे मिळवले होते. आणि भरीत भर म्हणून समोरचा मडकं घरून चालणारा माणूस या हलकल्लोळात पुरता भुईसपाट झाला होता. त्याबरोबरही त्याचं मडकंही फुटलं आणि मोठाच बाका प्रसंग उद्भवला. आता पुढे काय होणार या भीतीने मी समोर पाहातो तो पडलेला मडकंधारी देखील मडक्याची मोडकी तोडकी शकलं गोळा करताना हसत असलेला मला दिसला ! आता मलाही हसायला अर्थातच हरकत नव्हती. साहजिकच आहे; भारतासारख्या गरीब देशात पैशाची अशी फुकट उधळपट्टी कोण चालवून घेईल ? पोरे झाली म्हणून काय झाले ? पैशाची किंमत त्यांनाही चांगलीच समजते. आणि ती त्यांना समजली आहे हे अशा रीतीने दाखवताना त्यांना तुमच्या आमच्यासारखा संकोच वाटत नाही, हाच काय तो फरक !

अजून सुद्धा कधीही मडकं वेचत हसणारा तो मारवाडी आणि मृदंग जुळवणारा संगीत तज्ज्ञ आठवले की मला माणसाच्या विनोदबुद्धीची गंमत वाटते. असे 'विनोदमूर्ती' आहेत म्हणून मरणासारख्या गंभीर प्रसंगातही विनोद जगून आहे. आपण आपली विनोदांना मनापासून दाद द्यावी. असे पैसे गोळा करण्याचा प्रामाणिकपणा आपल्यात थोडाच येणार ?

*

## आणखीही काही विनोद

आता विनोदाचाच विषय निघाला म्हणून राजकारणातलेही चार विनोदी चुटके सांगतो. खरं तर सध्याच्या राजकारणावर चारच विनोद सांगून थांबणे म्हणजे थोडा हाताबाहेरचाच संयम आणि हे विनोद तसे वेगळे फोडून सांगण्याचीही खरं तर जरूरी नाही. पण काही काही विशेष घटना मात्र अगदी 'प्रातःस्मरणीय' (!) असतात.

परवा निवडणुका झाल्या ( हा काही विनोद नव्हे !). त्यात जनता पक्ष विजयी होऊन काँग्रेसचा पराभव झाला (हाही काही विनोद नव्हे ! ). पण काँग्रेसचा पराजय होऊन त्यांचा विरोधी पक्ष झाल्यावर मात्र काही आश्चर्यकारक गमतीजमती सुरू झाल्या. इतकी वर्षे आम्ही सत्तारूढ काँग्रेसचा एकेमुखी आदर्श शिस्तपूर्ण कवायतीचा कारभार पाहिला. अगदी काँग्रेसच्या विरोधकांनी सुद्धा त्यांच्या 'पॉवरफुल' नेतृत्वाची तोंड भरून स्तुती केली. श्रीमती इंदिरा गांधी आणि देवकांत बारूआ ('इंदिरा इज इंडिया' फेम) यांच्या समर्थ नेतृत्वाखाली आम्ही काँग्रेसच्या आणि देशाच्या (सुद्धा !) प्रगतीची बेसुमार स्वप्ने पाहिली. जनता पक्षाजवळ नेताच कुठे ? अशी टवाळी आणि हाकाटीदेखील कित्येक राजकीय दार्शनिकांनी केली आणि अचानक निवडणुकीनंतर जनता पक्ष सत्तेवरच आला. आता त्यांच्या कशा लाथाळ्या सुरू होतात, हे बघण्यासाठी ही दार्शनिक मंडळी दिल्लीकडे डोळे वासून पाहू लागली आणि त्यांचे समाधान होणार, अशा काही घटनांची चाहूल लागते न लागते तोच काँग्रेसपक्षीयांनीच विलक्षण उचल घेतली !

आता वस्तुतः काँग्रेस पक्ष विरोधी पक्ष म्हणून थोडा जबाबदार पक्ष बनलेला. त्यातून निवडणुकीच्या आधी काही काळ करमणुकीचा मक्ता पूर्णपणे त्यांच्या सरकारने घेतलेला आणि त्यानंतर अगदी पहिल्यानेच अनुभवाला आलेल्या पराजयाने दुःखी झालेला हा पक्ष आता तो कमची करमणूक करतो ? अशी सामान्यांची कल्पना. आता काँग्रेसमध्ये विचारांचे वारे वाहील. काही मंडळी विचार करून पराभवाचे काही निष्कर्ष काढतील. पक्षात विधायक सुधारणा घडवून एक समर्थ, बलशाली विरोधी पक्ष निर्माण होईल, अशा काही अपेक्षा काँग्रेसकडून होत्या. पण आजवरच्या रीतीप्रमाणे त्याही फोलच ठरल्या. आणि अपयशासाठी 'जबाबदार' अशा व्यक्तींच्या नावाचा एकच पुकारा सुरू झाला ! नेतृत्वबदलासाठी जोरदार मागण्या पुढे येऊ लागल्या.

आता काँग्रेस हा एक पराभूत पक्ष आहे आणि पराभूत संघात नेहमीच असे बदल सतत होत असतात. (आपल्याला आपल्या क्रिकेट संघाचा अनुभव आहेच !) तेव्हा एकंदर अनुभवावरून हे प्रकरण कप्तान श्रीमती इंदिरा गांधी यांच्यावर शेकते की काय, असे काहींना वाटले. पण आश्चर्य ! सर्व काँग्रेसीजनांनी बाईंचे, त्यांच्या नेतृत्वाचे सहानुभूतीपूर्ण कौतुक केले. त्यांच्याकडून अशाच नेतृत्वाची पुन्हा अपेक्षा केली. बाईंवरच्या या प्रेमाने आपण तर हरखून गेलो. आता बाईंचे झंझावाती नेतृत्व काँग्रेसला परत वैभवाप्रत नेणार असे वाटले, तोच बाईंनी पराभवाची पूर्ण जबाबदारी आपल्यावर घेतली आणि काँग्रेस काही अद्याप पुरती कोसळली नसून, पुन्हा प्रयत्न केल्यास ती पूर्वीप्रमाणेच उभी राहील, असे सांगितले. मात्र आता यासाठी आपण नेतृत्व करायला मात्र नकार दिला ! म्हणजे 'पाडते मी, उठा तुम्ही' असा काहीसा प्रकार. बाईंकडून अशी निराशा झाल्यावर आम्ही आशाळभूतपणे युवानेते संजय गांधी यांच्याकडे पाहू लागलो, तर त्यांनी 'सक्रिय' राजकारणातून निवृत्त होण्याचे ठरविले. (आता राजकारण नेहमी निष्क्रिय असते असा आपला अनुभव. सक्रिय असते ते समाजकारण !) आणि म्हणून त्यांनी काँग्रेस महामंडळाचाच राजीनामा देऊन निष्क्रिय राजकारणात प्रवेश केला. अशा रीतीने युवकांच्या एका नेत्रदीपक नेतृत्वाची दारुण शोकान्तिका झाली. मात्र संजय गांधींच्या नेतृत्वाला एकाही काँग्रेसी सभासदाने पराभवाचे दूषण दिले नाही; तर बारूआंच्या नेतृत्वावर प्रखर टीका सुरू झाली. आणि एवढ्या मोठ्या पराभवाची जबाबदारी त्यांच्या खुल्या व्यक्तिमत्त्वावर बिनधोकपणे सोपविण्यात आली. विविध राजीनाम्यांच्या योजनेद्वारा त्यांना पाडण्याचे प्रयत्न सुरू झाले. बारूआंनी मात्र पराभवाची जबाबदारी आपल्यावर घेण्यास साफ नकार दिला आणि बाईंचे (इंदिराजी) आणि त्यांचे बिनसते की काय, असे वाटून एक उच्च प्रकारचा विनोद निर्माण झाला. कारण त्यांनी 'इंदिरा इज इंडिया'ची घोषणा दिल्याला अजून फार दिवस झालेले नाहीत.

हे फार वरच्या पातळीवरचे संघर्ष पण खाली आपल्या महाराष्ट्र काँग्रेसने तर ही वरची परंपरा बरीच पुढे नेऊन दाखविली. मुख्यमंत्री शंकरराव चव्हाणांना अपयशाचे

घनी बनविण्यात आले आणि त्यांचा राजीनामा मागितला गेला. पण त्यांनी मात्र यावर कुशल युक्तिवाद केला. 'महाराष्ट्रातल्या अठ्ठावीस जागा गेल्याचे श्रेय जर मला देता, तर मिळालेल्या वीस जागांचे श्रेयही मलाच हवे. ते इतरांनी घेऊन कसे चालेल?' असा त्यांच्या एका विधानाचा आशय. तात्पर्य, कॉंग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या महाराष्ट्रात कॉंग्रेसला फक्त एक जागासुद्धा जरी मिळाली, तरी ती मिळविण्याचे श्रेय शंकररावांनाच हवे. (उरलेल्या सत्तेचाळीस अपयशाचे मागाहून बघता येईल !) त्यांनी अर्थातच मराठवाड्यावरचा अन्याय दूर करण्यासाठी (स्वार्थासाठी नव्हे !) राजीनामा द्यायला नकार दिला आणि अपयशाची अगदी समसमान वाटणी करून टाकली. पण तरीसुद्धा कॉंग्रेसचे बंडखोर आमदार त्यांच्या राजीनाम्याचे तुणतुणे अधिक उच्चरवाने वाजवू लागले. उलटसुलट सभा झाल्या, सह्यामोहिमा उघडल्या, मिटवल्या, पुन्हा उघडल्या. एकच गोंधळ झाला. शेवटी दिल्लीहून शास्त्रीजी आले. त्यांच्या चर्चा सुरू झाल्या. नेतृत्वबदल होतो की काय, असे वाटू लागले. तोच अर्थमंत्री यशवंतराव मोहिते यांनी एक दिवस विधानसभा निवडणुकांची मागणी केली. जनता पक्षाशी कॉंग्रेसचे याबाबत महाराष्ट्रात एकमत झाल्याचे बघून आम्हीही थक्क झालो. यावर कडी म्हणून मुख्यमंत्र्यांनीही जयप्रकाशांच्या निवडणुका घेण्याच्या सूचनेची जनता सरकारला आठवण करून दिल्याचे आम्ही वाचले. नेतृत्वबदलावरचा हा रामबाण तोडगा आपल्यालाही सुचला नव्हता ! आता काही तरी विलक्षण घडणार म्हणून आम्ही निवडणुकांच्या घोषणेचीच वाट पाहू लागलो.

तोच यशवंतराव मोहित्यांनी हा 'विनोद' केला, असे मुख्यमंत्र्यांनी दुसऱ्या दिवशी सांगितले. आपल्याला तर आश्चर्यच वाटले, एवढा मोठा विनोद आणि तो आपल्याला कसा समजला नाही ?

असो. तर अशा रीतीने एका चांगल्या विनोदाला एक दिवस उशिराने हसण्याचा खेदजनक प्रसंग आमच्यावर आला.

कॉंग्रेसच्या अपयशाची आजवरची फलश्रुती ही अशी आहे. □

## चक्रमचक्री : पृष्ठ १२ वरून

करणार आहे; याच वेळी जॉर्ज फर्नांडिसांवरील खटला मात्र सरकारने मागे घेतला. यात विसंगती आहे, असे नाही तुम्हाला वाटत ?

वरवर पाहता ही गोष्ट विसंगतच नव्हे तर, धोक्याचीही वाटण्याचा संभव आहे. कारण प्रत्येक मंत्रिमंडळ पूर्वीच्या मंत्रिमंडळाची चौकशी करू लागले तर, अनवस्था प्रसंग ओढवेल. शिवाय उच्चपदस्थ व्यक्तींचा संबंध नेहमीच चांगल्या माणसांशी येतो असे नाही. मंत्र्यांशी संबंधित व्यक्तींपैकी कित्येक बेकायदेशीर कृत्ये करणाऱ्या असणारच. आणि तशा गुन्ह्यांशी मंत्र्यांचा दूरचा संबंध जोडता येणेही अशक्य नाही. तेव्हा अपकृत्यांची चौकशी करणे तत्त्वतः योग्य होणार नाही, हे खरे आहे.

त्याचप्रमाणे फर्नांडिसांवरील खटला मागे घेणेही चूक आहे. कारण फर्नांडिस यांनी प्रस्थापित सरकार उलथवण्याचा प्रयत्न केला असा गंभीर आरोप त्यांच्यावर होता. तो आरोप त्यांना अमान्य होता असेही नाही. जनतेने त्यांना निवडून दिले याचा अर्थ त्यांचे गुन्हे शासनाने माफ करावेत, असा होत नाही. पण हे सगळे सकृत्‌दर्शनी !

मग याचा विचार कसा करावयाला हवा? आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, बाईंच्या टोळक्याची चौकशी काय किंवा फर्नांडिसांवरील खटला काय, या केवळ कायद्याच्या कक्षेतील गोष्टी नाहीत. शेख अब्दुल्लांवर नेहरूंच्या कारकीर्दीत राष्ट्रद्रोहाच्या आरोपावरून खटला भरला होता. तो आरोप सिद्ध होऊ शकेल, अशी सरकारची ठाम खात्री होती. पण नेहरू–सरकारनेच तो खटला मागे घेतला की नाही ? इतकेच नव्हे तर, बाईंनी अब्दुल्लांना पुन्हा काश्मीरचे मुख्यमंत्री बनवले की नाही ? हे सगळे का झाले ? शेख अब्दुल्लांशी राजकीय संबंध जोडणे नेहरूंना आणि बाईंना आवश्यक वाटले; म्हणून त्यांनी गंभीर स्वरूपाचा खटला मागे घेतला, इतकेच नव्हे तर सत्ताही शेखसाहेबांच्या हाती सोपविली.

आजच्या राजकीय नेत्यांना फर्नांडिसशी सोयरिक जमविणे फायद्याचे वाटत आहे; कमीत कमी फर्नांडिस हे राजकीय सोयरिकीशी प्रामाणिक राहतील, असा विश्वास वाटत आहे. तसा विश्वास बाईंविषयी त्यांना वाटत नाही. फर्नांडिस–प्रकरण आणि बाईंची चौकशी या गोष्टींचा विचार हा विश्वास आणि अविश्वास योग्य आहे की नाही, याच्या संदर्भात केला पाहिजे. केवळ कायद्याच्या काटेकोर विचारात अडकून राहणे शहाणपणाचे होणार नाही.

म्हणजे फर्नांडिस विश्वसनीय आहेत आणि बाई विश्वसनीय नाहीत !

बाई प्रत्येक राजकीय सोयरिकीला सौदेबाजी समजतात आणि त्यामुळे असे राजकीय करारमदार मोडण्यास त्यांना संकोच वाटत नाही. आताच पाहा ना, शेख अब्दुल्लांना काश्मीरचे पंतप्रधान त्यांनीच बनविले. त्यासाठी करारही केला. आता स्वतःचा पराभव होताच शेखना दिलेला पाठिंबा एकतर्फी काढूनही घेतला. बाईंना राजकीय मैत्रीला काही पावित्र्य असते हेच मान्य नाही. त्यामुळे आपण जर लोकशाही राजकारणाचे आणि तत्संबद्ध राजकीय सोयरिकींचे महत्त्व मानत असू तर, त्यांच्याकडे राजकीय दृष्टीने पाहण्यात अर्थ नाही. त्यांच्यावरचे आरोप सिद्ध झाल्यास एक सामान्य आरोपी म्हणूनच त्यांच्याकडे पाहिले पाहिजे.

फर्नांडिस राजकीय करार पाळतात की नाही, हे अजून ठरावयाचे आहे. सध्याच्या सरकारला त्यांच्याविषयी विश्वास वाटतो, हे उघड आहे.

बाईंच्या अपराधांना क्षमा नाही. कारण क्षमा राजकारणाच्या कक्षेत येते. बाई पूर्वीही राजकारणाच्या बाहेर होत्या आणि पुढेही राजकारणाच्या बाहेरच राहिल्या पाहिजेत. □

# पूर्वीच शिजलेला कट : मलपृष्ठ १ वरून

सुरू झाल्यानंतर मराठवाड्याचे लोक व स्वत: शंकरराव चव्हाण मराठवाड्याला पूर्ण टर्म मिळाली पाहिजे असा युक्तिवाद करू लागले आहेत. म्हणूनच महाराष्ट्रात सध्या जे घडत आहे त्यात अनपेक्षित असे काही नाही. घडत आहे ते अटळ होते.

□

लोकसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या तेव्हा, देशात काय घडणार याविषयी चित्र स्पष्ट नव्हते. विरोधी पक्षांना लोकसभेत मोठ्या संख्येने यश येईल एवढाच अंदाज वर्तवला जात होता. अशा वातावरणात महाराष्ट्राच्या निवडणूक अंदाजासंबंधी चर्चा चालू असताना महाराष्ट्र सरकारचा एक सचिव माझ्याशी बोलताना म्हणाला होता, 'महाराष्ट्रात काँग्रेसला २३ ते २६ जागा मिळतील.' सरकारी निर्णयाचा विचार करून त्याने आपला अंदाज वर्तवला होता. ज्या दिवशी सचिवाने हे सांगितले त्याच दिवशी सायंकाळी ४ च्या सुमारास मला काँग्रेसचा एक पुढारी रिगल सिनेमाजवळ भेटला. सचिवाचा अंदाज व त्यामागची सचिवाने सांगितलेली कारणे या पुढाऱ्याला मी सांगितली. तेव्हा या पुढाऱ्याने जे निदान केले ते सचिवाच्या अंदाजापेक्षा धक्कादायक होते. 'उत्तर प्रदेशमध्ये काँग्रेसला अल्पप्रमाणात जागा मिळतील. अशा परिस्थितीत महाराष्ट्राच्या दिल्लीतील नेत्यांना नको असलेले उमेदवार महाराष्ट्रात पाडले जातील. त्यामुळे महाराष्ट्रात काँग्रेसपेक्षा जनता पक्षाचे उमेदवार अधिक निवडून येतील. महाराष्ट्रात पडणारे काँग्रेसचे उमेदवार यशवंतरावांना ( चव्हाण ) मानणारे असणार नाहीत तर, श्रीमती गांधींना मानणारे अधिक असतील.' असे विवेचन त्या काँग्रेस-पुढाऱ्याने केले होते. त्याने सांगितल्याप्रमाणे महाराष्ट्रात निकाल लागले आहेत. या पुढाऱ्याने हे विवेचन केले तेव्हा जगजीवनराम यांनी काँग्रेसचा राजीनामा दिलेला नव्हता, याचाही उल्लेख केला पाहिजे.

## कोकण मराठवाड्यातील उमेदवार पाडण्यात आले

महाराष्ट्रात काय घडवायचे आहे, ते कसे घडवायचे याचे आडाखे आधीच बांधले गेले होते. जगजीवनराम यांनी काँग्रेसचा राजीनामा दिल्यानंतर काँग्रेस उमेदवारांचा फेरविचार करण्यात आला. श्रीमती इंदिरा गांधी यांनी महाराष्ट्रातील उमेदवारांचा फेरविचार करण्याचा विषय यशवंतराव चव्हाण यांच्याजवळ काढलाही होता; पण यशवंतरावांनी उमेदवारांचा फेरविचार करण्याची जरूरी नाही, उमेदवार एकमताचे आहेत असे सांगितले. निवडणुकीच्या निकालात मराठवाड्यातील तसेच कोकणातील काँग्रेस उमेदवार नेम धरून पक्षी पाडावेत तसे पाडले गेले! पडलेले उमेदवार शंकरराव ज्या मराठवाड्यातून आले त्या भागातील प्रामुख्याने आहेत. पराभवाचे खापर शंकरराव चव्हाण यांच्या माथ्यावर फोडण्यासाठी योग्य वातावरण निर्माण करण्यात आले. शिवाय बाईंना व शंकररावांना निष्ठा' वाहणारेच टिच्चून पडले.

राज्यातील सध्याच्या घडामोडीचा उगम या घटनांतून सुरू होतो. शंकररावांचा स्वभावही असा आहे की, माणसे जोडण्यापेक्षा तोडण्यातच ते वाकबगार आहेत. एक भाषण केले की, ते किती शत्रू निर्माण करतील याचा हिशोब करणेही अवघड व्हावे! त्यांचा स्वभाव, त्यांची भाषणे ही कारणे पक्षातील त्यांच्या विरोधकांना उपयोगी पडली नसती तरच नवल!

## सह्यांची मोहीम

लोकसभा निवडणुकीचे निकाल विधिमंडळ अधिवेशन २१ मार्चला सुरू होत असताना लागले. त्यामुळे अधिवेशनाची सुरुवात राज्यपालांच्या अभिभाषणाने होण्याऐवजी शंकरराव चव्हाण-विरोधी हालचालीने सुरू झाली. लॉबीमध्ये चव्हाण विरोधी सह्या उघडपणे घेण्याचे काम होत होते. या मोहिमेत भाऊसाहेब वर्तक, मधुकरराव चौधरी, शंकरराव गेडाम, नामजोशी हे काढून टाकलेले मंत्री होते. लॉबीमध्ये सह्यांचा कागद घेऊन आमदारांना सह्या करण्यास सांगितले जात होते. विधानपरिषदेचे अध्यक्ष वि. स. पागे यांच्या कार्यालयामधील मोठ्या हॉलमध्ये वसंतरावदादा पाटील, शंकरराव मोहितेपाटील वगैरे शुगर सिंडिकेटचे प्रतिनिधी व त्यांचे अनुयायी बसलेले होते. सह्यांचा कागद त्यांच्याजवळ होता. एकेका आमदाराला बोलावून सही करण्यास सांगितले जात होते. लॉबीमध्ये दुसरा कागद घेऊन काहीजण फिरत होते. माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या अलिशान घरातही कागद ठेवला होता. अशा प्रकारे सह्या घेण्याची तीन-चार केंद्रे उघडली गेली होती. दादा-शंकरराव मोहितेपाटील-वसंतराव नाईक यांसारख्या मातब्बरांनी आमदारांपुढे कागद ठेवून सही कर; असे सांगितले तर किती सामान्य आमदारांची सही नाकारण्याची हिम्मत होणार होती? सुरुवातीला या नेत्यांची नाराजी पत्करण्याऐवजी ते मुकाट्याने सह्या करत होते. अशा परिस्थितीच्या वेळीही भाऊसाहेब वर्तकांना पत्रकारांनी किती सह्या गोळा झाल्या, असे विचारले, तेव्हा त्यांनी आकडा सांगितला नाही; पण ह्यांचे भडकू डोके भडकले! पत्रकारांच्या दंडाला धरून बाजूला ढकलत 'खूप झाल्यात' असे दरडावू लागले! या त्यांच्या वागण्यावरून सुरुवातीला सही करणारे किती असावेत याचा आकडा दिसू लागतो. वसंतराव नाईक अ. भा. काँग्रेस कार्यकारिणीचे सदस्य आहेत. तेही मोहिमेत आघाडीवर होते. सह्यांची मोहीम सुरू केली. पण शंकररावांनंतर कोण असा प्रश्न या मंडळींना केला की, ते सांगावयाचे, ते आम्ही ठरवलेले नाही!! 'तो प्रश्न पुढचा आहे!' या उत्तराचा परिणाम असा होऊ लागला, की सह्या करण्यासाठी लोक म्हणावे तसे पुढे येत नव्हते. पुढचा नेता म्हणून शरद पवार-यशवंतराव मोहिते यांची नावे घेतली जात होती. पवार ज्युनियर. सीनियरना पवारांचे नेतृत्व मानवणारे नाही. त्यामुळे पवारांचे नाव उपयोगी पडत नव्हते. पवार येणार असतील तर शंकरराव चालतील, अशी भूमिका घेतली जात होती. साहजिकच शरद पवार पहिल्या फेरीपूर्वीच बाद झाले. यशवंतराव मोहिते यांच्या बाजूला १५-२० आमदारांपेक्षा जास्त आमदार नाहीत. साखर

कारखान्यांशी मोहिते संबंधित असले तरी शुगर सिंडिकेटचा शिक्का त्यांच्यावर बसलेला नाही. शुगर सिंडिकेटवाले मोहितेंना 'आपल्या कळपातील' मानत नाहीत. शिवाय मोहिते स्वतंत्र बाण्याचा माणूस! यशवंतराव चव्हाणांच्या हातात राहणारी पश्चिम महाराष्ट्रातील व्यक्ती नेतेपदासाठी आणण्याचे प्रयत्न केले जात होते. किंबहुना शंकररावांनी यशवंतराव चव्हाण यांच्या विरुद्ध पवित्रा घेतला, त्यामुळेच त्यांच्याविरुद्ध मोहीम सुरू झाली होती, हे खरे कारण शंकररावांविरुद्धच्या मोहिमेचे आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या पाठिंब्यानेच सह्या गोळा केल्या जात होत्या, हे उघडेनागडे सत्य आहे.

## मोहिते–Exit

यशवंतराव चव्हाण यांना पवार यांनी मुख्यमंत्री व्हावे, असे मनोमन वाटत आहे. ते शक्य नाही असे दिसून आले तेव्हा मोहिते आपला क्लेम करू लागले. मोहिते यांच्याकडे नेतृत्व जाणे यशवतराव चव्हाण यांना मान्य नाही. अशा कात्रीत महाराष्ट्राचे नेते सापडले तेव्हा वसंतरावदादांचे नाव शंकरराव मोहिते-पाटील आदी मंडळींनी पुढे आणण्याचा खटाटोप केला व त्याला यशही आले. वसंतरावदादांच्याकडे लोकांना बरोबर घेऊन जाण्याचे नेतृत्वाचे कसब आहे, पण त्यांच्याजवळ प्रशासकीय गुण नाहीत, हे त्यांचे वैगुण्य!

वसंतरावदादा यांच्या या वैगुण्यामुळेच ते आपल्या हाताबाहेर जाणार नाहीत, आपले नेतृत्व मान्य करून दादा कारभार करतील, याची खात्री असल्यामुळे यशवंतराव चव्हाण यांनी दादांच्या नावाला संमती दिली. मुख्यमंत्री होण्यास यशवंतरावांची संमती मिळताच 'कॉंग्रेसच्या घराला आग लागली असताना आपण गप्प बसू शकत नाही. आग विझवण्यासाठी मी पुन: राजकारणात येत आहे,' असे सांगून दादांनी राजकारणात प्रवेश केला. 'खुर्ची जाते तेव्हा राजकारणसंन्यास व खुर्ची मिळण्याची शक्यता निर्माण होताच, आग विझवेपणाची भूमिका घेऊन राजकारण प्रवेश' असे वर्णन मुख्यमंत्रिपदाची इच्छा बाळगणारांनी दादांच्या राजकारण प्रवेशाचे केले. दादा मुख्यमंत्री झाले तर चालतील; पण 'दादीच' म्हणजे शालिनीताई आमच्या डोक्यावर बसतील, ही भूमिका यशवंतराव मोहिते यांच्याप्रमाणेच अनेकांनी घेतली. त्यात बरेच मंत्रीही होते. दादांच्या कानी ही भीती गेली तेव्हा, शालिनीताई समाजकारण करतील, राजकारणात त्यांना भाग घेऊ दिला जाणार नाही, असे आश्वासन दादांकडून दिले गेले.

विधिमंडळ कॉंग्रेस पक्षाची बैठक ८ एप्रिल रोजी भरवली. त्याच्या तीन–चार दिवस आधीपर्यंत यशवंतराव मोहिते नेतेपदाची निवडणूक लढवणार, असे म्हणत होते. त्यांच्यामागे उभे राहणाऱ्या आमदारांना ते, मी दादांच्या विरोधात नेतेपदाची निवडणूक लढवणार, असे सांगत होते आणि हे आमदार कोणत्याही परिस्थितीमध्ये यशवंतराव मोहिते निवडणूक लढवणार, असे पत्रकारांना सांगत होते. यशवंतराव मोहिते किती 'लढाऊ' आहेत, याचा अनुभव पत्रकारांना १९६७ पासून वेळोवेळी आला आहे. यशवंतराव मोहिते नेतेपदासाठी निवडणूक लढवणार असे म्हणत असले तरी, त्यांचा तो निर्धार टिकणार नाही, असे पत्रकार आमदारांना विश्वासाने सांगत होते. शंकरराव चव्हाण पक्ष-बैठकीत प्रथम विश्वास अजमावतील व मग नव्या नेत्याची निवड होईल, असे वातावरण राहिले नव्हते. एकदमच नेता निवडला जाईल. त्या वेळी शंकरराव चव्हाण, वसंतदादा पाटील व मोहिते अशी तिरंगी लढत होण्याची लक्षणे काही काळ दिसत होती. तशी लढत झाली तर, दादा व मोहिते यांच्यात पश्चिम महाराष्ट्रातील मते विभागतील व शंकरराव चव्हाण यांना अधिक मते मिळतील, असा जेव्हा रागरंग दिसू लागला, तेव्हा दादांनी यशवंतराव मोहिते यांच्याशी समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न सुरू केला. दादांचा मोहिते यांच्याशी समझोता करण्याचा प्रयत्न चालू होता तेव्हा मोहिते यांनी जयप्रकाश नारायण यांचे आव्हान स्वीकारून विधानसभा निवडणूक घ्यावी, असा पवित्रा घेतला व त्याप्रमाणे त्यांनी आमदारांचा पाठिंबा मिळवण्यास सुरुवात केली. नव्याने निवडणुका झाल्या तर, दादांचे मनसुबे उडवून लावता येतील, असा मोहिते यांचा डाव आहे, असे दादा–गटाच्या काहींना वाटत होते. लोकशाही मूल्ये जतन करण्यासाठी, तसेच पक्षातील भांडणे थांबवण्याकरता निवडणूक घ्यावी असे आपले मत असून, त्यासाठी आमदारांचा पाठिंबा मिळवत आहे असे यशवंतराव मोहिते यांनी स्वतःच पत्रकारांना सांगितले. पण त्याच रात्री आपण तसे बोललो नाही, अशी कोलांटउडी मोहिते यांनी मारली. पत्रकारांपुढे मांडलेला विचार मोहिते यांनी आमदारांपुढेही मांडलेला होता. ज्या आमदारांशी त्यांनी नव्या निवडणुकांबाबत विचार केला असे आमदार, आपण असे बोललोच नाही, असे मोहिते म्हणू लागले त्यामुळे बिथरले. 'मोहिते बेभरवशी माणूस आहे. त्यांनी आमच्याशी तशी चर्चा केली होती. पत्रकारांना खोटे पाडणारा माणूस आम्हाला सहजासहजी तोंडघशी पाडील,' असे आमदार म्हणू लागले. मोहिते यांनी कोलांटउडी मारल्यामुळे त्यांच्यामागे उभे राहणारे आमदार बाजूला झाले. विधानसभेच्या निवडणुका घ्याव्यात, असे मत पत्रकारांजवळ मोहिते यांनी व्यक्त केले ते त्यांनी मागे का घेतले? याविषयी चौकशी केली तेव्हा यशवंतराव चव्हाण यांनी मोहिते यांची या भूमिकेबाबत कानउघाडणी केली, म्हणून मोहिते आपण तसे बोललोच नव्हतो, असे म्हणू लागले असे कळले. महाराष्ट्रात निवडणुका घेतल्या तर, इतर राज्यांतही त्या घेतल्या जातील. परिणामी कॉंग्रेसच्या हातात असलेली राज्ये निघून जातील, म्हणून यशवंतराव चव्हाण यांनी मोहिते यांची कानउघाडणी केली.

## शक्तिस्थानांची जोपासना

शंकरराव चव्हाण यांच्या विरोधी वातावरण गेले याचेही आश्चर्य वाटायला नको. तसे पाहिले तर आमदारांची निवड झाली, त्याचवेळी वसंतराव नाईक यांना मानणाऱ्या उमेदवारांना प्रामुख्याने तिकिटे दिली होती. या विधानसभेत शंकररावांची माणसे आहेतच कोठे? त्यात शंकररावांनी माणसे तोडलेली! मंत्री केले नाही म्हणून भ्रष्ट झालेले बाळासाहेब पवार, उपमंत्री बाबूराव काळे यांसारखे मराठवाड्यातील लोकही दादा गटाला मिळाले. वसंतराव नाईक यांच्याविरुद्ध वसंतरावदादा पाटील गेले होते, तेही समान उद्दिष्टासाठी एक झाले.

वसंतराव नाईकांना घालवल्याशिवाय आपल्या पोळीवर तूप ओढता येणार नाही, याची खूणगाठ बांधल्यामुळे दादा – पवार, मोहिते नाईकांच्या विरोधात आणि शंकरराव चव्हाण यांच्या बाजूला आले होते. त्यामुळेच शंकरराव चव्हाण यांना निष्ठा वाहणारे बहुसंख्य आमदार नसताना शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री झाले होते. शिवाय इंदिरा गांधी यांची एकछत्री राजवट होती. त्याकाळात शंकररावांना वरून आदेश गेले होते. महाराष्ट्रात शंकररावांची पाळेमुळे नव्हतीच. नेतृत्व वरून लादून प्रस्थापित होत नसते याची जाणीव आता तरी शंकररावांना झाली असावी ! जिल्हा मध्यवर्ती बँका, साखर कारखाने व जिल्हा परिषदा हे सत्तेचे अड्डे आहेत. त्या ठिकाणी आपली माणसे असल्याशिवाय महाराष्ट्रात नेतृत्व प्रस्थापित करता येणार नाही. शंकररावांची शक्तिस्थाने सत्तेच्या या अड्ड्यात नव्हतीच. बाईंच्या मर्जीने, संजयच्या बोटाला धरून उदयास येत नसते. या मार्गाने उदयास आलेले नेतृत्व पावसाळ्यात उगवणाऱ्या छत्र्या यांचे अस्तित्व सारख्याच आयुर्मानाचे ठरते ! म्हणूनच साखर कारखानदार, जिल्हा बँकांचे अध्यक्ष, जिल्हा परिषद अध्यक्ष एक होताच शंकररावांचे आसन भूकंपाच्या प्रचंड धक्क्याने हादरावे त्याप्रमाणे हादरले. भाऊसाहेब हिरे यांचा पराभव केल्यानंतर यशवंतराव चव्हाण यांनी सत्तेच्या या अड्ड्यावर आपली माणसे आणली त्यामुळेच अजूनही महाराष्ट्रात त्यांच्या नेतृत्वाची पाळेमुळे खोलवर गेली आहेत. त्यामुळेच इंदिरा गांधींना त्यांच्या कर्तृत्वाची व लोकप्रियतेच्या भरतीच्या काळातही महाराष्ट्रातून यशवंतरावांचे उच्चाटन करता आले नाही

शंकरराव चव्हाण यांनी आपल्या अल्पशा कारकीर्दीमध्ये यशवंतरावांविरुद्ध पवित्रा घेतला नसता, किंवा साखर कारखानदार, बागायतदार यांचे हितसंबंध दुखावले नसते तर शंकरराव चव्हाणही वसंतराव नाईकांप्रमाणे १० – १२ वर्षे मुख्यमंत्री म्हणून राहिले असते. वसंतराव नाईक नाहीरे-वाल्यांचे हितकर्ते होते अशातला भाग नाही. ते स्वतः हितसंबंधित होते, शिवाय त्यांनी यशवंतरावांविरुद्ध – शेवटचा काही काळ काढता –पवित्रा घेतला नव्हता. म्हणूनच ते ११/१२ वर्षे मुख्यमंत्री राहिले. शंकररावांच्या मागे साखर कारखाने, सहकारी चळवळ, जिल्हा बँका ही सत्तेची स्थाने पाठीशी नसताना त्यांनी कमाल जमीन धारणा कायद्याची अंमलबजावणी धडाक्याने सुरू करून अतिरिक्त जमीन ताब्यात घेऊन वाटप करण्याचा धडाका लावला. ऐपत असूनही सहकारी कर्ज परत न करणारांविरुद्ध कारवाई केली. कर्जाची वसुली करण्याचा सपाटा लावला. साखर कारखान्यांनी आपापल्या क्षेत्रात जणू पर्यायी सत्ता निर्माण केली. त्याला आळा घालणारे उपाय सुरू केले. त्यांच्या चौकशा सुरू केल्या. हे सारे हितसंबंधवाल्यांना कसे मानवणार ? ही सारी मंडळी एक झाली, आणि त्यांनी शंकररावांना घालवून देण्याचा चंग बांधला. शंकरराव चव्हाण यांच्या कारकीर्दीला चाळीस दिवस झाले होते तेव्हा ५ एप्रिल १९७५ च्या 'माणूस' मधील लेखात मी याचा उल्लेख केला होता.

**'वशिल्याने आमदारांची कामे होण्याचे प्रमाण कमी झाले की, आमदार नाराज होत जातील. बागायतदारांचे बागायती पाणी कमी केले, धान्याची, कर्जाची वसुली काटेकोरपणे सुरू झाली की, या वर्गाच्या हिताला बाधा येणार आहे. बागायतदार-बडे शेतकरी यांचा राजकीय जीवनावर प्रभाव आहे. या सर्व परिस्थितीचा परिपाक म्हणजे शंकरराव चव्हाण यांना कारभार करणे अवघड जाणार आहे–येत्या दोन वर्षांत घोड्यावरची मांड पक्की केली नाही तर, वर नमूद केलेल्या कारणांमुळे शंकररावांविरुद्ध बंडखोरी होण्याचा धोका कायम राहील.'**

शंकरराव चव्हाण यांच्या विरोधी गेलेली माणसे कोण आहेत, यावर नजर टाकली की, निवडणूक पराभवामुळे काँग्रेस पक्षाच्या हिताला धोका पोचल्यामुळे ही मंडळी चिंताग्रस्त झाली आहेत की, त्यांच्या स्वतःच्या हिताला धक्का बसल्यामुळे खवळून उठली आहेत, हे समजून येईल. जर सामान्य माणसासाठी शंकररावांचे धोरण होते तर, सामान्य माणूस त्यांच्या बाजूने उभा का नाही, असा प्रश्न उभा केला जाईल. पण सामान्य माणसाचा आवाज कसा दडपला जाऊ शकतो, याचा अभ्यास करण्यासाठी ग्रामीण भागात गेले पाहिजे. मातब्बरांच्या शक्तीपुढे सामान्यांचा आवाज क्षीण ठरतो ! ◻

**'१९७७ मध्ये दादा नेतेपदासाठी कॉंटेस्ट करतील. मुख्यमंत्रिपदासाठी शो-डाऊन होईल आणि दादा तेव्हा विजयीही होतील–यावेळी वसंतरावदादा पाटील–वसंतराव नाईक, नाशिकराव तिरपुडे वगैरे एकत्र येतील.' असे १३ मार्च १९७६ च्या 'माणूस'मध्ये मी म्हटले होते.**

त्याचा प्रत्यय आज पाहण्यास मिळत आहे. माणूसमधील जुन्या लेखांचे उतारे मी म्हटले ते खरे ठरले हे सांगण्याच्या उद्देशाने उद्धृत करत नाही, तर आज शंकरराव चव्हाण यांच्या विरोधी राजकारण चालले आहे, ते घडवून आणण्याचा डाव पूर्वीच कसा ठरला होता, हे दाखवून देण्यासाठी जुन्या लेखांचे उतारे दिले आहेत.
◻

## नेता-हटावचे कंत्राटदार

गेल्या वर्षीच्या सुरुवातीला पी. के. सावंत अध्यक्ष नकोत, अशी मागणी आमदारांनी कॉंग्रेस अध्यक्ष देवकांत बरुआ यांच्याकडे केली होती, पण तो प्रयत्न यशस्वी झाला नाही. त्यानंतर चालू वर्षाच्या सुरुवातीलाही पी. के. सावंत यांच्याविरुद्ध मोहीम सुरू करण्यात आली. पी. के. सावंत यांना पुढे करून, आपल्याविरुद्ध ही मोहीम चालली आहे, असे शंकरराव चव्हाण म्हणत होते. लोकसभेची निवडणूक येताच सावंत यांच्याविरुद्ध पुन्हा जोर करण्यात आला. चव्हाण-विरोधी गटाला आपल्या गटाचा अध्यक्ष हवा होता. शंकरराव चव्हाण यांनी हाही डाव उलटवला आणि पी. के. सावंत यांच्याऐवजी त्यांना हवे असलेले नरेंद्र तिडके यांना अध्यक्ष करण्यात यश मिळवले. निवडणुकीत पराभव होताच चालून आलेली संधी चव्हाण-विरोधी गट सोडणे शक्य नव्हते. चव्हाण यांच्यानंतर मुख्यमंत्री कोणाला करावयाचे, असा विचार सुरू झाला तेव्हा माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या नावाचीही प्रथम चर्चा झाली. म्हणून त्यांची खासदार म्हणून निवडून आल्यावर आमदारकीचा राजीनामा अगदी अखेरच्या क्षणी दिला. पश्चिम महाराष्ट्राच्या नेतेपदासाठी

आग्रह धरला गेल्याने नाईक यांचे नाव मागे पडले. त्यानंतर प्रदेश काँग्रेसचा अध्यक्षपदासाठी नाईकांच्या नावाची चर्चा सुरू झाली.

चव्हाण यांच्या विरोधात मोठ्या प्रमाणावर वातावरण निर्माण झाले असूनही ते स्वतः होऊन राजीनामा देण्यास तयार नव्हते. त्यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणण्याच्या विचारापर्यंत जावे लागले तरी, शंकरराव चव्हाण खुर्चीला चिकटून राहण्याचा आटापिटा करू लागले. विधिमंडळ काँग्रेस पक्षाची अधिवेशन काळात प्रत्येक आठवड्याला बैठक भरावयाची; पण या अधिवेशनात पक्षाची बैठकच बोलावली नाही. परिस्थितीला सामोरे जाण्याची टाळटाळ यामागे होती हे उघड आहे. त्याचप्रमाणे चव्हाण विरोधी गटाकडे बहुसंख्य आमदार असताना त्या गटाकडे विधिमंडळ काँग्रेस पक्षाची बैठक (रिक्विझिशन मीटिंग) बोलावण्याची मागणी का केली नाही? असाही प्रश्न पडतो. पुरेशा सह्या मिळत नव्हत्या, तेव्हा विधानसभा बरखास्त करण्याचा निर्णय शंकरराव घेतील अशा धमक्या गटागटांतर्फे दिल्या जात होत्या, असे शंकरराव चव्हाण गटाचे लोक म्हणत. त्याचप्रमाणे आपल्या बाजूने सह्या केल्या नाही तर, विधानसभा बरखास्त करू अशी धमकी शंकरराव चव्हाण देत आहेत असे चव्हाण विरोधी गटाचे लोक म्हणत! धमक्या दिल्या जात आहेत हा आरोप दोन्ही बाजूने केला जात होता.

वसंतराव नाईक यांना काढण्यासाठी दादा, पवार, मोहिते आदींनी पुढाकार घेतला होता त्याला बाबुराव कोतवाल, मोरे, लोणारी, एस. एन. देसाई आदी आमदारांनी हातभार लावला होता. हीच मंडळी शंकररावांना घालवण्यात पुढे आली. नेता हटवण्याचे कंत्राटच जणू या लोकांनी घेतले आहे!

महाराष्ट्रातील नेत्यावर आमदारांचा विश्वास नाही याची सत्यता पाहण्याकरता हरेकृष्ण शास्त्री आले त्यांनी पाठवलेला अहवाल एकतर्फी आहे असे शंकरराव चव्हाण यांनी सांगितल्यामुळे, सुब्रह्मण्यम यांना पाठवण्यात आले. शंकरराव चव्हाण जाणार याचे वातावरण मोठ्या प्रमाणावर निर्माण होऊ लागले, तसे शंकररावांना पाठिंबा देणाऱ्याची संख्या कमी होऊ लागली. बुडत्या जहाजाबरोबर राहण्याइतकी निष्ठा काँग्रेस जनात नसल्यामुळे तरत्या जहाजात बसून काही 'जमते' का पाहणारेच अधिक निघणे स्वाभाविक होते. परिस्थिती पाहून शंकररावांनी स्वतः होऊन राजीनामा दिला असता तर, त्यांची एवढी नाचक्की झाली नसती! शंकररावांवर निष्ठा असणाऱ्या उमेदवारांमधून निवड करून बनलेले सध्याचे आमदार नाहीत. केंद्रीय नेत्यांचा वरदहस्त नाही. या परिस्थितीत खुर्चीला चिकटून राहण्याचा आटापीटा शंकररावांनी का करावा हेच समजत नाही. तडजोडीसाठी शंकररावांनी प्रयत्न केले आणि काढून टाकलेल्यांपैकी काहींना पुनः मंत्री करण्याचे आश्वासन दिले. पण ही तडजोड स्वीकारण्याच्या मनःस्थितीत दुसरा गट नव्हता. उलट, दादांच्या मंत्रिमंडळात शंकररावांसह त्यांच्या इतर काही लोकांना मंत्री करण्याची तयारी दादांनी दाखवली!

विधिमंडळ काँग्रेस पक्षाच्या ८ एप्रिलच्या बैठकीत निरीक्षक म्हणून आलेले श्री. सुब्रह्मण्यम यांनी केलेल्या भाषणामुळे शंकररावांना स्वच्छ नोटीसच देण्यात आली असे म्हणावे लागेल.

'पक्षांतर्गत लोकशाही पाळली जाईल. मी माझा निर्णय तुमच्यावर लादणार नाही. तुम्ही जो निर्णय घ्याल तो मान्य केला जाईल; पण जो निर्णय होईल तो खिलाडूपणाने स्वीकारावा,' असे सुब्रह्मण्यम् म्हणाले. नेता बदलण्यासंबंधीचे वातावरण लक्षात घेता, आमदारांचा निर्णय एकच होणार आणि तो म्हणजे शंकररावांनी मुख्यमंत्रिपद सोडणे. सुब्रह्मण्यम् यांचे भाषण पावणेसहाला संपले. त्यांच्या भाषणाचा सूर पाहून प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नरेन्द्र तिडके यांनी वाटाघाटीच्या पर्वाला सुरुवात करण्याची सूचना मांडली. सुब्रह्मण्यम् यांना ती आवडली. त्यांनी शंकरराव चव्हाण, तिडके, वसंतरावदादा पाटील व वसंतराव नाईक यांच्याशी चर्चा केली. या चर्चेत शंकररावांना पाठिंबा देणाऱ्यांना राजकीय वाळीत टाकण्यात येऊ नये, यावर भर दिला गेला. दादा–गटाने त्याला तत्वतः मान्यता दिली.

□

वसंतरावदादा मुख्यमंत्री झाल्यानंतर २–३ वर्षे त्यांचे नेतृत्व मान्य केले जाईल; पण पुढे प्रशासकीय क्षमतेचा प्रश्न हातात घेऊन पश्चिम महाराष्ट्रातील अन्य इच्छुक उठाव करतील की, सहकारी चळवळ, बडे जमीनदार–बागायतदार यांच्या हितसंबंधांना दादांच्या राजवटीत संरक्षण मिळण्याची हमी असल्यामुळे वसंतराव नाईकांप्रमाणेच दादांची राजवट दीर्घकाळ चालणार? सहकारी चळवळीतील अपप्रकारांची चौकशी करण्यास शंकररावांनी सुरुवात करताच शंकरराव सहकारी चळवळीविरुद्ध आहेत, असा प्रचार करण्यात आला होता. त्यावरून सहकारी चळवळीला दादांच्या कारकीर्दीत 'संरक्षणाची' हमी मिळणार, हे सांगायला नको. मराठवाड्यात शंकररावांनंतर नेतेपदासाठी पात्र अशी दुसरी व्यक्ती १०–१५ वर्षांत तयार होणार नाही. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्र व विदर्भ यांच्यातील हितसंबंधितांचे राजकारण महाराष्ट्रात चालेल. विदर्भातील जमीनदार, पश्चिम महाराष्ट्रातील साखर कारखानदार व बागायतदार हातात हात घालून महाराष्ट्राचे राजकारण चालवणार. सामान्य माणसाच्या दृष्टीने विचार करता, पश्चिम महाराष्ट्रातील यशवंतराव मोहिते हे काहीसे आशास्थान ठरले असते. त्यांच्याजवळ निश्चित स्वरूपाची वैचारिक बैठक आहे. त्यामुळे ते काहीतरी बदल घडवून आणू शकतील! पण त्यांच्याजवळ माणसांचा गट नाही. कार्यकर्त्यांनी आपले नेतृत्व स्वीकारावे, कार्यकर्त्यांना काही कळत नाही, हा अहंभाव त्यांच्या ठिकाणी असल्यामुळे ते कार्यकर्ते बरोबर घेऊन जाऊ शकत नाहीत, हा त्यांचा दोष आहे. हितसंबंधितांच्या राजकारणाला त्यांच्या कारकीर्दीत तुलनेने आळा बसला असता हे निश्चित!

□

मराठी चित्रपट । शिरीष सहस्रबुद्धे

# खानोलकरांची 'चानी' पडद्यावर आलीच नाही

व्ही. शांताराम यांनी कै. चि. त्र्यं. खानोलकरांच्या 'चानी' या कादंबरीच्या आधारे निर्माण केलेला त्याच नावाचा चित्रपट पुण्याला मराठी आणि मुंबईला हिंदी आवृत्तीसह प्रदर्शित झाला आहे, त्याचे दिग्दर्शक दस्तुरखुद्द चित्रपती व्ही. शांताराम हेच असल्यामुळे म्हणा किंवा अन्य काही कारणांमुळे म्हणा, चित्रपटाची तोंडभर स्तुती करण्याची एखादी चढाओढच जणू प्रेक्षकांत आणि समीक्षकांत लागून राहिली आहे. निदान पुण्या-मुंबईच्या अनेक वृत्तपत्र नियतकालिकांत 'चानी' ला वारेमाप प्रशंसा मिळालेली दिसते खरी. माझा कुणाही व्यक्तीवर आक्षेप किंवा रोख नाही. कारण स्वतःचे मत बनवण्याचा आणि व्यक्त करण्याचा हक्क (आता तरी) प्रत्येकाला आहेच. शिवाय या चित्रपटाच्या जाहिराती मोठ्या नामी आहेत. चित्रपट प्रायोगिक, कलात्मक आणि शिवाय वास्तव असल्याचा इतका जोरदार डांगोरा प्रत्येक जाहिरातीतून पिटला जातोय् की, त्याच्या खरेपणाबद्दल आपल्या मनाविरुद्धही आपली खात्री पटायची शक्यता नाकारता येणार नाही. उदाहरणार्थ, 'या चित्रपटाचे शेवटचे कलात्मक दृश्य चुकवू नका,' असा दम प्रेक्षकांना देताना त्याच्या कलात्मकतेचा इतका निखालस निर्वाळा जाहिरातकार देतात की, प्रेक्षक शेवटापाशी 'त्या' प्रतीक्षेतच आत्मविश्वासपूर्वक बसून राहतात. प्रेक्षकांच्या अभिरुचीला वळण देण्याचं काम चांगल्या कलाकारांप्रमाणे वाईट जाहिरातकारही करू शकतात असं दिसतंय्. असो. जाहिरातीची अधिक चिरफाड करण्यात अर्थ नाही, कारण ते 'चानी' चं धंदेवाईक अंग आहे, प्रायोगिक नव्हे. मुद्दा असा की, हा चित्रपट प्रायोगिक, कलात्मक आणि वास्तवचित्रण करणारा आहे, असा जो आग्रह शांतारामबापूंचा आहे, त्याला चित्रपटात फारसा आधार मला सापडला नाही. शांतारामबापूंनी दिलेला पाहुण्या – ऐकण्यात नाही आणि तो दावा मान्य करणारीही देऊ शकलो नाहीत ही वस्तुस्थिती आहे. आणि याची अधिक चिकित्सा पुढे येईलच. प्रश्न हा आहे की, खानोलकरांच्या 'चानी' वर चित्रपट काढण्यातलं धाडस मान्य केल्यानंतर असा कोणता विलक्षण 'प्रयोग' व्ही. शांताराम यांनी केला आहे?

या प्रश्नाचं उत्तर देण्यापूर्वी एक खुलासा करायला हवा तो असा की, चानी हा शंभर टक्के सामान्य चित्रपट आहे आणि त्यात काहीच चांगलं नाही, असा माझा दावा नाही. पुढं मी लिहिणार आहे त्याचाही अर्थ तसा होत नाही. या सिनेमात मी दोष पाहिलेत ते कादंबरीत आणि चित्रपट यांच्या तुलनात्मक विचारामुळे अशी बरीच शक्यता आहे की, कादंबरी न वाचलेल्या प्रेक्षकाला चित्रपट आवडेल. तसं घडल्याचं मला आसपास दिसतंयसुद्धा. आणि कादंबरी वाचलेल्या प्रेक्षकालाही चित्रपटात काही चांगल्या बाबी आढळतीलच. त्यांचाच उल्लेख प्रथम करतो. या चित्राची निसर्गसुंदर पार्श्वभूमी ही मूळ कादंबरीइतकीच, किंबहुना अधिकच प्रभावशाली झाली आहे. मुळात या कथेत निसर्ग निव्वळ पार्श्वभूमीपेक्षा खूप अधिक आणि खूप महत्त्वाची कामगिरी बजावतो. किंबहुना भूमिकन्या – निसर्गकन्या असलेल्या चानीच्या जीवनक्रमाची चौकट निसर्गाचा विस्तृत अंतर्भाव केल्याविना पूर्णच होणार नाही. 'रामाची कोंडी' हा नदीचा परिसर त्यातली एक महत्त्वाची भूमिका करतो. चानीच्या लेखनानं या कोंडीचं केलेलं वर्णन विलक्षण रसरशीत, जिवंत आणि प्रत्ययकारी आहे.

> रामाच्या कोंडीच्या अलिकडे मी उभा होतो... सकाळची उन्हे त्यातला पिवळेपणा जाऊन पारदर्शक स्वच्छ झाली होती त्यात कोवळा उबदारपणा आला होता. उबदारपणा हवाहवासा वाटणारा. पायाखालची दल-दल, काठावरची हिरव्या–काळ्या वनस्पतींची दाट झाडी, डोळ्यासमोरचे रुंद, गडद, काळे-निळे तुडुंब पात्र, दूर अंतरावर दिसणाऱ्या पडावांची उभारलेली शुभ्र शिडे आणि काठाकाठाला अधिकच खोल, झाडांच्या उलट्या प्रतिबिंबांनी अधिकच गडद झालेले पाणी. या सर्वांवर माझी कोवळी नजर एखाद्या पक्ष्याच्या, वाऱ्याने निखळून हवेत गिरगिरणाऱ्या पिसासारखी फिरत होती. मन एकदम मिटत होते आणि मिटता मिटता एखाद्या कोकरासारखे अंग जवळ करून जागच्या जागी थबकत होते. या सगळ्या, एखाद्या गोष्टीतल्या विशाल राक्षसाने उघडलेल्या जबड्यासारख्या दिसणाऱ्या वातावरणावरचे निळे आकाशसुद्धा मला खूपच दूर गेलेले, अनोळखी वाटत होते. मी एखाद्या जोंधळ्याच्या लाहीएवढा होऊन गेलो होतो आणि समोरच्या पात्रात अनेक ठिकाणी मोठमोठाल्या सुसरी दबा धरून बसल्यासारख्या वाटत होत्या... एका कसल्या तरी जाडजूड, वेड्यावाकड्या हाडासारख्या दिसणाऱ्या झाडाच्या पाळाला एक होडी दोरखंडाने बांधून ठेवलेली होती. ती अधूनमधून पाण्यावर हेलकावे खात होती... होडीच्या काठावर एक लांब अणकुचीदार चोचीचा पांढराशुभ्र करकोचा पक्षी मानेची कमान वर करून चित्रासारखा बसलेला मी पाहिला. त्या पक्ष्याचा तो पांढरा रंग, ते डौलदार बसणे, त्याच्या मानेची कमान आणि बारीक गुंजाळ डोळे... होडीच्या दोन्ही बगलांना चुबूक चुबूक करून करून आदळणाऱ्या स्वच्छ पारदर्शक पाण्यात माशांची चंदेरी धावाधाव सुरूच होती...
>
> ('गणुराया' आणि 'चानी' मौज / ९७–९८)

एखाद्या अप्रतिम देखण्या निसर्गचित्रात प्राण जागावा, गती शिरावी आणि मुख्य म्हणजे त्यातल्या घटकाघटकांना संवेदना

फुटाव्यात, अशा पातळीवरचं हे वर्णन आहे. खानोलकरांच्या चित्रमय चित्रणशैलीचा हा केवळ एक नमुना. असे अनेक आहेत. त्यातही निसर्गाचं रम्य वर्णन करणं अवघड नाही. अमानुषावर आणि निर्जीवावर मानवी / सजीव भाव–संवेदनांचं जे आरोपण खानोलकर सहजपणे करून जातात ते महत्त्वाचं. ते कठीण. केवळ शब्दांच्या माध्यमाचं हे आव्हान सिनेमासारख्या दृश्य कलेनं स्वीकारलं नसतं तरच नवल. या चित्रपटातली निसर्गदृश्यं पाहणं, हा एक सर्वांगसुंदर अनुभव आहे. वेळोवेळी, चित्राच्या आशयापेक्षाही अधिक आनंद त्याच्या या पार्श्वभूमीनं दिला आहे. साहजिकच छायाचित्रण हे माझ्या दृष्टीनं या चित्रपटाचं प्रथम क्रमांकाचं आकर्षण आहे. मराठी चित्रपटात ' रंग ' शिरल्यापासून त्याचा एवढा नेत्रसुखद वापर बहुधा प्रथमच झाला असावा.

मास्टर सुशांत रे याची छोट्या दिनकरची भूमिका आणि शांतारामबापूंच्या दिग्दर्शनामुळे उठावदार झालेले काही निवडक प्रसंग ही ' चानी ' चित्रपटाची आणखी दोन बलस्थानं. सुशांत रे या गृहस्थानं तर अपेक्षेपलीकडे कामगिरी बजावली आहे. एक तर त्याचा निरागसपणा बेगडी वाटत नाही. दुसरं, हिंदी सिनेमातल्या पोरांप्रमाणे त्याला जादा स्मार्ट ऊर्फ आगाऊ बनवलेला नाही, उलट क्वचित बावळटपणाचीच झाक त्याच्या वागण्यात आहे, जी त्या भूमिकेला आवश्यकच नव्हे तर, उपकारकही आहे. तिसरं, सुदैवानं त्याचा चेहराही उगीचच रोमँटिक किंवा हिंदी सिनेमातल्या बालकलाकारांप्रमाणे चॉकलेटी वगैरे नाही. मुख्य म्हणजे त्यानं आपली भूमिका समजून घेऊन सिनेमाभर एक सुसंगत आविष्कारपद्धती कायम राखल्यासारखी वाटते. शांतारामबापूंच्या दिग्दर्शनातल्या दोष–उणीवांची चर्चा पुढे येईलच, पण धाकटा मामा दिनूला मारतो तो प्रसंग, गावकरी चानीला मारतात तो प्रसंग, दिनूची दोन दिवास्वप्नं, असे काही प्रसंग त्यांच्या कुशल हाताळणीमुळेच रंगले आहेत, हे (मलाही) नाकारता येत नाही. चानीचं कलेवर उचलून नेणारा अप्पा सावकार (यशवंत दत्त) बैलगाडीतही तिच्या देहावर हिंस्रपणे तुटून पडतो, ही addition शांताराम यांची आहे आणि ती किंचित भडक वाटली तरी, अफाट हादरविणारी आहे. मनातल्या पारंपरिक जीवनमूल्यांच्या उतरंडी उद्ध्वस्त करणारी आहे.

वरील सर्व मुद्दे मान्य करूनही मी असं ठामपणे म्हणू शकेन की, खानोलकरांच्या ' चानी 'वर शांतारामबापूंनी अन्याय केलाय् किंवा कदाचित असं की, खरी चानी त्यांना सापडलीच नाही. त्यांनी फक्त तिचा तो शापित देह उचलला आणि एक नवीच चानी घडविली. शांतारामबापूंच्या कलासामर्थ्याचा योग्य तो आदर राखून आपण एवढं म्हणू शकतो. पण मूळची चानी उद्ध्वस्त झाल्याची जाणीव विसरता येत नाही.

या दारुण अपयशाची कारणं अनेक आहेत.

पहिला विचार करायचा आहे तो चित्रपटाच्या तथाकथित प्रायोगिकतेचा. त्यामुळे चित्रपटाला ' प्रायोगिक ' म्हणावं इतका महत्त्वाचा कोणता प्रयोग या चित्रपटात केला गेला आहे ? पार्श्वसंगीतात नैसर्गिक आवाज वापरणे, चित्रात अनावश्यक नाच / गाणी / मारामाऱ्या वगैरे न घुसडणं या गोष्टी भारतीय चित्रसृष्टीत आता अनोळखी नाहीत. आणि असल्या तरी यातलं कोणतंच कारण संपूर्ण चित्रपटावर प्रायोगिकतेचा शिक्का मारायला पुरेसं नाही. खानोलकरांच्या कादंबरीत नको तिथे नको ते बदल करणं याला ' प्रयोग ' म्हणायचं असेल तर, गोष्ट वेगळी. उलटपक्षी, कथेतलं वातावरण, भाषा, पात्रचित्रण याबाबतीत शांतारामबापूंनी मूळ कथेची गरज बाजूला ठेवून भिकार धंदेवाईक तडजोडी केलेल्या नाहीत काय ? ' चानी 'ची मूलत: submissive, असाहाय्य, काहीशी करुण असलेली व्यक्तिरेखा बनेल, दादागिरी करणारी आणि शक्य त्या सर्वांना dominate करणारी बनवायचा हेतू काय ? प्रायोगिक चित्रपट काढायला जाणाऱ्या शांताराम बापूंनी कादंबरीतील खास कोकणी वातावरणाची लज्जत, बाहेरचं मार्केट जाऊ नये या भीतीपोटीच घालवली नाही काय ? आणि कादंबरीतल्या अप्पा 'बामणाचा' अप्पा 'सावकार' करायची दक्षता प्रायोगिकतेचा अभिनिवेश धरणाऱ्यानं का घ्यावी? किंबहुना कादंबरीत एरवीही जिथं जिथं ' बामण ' शब्द आहे तिथं तिथं शांताराम यांनी पांढरपेशा शब्द घुसडलाय्. गोष्ट तशी लहान वाटते, पण ही तरी तडजोड का ? कलेमध्ये प्रयोग करू पाहणारे कलाकार – निदान शांतारामच्या तोडीचे कलाकार – जातीयतेच्या पलिकडे गेल्याचं आम्ही मानतो. तेव्हा बामण शब्द कायम ठेवल्यामुळे प्रायोगिक चानीवर आणि तिच्या निर्मात्यावर कुणी जातीयतेचा शिक्का निश्चित मारला नसता. खानोलकरांवर तसा आरोप झाल्याचं ऐकिवात आहे काय ? आणि समजा झाला असता तरी, ती झीज आपल्या प्रयोगासाठी सोसायची मोठ्या कलाकाराची तयारी का नसावी ? पांढरपेशा व ब्राह्मण हे काही समानार्थी शब्द नव्हेत. आणि कोकणातल्या एका गावाच्या अंतर्गत ताणतणावांचा बोध बामणाऐवजी पांढरपेशा शब्द वापरून कसा व्हावा ? अनेक पात्रांच्या – खुद्द चानीच्याच– तोंडात तर एवढा शुद्ध, शहरी आणि अगडबंब शब्द शोभतही नाही. या सगळ्यांतून सार निघतं ते एवढंच की, मुरलेला धंदेवाईक जेव्हा प्रायोगिक चित्रपट काढतो, तेव्हा त्या प्रयोगासाठी कोणतीही किंमत मोजायची तर त्याची तयारी नसतेच, वर त्याच्या प्रायोगिकतेची जाहिरात हा त्याच्या धंद्याचाच एक भाग असू शकतो.

कादंबरीतील आणि सिनेमातली वातावरणनिर्मिती आणि भाषा या दोन गोष्टींची तुलना केली तरी प्रायोगिकतेच्या आणि वास्तवतेच्याही दाव्याच्या चिंध्या करता येतील. खानोलकरांच्या ठसकेबाज कोकणीची शांतारामबापूंनी लेटेस्ट शहरी मराठीच्या अजागळ गाढवावरून धिंड काढली आहे. कादंबरीत चानी, गंगाराम आणि ( बहुतांशी ) दिनूची आजी ही पात्रे पूर्णत: कोकणी बोलीत बोलतात तर, दिनूचे दोघे मामा–मामी आणि इतर लहानमोठी पात्रे प्रामुख्यानं त्या बोलीच्या लयीत बोलतात. सिनेमात या सर्वांची काहीच विधिनिषेध न ठेवता सरमिसळ केली आहे. लयीला तर सामान्यत: फाटाच दिला आहे. त्यामुळे सर्व पात्रे एकाच सरळ, शहरी सपाट लयीत बोलतात. आणि कोकणीच बोलायला हवं अशी पात्रंही धडधडीत शुद्ध शहरी मराठी बोलतात आणि तेही आधुनिक शब्द वापरून. मग मधूनच आठवण झाल्यासारखी गाडी कोकणीच्या रुळावर येते. मराठीच्या आधुनिक शहरी लयीत बोलल्या गेलेल्या अशा

तुरळक कोकणीतही अधनंमधनं मराठी शब्द शिरतातच. सत्तरी उलटलेल्या आजीच्या तोंडी 'आपलं हक्काचं घरकुल असावं,' ही भाषा ? 'घरकुल' ? 'पांढरपेशा' हा शब्द तर चानी आणि आजी दोघींच्याही जिभांच्या अगदी शेंड्यावर आहे. सत्तरी ओलांडलेली अस्सल कोकणस्थ म्हातारी आणि धनगर – कुळवाड्यांमध्ये वाढलेली एक अडाणी खेडवळ मुलगी यांच्या व्यक्तिरेखांचा काही सखोल विचार करून त्यांच्या भाषेची योजना केली आहे असं कुठंच जाणवत नाही. नशीबच, की वर्गसंघर्ष, दलितमुक्ती, 'माणसानं माणसाला माणसासारखं वागवायला हवं,' समता–समाजवाद, आणि वीस–पंचवीस कलमी कार्यक्रम यांचे उल्लेख पात्रांच्या बोलण्यात कुठे आले नाहीत. भाषेसंबंधीची ही तडजोड बहुधा उर्वरित महाराष्ट्रातला प्रेक्षकवर्ग खेचण्यासाठी केलेली असावी, तथापी मला तरीही ती समर्थनीय वाटत नाही. इंग्लिशचा गंध नसणाऱ्या लोकांची गर्दी इंग्रजी चित्रपटांना लोटत नाही का ? आणि ती लोटते, ती काय काहीतरी कळत असल्याशिवाय ? मुख्य म्हणजे कोकणी बोलता न येणाऱ्यांना ती कळूही नये इतकी ती मराठीला निश्चित दूर नाही. ( मग भाषापुनर्रचनामंडळ काही का निर्णय देईना ! जिज्ञासूंनी आकाशवाणीवरच्या कोकणी बातम्या ऐकून पहाव्यात. ) अशी भेसळ भाषा वापरल्यानंतरही वास्तव वातावरणनिर्मितीचा दावा केला जावा हे आश्चर्यच. वातावरणनिर्मितीमध्ये वास्तवता आणणं म्हणजे फक्त कोकणातल्या निसर्गरम्य ठिकाणी बाह्यचित्रण करणं नव्हे, हे खरं म्हणजे चित्रपतींना सांगायला लागू नये. अर्थात भाषेव्यतिरिक्त वातावरणाच्या इतर घटकांमध्येही वास्तवतेची कदर यथातथाच केली आहे. चानीचा काळ शांतारामबापूंनी कोणता मानलाय् ? कादंबरीमध्ये खानोलकरांना अभिप्रेत असलेलाच कालसंदर्भ मानला असला, तर त्यात दिनू ऊर्फ सुशांतरेच्या डोक्यावरची बीभत्सछाप झुलपं कशी काय बसतात ? गंमत म्हणजे त्याचे कपडे, शाळेला दौत घेऊन जायची रीत हे सगळं जुनंच आहे. कंबरेखाली धोतर आणि डोक्यावर हीरोकट यांची संगती मला तर, काही घालता येत नाही. जगदंबेच्या देवळात दिवे आणि दिनूच्या घरात रेडिओ ( तेसुद्धा रंगीत ट्यूब आणि बराच अलिकडचा वाटणारा रेडिओ. नशीब की निऑन साइन्सच्या जाहिराती आणि पॉकेट ट्रान्झिस्टर्स दाखवले नाहीत. ) दाखवले आहेत, त्यांच्या कलाविषयक सुसंगतीबद्दलही मला घनदाट शंका आहे

असो. सिनेमाच्या त्या कलात्मकतेकडे वळतो. या कलात्मकतेचे नक्की अर्थ आणि घटक मला उमजलेले नाहीत. ( असं मलाच प्रांजळपणे इ. कबूल केलं पाहिजे. कारण शांतारामबापू किंवा त्यांचे जाहिरातदार यांना ते उमजलेलं नाही. असं मला किंवा त्यांनाही कसं म्हणता येईल ? ) असं दिसतं. माझ्या मते कलात्मकता ही वास्तवाला पूरक असू शकते; ( उदाहरणार्थ, कोकणातला श्रीमंत निसर्ग ही वास्तवता, आणि शांतारामनी केलेलं त्याचं कलात्मक प्रस्तुतीकरण ही पूरक जोड. ) तशीच विरोधीही असू शकते. ती वास्तवतेच्या विरोधात जाणं म्हणजेच तिचं रूपांतर कृत्रिमतेत होणं. ( उदाहरणार्थ : हिंदी सिनेमात एखाद्या कारकुनाच्या घराचा सेटही मोठा 'पॉश्' आणि अलिशान दाखवला जातो. तो सेट कलात्मक असू शकतो, पण वास्तवतेच्या तो विरोधात गेल्यामुळं कृत्रिमतेत रूपांतरित आणि परिणत होतो. ) चानीमध्ये हा दोष वारंवार घडलेला दिसतो. म्हणजे चानीचा शब्दार्थ खार, तेव्हा चानी कधी दोन पायावर सरळ चालत येत नाही. कायम नागमोडी आणि उड्या मारतच. शिवाय ती यायला लागली की बासरीची ती एक धुन वाजणारच. ( वर नैसर्गिक पार्श्वसंगीत वापरल्याची ऐट ! ) हे सगळं तात्पुरतं गोड किंवा कलात्मकसुद्धा वाटलं तरी अंतिमतः कृत्रिम ठरतं. चानी दिनूच्या घरी मासे घेऊन येते तेव्हा तर ती, दिसायला लागण्यापूर्वीच ती बासरी सुरू होते आणि जणू खरोखरच ती बासरी वाजवली जात आहे आणि आपल्याला ती ऐकूनच चानीच्या आगमनाची वर्दी मिळाली अशा थाटात दिनकरराव आधीच मान वर करून बघतात. हे काय ?

कलात्मकतेच्या हव्यासातून येणाऱ्या कृत्रिमतेचा एक ढळढळीत पुरावा म्हणजे सिनेमाची टायटल्स. या श्रेयनामावलीसाठी दरवेळी काही नवी कल्पना शोधून काढण्याची व्ही. शांताराम यांची परंपरा आहे म्हणे असेल. पण निदान चानीसारख्या साधेपणातनं सौंदर्याविष्कार करणाऱ्या कथेला चित्ररूप देताना त्यांनी असली चमत्कृतीपूर्ण श्रेयनामावली योजायला नको होती, असं मला प्रामाणिकपणे वाटतं. नव्या प्रयोगासाठी एखादी जुनी परंपरा मोडायला काय हरकत होती ? चित्रपटात नायिका म्हणूनच संध्यालाच घ्यायची नव्हती त्यांची परंपरा ? पाण्याच्या बुडबुड्यातून कर्णकर्कश आवाज करीत संथपणे वर येणारी टायटल्स हा चानीसारख्या स्वयंसिद्ध, स्वयंप्रकाशित कथेत 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' ठरतो. शिवाय तो प्रकार तुटेस्तोवर ताणलाय्. चित्रपटाच्या शेवटच्या त्या कलात्मक दृश्याला माझा आक्षेप नाही. तथापी तिथेही चानीच्या मरणाची भयानकता पातळ होऊन गंगारामदिनूच्या तद्विषयक प्रतिक्रियेला आणि ती प्रतिक्रिया जोरदारपणे 'रजिस्टर' करण्यासाठी शांताराम यांनी वापरलेल्या तांत्रिक क्लृप्त्यांनाच वाजवीपेक्षा जास्त महत्त्व आलंय् असं वाटल्यावाचून राहत नाही. कलात्मकतेतून उद्भवणाऱ्या या कृत्रिमतेचं समर्थन शांतारामबापूंचे काही चाहते 'व्ही. शांताराम टच्' किंवा 'शांतारामबापूंची खास शैली' यासारखे शब्दप्रयोग वापरून देतात. हा मुद्दा विवादास्पद आहे. एक तर टायटलसारख्या तुरळक ठिकाणी हा शांताराम 'टच्' न राहता धक्काबुक्की ठरते. दुसरं असं की,


**पूर्णिया**

अनिल अवचट

किंमत : सहा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

'एखाद्याची वर्षानुवर्षं कायम राहिलेली खास शैली' आणि नावीन्याचा अभाव, पुनरावृत्ती, तोचतोपणा या दोहोंच्या सीमारेषा एकमेकांना भिडलेल्या आहेत. 'शांतारामची शैली वर्षानुवर्षं कायम राहिली आहे' हीच गोष्ट 'शांताराम कालानुरूप बदललेच नाहीत; होते तिथेच राहिले,' अशीही सांगता येणार नाही काय? शैलीसंबंधी काही मूलभूत किंवा सखोल विचार मांडायला इथं सवड नाही, पण गंमत म्हणजे ही. शांतारामच्या खास तंत्राचा / शैलीचा (क्वचित प्रमाणाबाहेरही) उदो उदो करणारी रसिकमंडळी देवआनंदच्या अभिनयशैलीला type झाल्याचा आरोप करून, नाकं मुरडतात. मला देवआनंदचं समर्थन करायचं नसून एवढाच मुद्दा मांडायचाय की, अभिनयात / दिग्दर्शनात काय किंवा इतर कोणत्याही कलेच्या अंगात काय, शैली (style) ही आशयाच्या (content) मानगुटीवर, सिंदबादच्या मानगुटीवर बसून गळा दाबणाऱ्या म्हाताऱ्यासारखी होऊ नये. कलाकार मातब्बर आणि स्वतंत्र प्रज्ञेचा असेल तर, शैलीला आशयाइतकंच (किंबहुना क्वचित थोडं अधिकही) महत्त्व प्राप्त होईल हे खरं, पण तेव्हाही शैलीमुळे आशयात भरच घातली जावी. कादंबरीत हे घडलंय. सिनेमाचं ज्यानं त्यानं ठरवावं.

अर्थात चानीमधली सगळी कृत्रिमता कलात्मकतेतूनच उगवली आहे असं मुळीच नाही. त्यातला काही भाग धंदेवाईकपणातून आला आहे, तर काही चक्क अनवधानातून आलाय्. चित्राच्या सुरुवातीच्या भागातच सामंत कुटुंबाची जी धाऊक ओळख करून दिली आहे ते दुसऱ्या प्रकारचं उदाहरण. त्यातली धाकटी मामी तर, भाचा जवळ येतो कधी, आणि आपण ओव्या सुरू करतो कधी, याची वाटच पाहत क्षणभर स्तब्ध उभी असते. भाच्याची पाठ वळली की, ओव्या खलास. वातावरणनिर्मितीची उत्तम संधी या सगळ्या प्रकरणात फुकट दवडली आहे. धंदेवाईकपणाच्या सवयीमुळे आलेल्या कृत्रिमतेची उदाहरणं तर अनेक आहेत. 'मी एक रानफूल' या गाण्याच्या आधी दिनू व चानी यांनी एकमेकांना दऱ्याडोंगरावरून हाकारे घालीत पळत येऊन भेटण्याचं दृश्य आणि चानीच्या सगळ्या गाण्यातले तिचे तद्दन विदेशी नाच हे प्रकार हिंदी फिल्मी स्टाइलचे. चानीची वेषभूषा हेही त्यातलंच प्रकरण. 'कशीतरीच मळकटशी गाठ मारलेली चोळी, कसातरीच तुकडेतुकडे जोडून शिवलेला पांढरा, लाल, निळा, गुलाबी, काळा, विचित्र रंगाचा परकर,' हे खानोलकरांनी कादंबरीत केलेलं वर्णन कुणीकडे आणि सिनेमातले तिचे तऱ्हेतऱ्हेचे, मिजासी, आणि नाचताना जरूर ते सर्व अवयव दिसतील अशा बेताने बेतलेले कपडे कुणीकडे. यापेक्षा संतापजनक प्रकार चानीच्या मृत्यूचा आहे. जगदंबेच्या देवळात बारा-पंधरा गावकरी लाठ्यांनी तिला जितकं मारताना दाखवलेत, त्याखाली हत्तीचासुद्धा चुराडा व्हायला हवा होता. प्रत्यक्षात मात्र अंगावर दोनचार ओरखडे आणि ओठाच्या फक्त डाव्या कोपऱ्यात खास हिंदी फिल्मी स्टाइलनं थबकलेलं थेंबभर रक्त यापलीकडे तिच्या शरीरावर एकही दृश्य खूण दाखवलेली नाही. खानोलकर उल्लेख करतात त्याप्रमाणे संपूर्ण शरीर काळंनिळं वगैरे होणं लांबच. ही काय जादू आहे? त्यानंतरही अप्पा बामण नदीत चानीचं प्रेत फेकतो, की गंगाराम ते काढायला दत्त म्हणून उभाच. त्यातही गंमत म्हणजे अप्पा बामणाचा, चुकलो-सावकाराचा, पाय अडकून तो स्वतःच्याच गाडीमागे फरफटत ओढला जाताना दाखवलाय्. कादंबरीत हे काहीच नाही. शांतारामबापूंनी हा नवा क्रीडाप्रकार किस खुशीमें घुसवला असावा? सिनेमाची निर्भेळ शोकान्तिका करण्यातली box-officce risk कमी करण्यासाठी खलनायकालाही शिक्षा करून टाकायचा हा poetic justice दाखवला असावा काय? काहीही असलं, तरी हे प्रकार म्हणजे कादंबरीवरचे अत्याचारच आहेत असं माझं मत आहे.

चित्रपटाच्या हाताळणीत डोकावणारी ही कृत्रिमता स्वाभाविकपणेच त्यातल्या पात्रांमध्येही उतरली आहे. इतर पात्रांत ती बरीच कमी आहे, तथापि त्यांच्याविषयी स्थलमर्यादेस्तव लिहीत नाही. पण खुद्द चानीचं काय? या मध्यवर्ती व्यक्तिरेखेत नाना बदल करून शांतारामबापूंनी खानोलकरांच्या चानीची पुरी विल्हेवाट लावून टाकली आहे. कादंबरीतल्या चानीचं वय १५-१६ आहे. चित्रपटात शांतारामनी काय वय गृहीत धरलंय् कुणास ठाऊक, पण ही भूमिका करणाऱ्या रंजना देशमुख 'चानी' वाटल्याच नाहीत. सिनेमातली भव्य चानी सुमारे तिशीतली असावी. कादंबरीत चानीच्या हसण्याचा उल्लेख वारंवार आहे. खानोलकर त्याची वर्णनं 'चानीच्या किणकिण सुरात हसली' 'चानी हास्याचे धारदार चांदीचे मजले चढवीत होती', अशी करतात. शांतारामबापूंना चांदीचा आवाज माहीत नसेल असं कसं म्हणावं? पण मग त्यांची चानी शाळेच्या घंटेसारखी ठणठणून का हसावी? चानीची व्यक्तिरेखा त्यांनी असह्य loud, aggressive, आक्रस्ताळी केली आहे. त्यांची चानी कादंबरीतल्या दुबळ्या किशोरीप्रमाणे आठवले मास्तरांसारख्यांच्या वासनेला बळी पडत नाही. आठवले मास्तरांना ती प्रतिकार करून आणि फजिती करून हाकलून देते. तिच्याकडून मोलानं काम करवून घेणाऱ्यांशी सीता और गीता टाइप दादागिरी करते. मध्येच एकदम त्रागा करून आत्महत्या करायला निघते. आपल्याला फसवणाऱ्या अप्पा बामणाची गावभर बदनामी करण्याची धमकी देऊन आणि पुष्कळ आरडूनओरडून ती त्याला ब्लॅकमेल करू पाहते. आठवले मास्तरांच्या वर्गात येऊन त्यांच्या नाकापर्यंत ती शेणाची पाटी पोचवते. तिच्याशी लगट करू पाहणाऱ्यांना जोड्यानं मारायला उठते. कादंबरीत यातलं काहीही नाही. हा काय प्रकार तरी काय आहे?' आपण कादंबरीतल्या चानीत काही किरकोळ बदल केले आहेत', अशा भ्रमात शांतारामबापू नसतील अशी आशा आहे. वस्तुतः त्यांनी जवळजवळ एक नवी चानी निर्माण केली आहे. आणि तीही अशी की, श्रेयनामावलीतला खानोलकरांचा उल्लेख त्यांनी गाळलाच असता तर खानोलकरांवर उपकार झाले असते. चानीला चित्रपटाच्या शक्य त्या प्रत्येक फ्रेममध्ये वरचढ, dominant दाखवायचा व्यर्थ खटाटोप त्यांनी केला आहे. रंजनाच्या व्यक्तिमत्त्वाची साथ त्यांना त्यात लाभली आहेच. कादंबरीतल्या चानीची झऱ्यासारखी नैसर्गिक निर्व्याजता त्यांनी मारलीय आणि त्याजागी सगळ्या गावाला धाक दाखवणारा बनेलपणा आणलाय. तिच्या भाषेबद्दल मागे लिहिलं आहेच. ब्राह्मणी थाटाचे संवाद आणि श्रीमंत थाटमाट अशी शांतारामबापूंची चानी म्हणजे खानोलकरांच्या चानीचं निव्वळ भूत.

पुष्कळ गाजावाजा झालेलं 'चानी'चं संगीत अपेक्षापूर्ती करू शकत नाही. संगीतकार हृदयनाथ मंगेशकर यांनी पार्श्वसंगीताप्रमाणेच गाण्यांच्या चालींसाठीही परिश्रम घेतल्याचे जाणवतात, पण मुख्यतः गाणी नीरस, गद्यप्राय वाटतात. त्यालाही हरकत नाही; पण एक खरं की चि. त्र्यं. खानोलकर ऊर्फ आरती प्रभू हे प्रतिभावंत कवी असले तरी, सिद्धहस्त चित्रपटगीतकार नव्हते. चानीला दिलेल्या कुठल्याच गीतातली भाषा व भावनाही तिच्या तोंडात शोभण्यासारखी नाही. 'तो एक राजपुत्र' सारख्या गाण्यात दिसतं तेवढं self–realization चानीजवळ कुठून यावं? दुसरी गोष्ट, चित्रपटाचं हे संगीत – विशेषतः गाणी – प्रचंड loud आहे. यात 'प्रभात' चित्रगृहाच्या ध्वनियंत्रणेचा वाटा किती ते मला ठाऊक नाही, पण गाण्यातला बराचसा भाग कानठळ्या बसवण्याइतका कर्कश ऐकू येतो. मन्ना डे नं गायलेल्या गाण्यात तर कानाचे पडदे फाडायचीच ताकद आहे. अर्थात चित्रगृहातील दोष जमेला धरूनही, गाण्यांच्या मूळ चालीच किंवा पार्श्वसंगीतातल्या 'त्या' बासरीसारख्या काही ट्यून्स वरच्या पट्टीतच लावल्या आहेत हे काही खोटं नाही. अनेकदा त्यामुळे गाण्यातले शब्द ठार मरून कर्णकटू आवाज फक्त शिल्लक राहतो.

चानीतल्या दुय्यम कलाकारांच्या भूमिका हे चित्रपटातलं अभिनयदृष्टचा एकमेव ओॲसिस आहे. यशवंत दत्त (अप्पा सावकार), अरविंद देशपांडे (धाकटा मामा), गौरी कामत (धाकटी मामी) आणि प्रेमकुमार (गंगाराम) या चौघांनीही आपापल्या भूमिका समजून उमजून रंगवल्या आहेत. प्रेमकुमारला कोकणी बोलताना मात्र त्रास झाल्याचं जाणवतं गौरी कामत यांना मधनंमधनं गोडचगोड ओव्या म्हणण्याचीच कामगिरी मोठी आहे. सुहास भालेकर (आठवले मास्तर) आणि थोरले मामा-मामी यांचाही उल्लेख करणं आवश्यक आहे. शांताराम-बापूंनी या दुय्यम पात्रांच्या चित्रणातही यथाशक्ती, यथामती हस्तक्षेप केला आहे. त्याचा परिणाम एवढाच होतो की, कादंबरीतले त्यांचे माणूसपण, त्यांची individuality कमी होते आणि हिंदी फिल्मी थाटाचे ठसे किंवा ठोकळे होण्याकडे त्यांचा कल झुकतो. उदाहरणार्थ अप्पा वामण ही व्यक्तिरेखा कादंबरीमध्ये संधिसाधू – opportunist – स्वभावाची आहे. पोटात आणि ओठात वेगवेगळं असणाऱ्या वातकुक्कुटाच्या स्वभावाची आहे. सिनेमात मात्र तो पूर्णत्वाला पोचलेला खलनायक म्हणून उभा राहतो. जणु त्याला शंभर टक्के दुष्ट दाखविल्याशिवाय चानी आणि तिच्या कॅंपचा भलेपणा सिद्ध झालाच नसता! साहजिकच शेवटी त्याला शिक्षा करणे आलेच. आठवले मास्तर ही व्यक्तिरेखा कादंबरीत अस्सल ढोंगी चित्पावनी मध्यमवर्गीय स्वार्थाचे प्रतिनिधित्व करते. सिनेमात तिला हास्यास्पद, क्वचित तर फार्सिकल करून टाकून तिचं बलस्थान असलेली स्वाभाविक मानवी गुंतागुंत काढून टाकण्यात आली आहे. दिनूच्या आजीची व्यक्तिरेखा सिनेमात अकारणच जास्त मिळमिळीत, सौम्य, काहीशी कारुण्याकडे झुकणारी, pseudo–melodramatic म्हटले तरी चालेल, अशी केली आहे, किंवा झाली आहे. धाकटा मामा या एकमेव पात्राच्या चित्रणात खानोलकरी साच्याशी इमान राखण्यात आलंय् आणि ही भूमिका फार इंटरेस्टिंग वठलीय्. त्यात अरविंद देशपांडे यांचाही वाटा फार मोठा आहे. मनुष्यस्वभावातली उपजत गुंतागुंत, बऱ्यावाईटाची अवघड वीण या व्यक्तिरेखाटनात भरपूर आहे आणि अरविंद देशपांडे यांनी ती त्या साऱ्यानिशी जिवंत केली आहे. दिनू (मास्टर सुशांत रे) याच्या अभिनयाबद्दलचा अनुकूल अभिप्राय मागे येऊन गेलाच आहे. रंजनाने (चानी) आपल्या भूमिकेसाठी बरेच कष्ट घेतल्याचं जाणवतं एवढंच म्हणणं शक्य आहे.

असो. लिहिण्यासारखे पुष्कळ काही आहे. पण पुष्कळ लिहूनही झालं आहे. चानी चित्रपटाचा विचार मी प्रामुख्याने चानी कादंबरीच्या पार्श्वभूमीवर केला आहे. सर्वसामान्य मराठी चित्रपटांच्या तुलनेनं चानीचा दर्जा बरा असू शकेलही (अर्थात त्या परिस्थितीतही त्यात खानोलकरांचा वाटा मोठा असेल.) पण त्याच्याशी मला इथं कर्तव्य नाही. माझी एवढी खात्री झाली आहे की, सिनेमानं कादंबरीचा पुरा सत्यानाश केला आहे, तोही दुहेरी – चानीचं व्यक्तिरेखेचा आणि एकूण कादंबरीचा. कादंबरीचा पल्ला गाठायला सिनेमाच्या माध्यम म्हणून असलेल्या मर्यादाही दिग्दर्शकाच्या अपयशाबरोबरीनं आड आल्या आहेत. कादंबरीतली कित्येक सौंदर्यस्थळं सिनेमाला व्यक्त करता येण्यासारखीच नव्हती, तर कित्येक गाळून टाकली आहेत. दिनूच्या आजीचे दिवस भरत येनात त्याची खानोलकरांनी दिलेली ही सूचना :

'आजीच्या त्या बारीक पापण्या, पिकलेल्या डोळ्यांत मला असे काही दिसले की, त्याचा अर्थ मला पुरता जाणवला नसला तरी मनाकडे एकदा येऊन गेले की, त्या डोळ्यातून काही तरी कमी आहे. काहीतरी मंद झाले आहे आणि दुसरेच काहीतरी एक त्या डोळ्यांत धुक्याआडून दिसणाऱ्या संथ काळचा डोहासारखे चमकणारे असे उतरले आहे, दाटले आहे. त्या बधिर चकाकीचा अर्थ मला नीटसा कळला नाही, पण मन मात्र हुरहुरू लागले. (चानी / १२२)

संवेदनाक्षम भाषेच्या अवाक्यापलिकडे असणारी ही अबोध हुरहूर सिनेमा काय पकडणार! पण याच प्रसंगाशी संलग्न होणारा कादंबरीतला, मृत्यूशय्येवरच्या आजीनं झाड पाहून ठेवायचा संकेत, सुबुद्धावस्थेपलिकडच्या जगतातल्या अस्तित्वाची ती अमोल खूण, सिनेमानं जाणूनबुजून गहाळ केली आहे. त्याच्यापुढचा म्हाताऱ्या आंब्याची पानं गळण्यातली सूचना मात्र अतिनाट्याकडे झुकावी इतकी ताणलीय्, भडक केलीय्. (काळोखाची प्रार्थना करणारी धाकटी मामी, वगैरे) यावेळचा दृश्यभाग मात्र सुरेख जमलाय्. अर्थात एकूणच सिनेमाची छायाचित्रणगुणवत्ता उत्कृष्ट आहे.

सिनेमात आणखी हरवलेत ते कादंबरीतल्या विचारांचे ताणेबाणे. पात्रे किंवा वाचक यांतल्या कुणावरच विचारांचं ओझं पडू न देता खानोलकरांनी या कादंबरीत विचारांचं जाळंच विणून ठेवलंय् पाप म्हणजे काय, पाप हे पाप का? पुण्य कशात आहे, बऱ्यावाईटाचा निर्णय कसा लावायचा, पापांच्या प्रायश्चित्ताच्या तऱ्हा, असे अनेक ताणतणावे. मानवाच्या अस्तित्वाच्या थेट मुळापाशीच जाऊन भिडणाऱ्या अनेक प्रश्नांचा विचार आणि तोही प्रत्यक्ष आयुष्यातून, त्यातल्या लहानमोठ्या प्रसंगांतून उमललेला. बऱ्यावाईट गोष्टीतून उमटलेला. सिनेमा, कितीही प्रायोगिक + कलात्मक + वास्तव झाला तरी काय काय मुठीत धरणार? कदाचित सिनेमाकडून मी त्याच्या कुवतीबाहेरच्या अपेक्षा करीत असेन!

कुणास ठाऊक! पण चानी नावाच्या अत्याचारातून जन्मलेल्या, अत्याचार भोगत जगलेल्या आणि अत्याचारातच उद्ध्वस्त झालेल्या जिवाची जन्मकहाणी चितारताना, चित्रपतींनीच नव्हे तर, चित्रपटमाध्यमानंही आपल्या मर्यादा उघड्या केलेल्या आहेत. निदान शब्दमाध्यमाच्या तुलनेनं तरी त्या स्पष्ट झाल्यायत् असं मला प्रामाणिकपणे वाटतं. अनेक डोळस प्रेक्षक–वाचकांना या लेखातल्या काही गोष्टी न पटणं शक्य आहे. अशा काही प्रतिक्रिया मिळाल्या तर मला ते आवडेल ☐

आजचे तरुण अधिक बुद्धिवान आहेत.
त्यांचे विचार स्वतंत्र आहेत.
त्यांचा विश्वास फक्त भौतिक ज्ञानावर.
पाप–पुण्य असते केवळ मानण्यावर.

देवदानव आपणच घडवलेले.

शेवटी जग चालते कशावर ?
मनगटांतल्या शक्तीवर. आणि अर्थातच–पैशावर !

दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये.
हा झुकानेवाला जन्माला येतो.
आणि त्याच्या पाठोपाठ झुकणारे, त्याला उचलून धरणारे.

ही त्याची ' गँग. '

' गँग ' योजना करते. धुमाकूळ घालते.
राजकारणात. समाजातही.

तिचा एक ' बॉस ' तयार होतो.
तिची रहस्ये वाढतात. मग खून पडतात.
एकट्या–दुकट्याचे–कधीकधी तिघांचे–पाच जणांचे.
सारे शहर भयभीत.

जपून राहा, जपून राहा–

कोणाची गँग ? कसली गँग ? हत्याकांड कशासाठी ?

आपण सारेच भीतीच्या सावलीत

# ' गँग '

लवकरच प्रसिद्धी

लेखक : रत्नाकर मतकरी